मात्र सबलीकरण (Empowerment) या शब्दातूनच ती एक कृत्रिमपणे, बाहेरून, हेतूतः घडवून आणण्याची प्रक्रिया आहे असे सूचित होते. सबलीकरण घडवून आणणारे कुणी वेगळे आहेत आणि ज्यांचे सबलीकरण व्हायचे ते वेगळेच कोणी आहेत. अशी भूमिका यातूनच व्यक्त होते. वस्तुतः हे घटक मूलतः दुबळे नसतात तर अन्याय व्यवस्थेमुळे त्यांचे 'दुर्बलीकरण' झालेले असते. सबलीकरणाच्या प्रक्रियेत कर्ते–करविते श्रेष्ठ व लाभार्थी मात्र कनिष्ठ असे असमान नातेही 'सबलीकरण' या शब्दप्रयोगाने सूचित होते. सबलीकरणाची मुक्त संकल्पना सर्वप्रथम शिक्षणतज्ञ पॉलो फ्रेरी यांनी मांडली. जाणिवीकरणाच्या प्रक्रियेतून सर्व प्रकाराच्या शोषणातून मुक्त असा समाज त्यांना आपल्या संकल्पनेतून अभिप्रेत होता. जाणिवीकरण म्हणजे चर्चेच्या माध्यमातून समाजातील विसंवाद शोधण्यातून, शोषणाविषयी निर्माण होणारी जाणीवेची नवी पातळी आणि जग बदलण्याच्या प्रक्रियेचा भाग बनणे होय असे त्यांचे मत होते.[1]

एव्हलीन हस्ट यांनी मात्र औपचारिक सत्ता केन्द्रांजवळ दुर्बळ घटकांनी दावा सांगण्याखेरीज समाजात काही बदल घडू शकतील याबद्दल संशय व्यक्त केला आहे. ॲने फिलिप्स यांच्याप्रमाणेच हस्ट यांनाही सबलीकरण म्हणजे सुधारणा होणे आणि राजकारणात हक्क देणारेच वाटते. सुधारणा व हक्क हे संस्थात्मक औपचारिक राजकीय चौकटीपुरते मर्यादित नाही. तर शोषणात्मक स्थितीचा दैनंदिन अनुभव, सत्तेतील तफावतीची ओळख आणि सर्व सामाजिक स्तरांवरील सत्ता समीकरण बदलणा–या विविध प्रयत्नाचाही त्यात समावेश आहे.[2]

सामाजिक संरचना आणि राजकीय प्रक्रियांमुळे काही घटकांना अनेक प्रकारच्या संधीपासून आणि निर्णय प्रक्रियेतील सहभागापासून वंचित राहावे लागले. या वंचित घटकामध्ये स्त्री (महिला), दलित, आदिवासी यांचा समावेश करता येईल. हे घटक शतकानुशतके समाजात दुर्लक्षीत घटक होते. यापैकी स्त्रियांचा जर याठिकाणी अभ्यास केला तर असे दिसून येते की, फक्त भारतातच नव्हे तर जगातील पुढारलेल्या देशांनी सुध्दा स्त्रियांकडे एक सजिव मनुष्य या उद्देशाने कधी बघितलेच नाही. त्यामुळे तिच्या प्रगतीचा विचार केला गेला नाही. देशाचा विकास आणि स्त्री (महिला) सबलीकरण यांचा निकटचा संबंध आहे. याचा विचार केला गेला नाही. प्रत्येक सुसंस्कृत समाजाचे लक्षण म्हणजे त्या समाजात स्त्रियांचा सामाजिक दर्जा पुरूषांच्या बरोबरीचा असला पाहिजे होता. पण तो आहे असे सध्या तरी दिसून येत नाही. त्यामुळे प्राचीन काळापासून आधूनिक काळापर्यंत स्त्रीचा दर्जा कसा बदल गेलाय याचा मागोवा या लेखात घेण्यात आलेला आहे. त्याचबरोबर महिला सबलीकरणासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत ? यासंबंधीचा उहापोह या लेखात करण्यात आलेला आहे.

भारतीय समाजाच्या संस्कृतीला चार हजार वर्षाचा इतिहास असून एवढया प्रदिर्घ काळात स्त्रियांचा दर्जा एक सारखा राहिला नाही. वैदिक काळात स्त्रीचे समाजातील स्थान उच्च होते. पुरूषासमान अधिकार व सर्व प्रकारचे स्वातंत्र्य त्या उपभोगत होत्या व ती पतीची समांतर जीवनसाथी होती. एकत्र कुटुंबात तिची अधिसत्ता मान्य झाली होती व तिला कार्यांचे पूर्ण स्वातंत्र्य होते.[3] वैदिक समाजात स्त्रियांना सन्मानाने वागविले जाई. त्यांच्याकडे उदार दृष्टीकोणातून पाहिले जाई. 'स्त्री ही घरची सम्राज्ञी आहे' हा वैदिक संस्कृतीचा आदर्श होता. स्त्री ही आर्थिक बाबतीत अधिक क्रियाशील सहभाग घेत होती व धार्मिक कार्यात देखिल सहभाग दर्शवित होती. तसेच उपनयन संस्काराबाबतचे अधिक कार्य तीला होते. वैदिक काळात स्त्रीयांना गौरवपूर्ण स्थान प्राप्त झाले होते. विधवांबाबत तत्कालिन समाजाचा दृष्टीकोन उदारमतवादी होता. विधवा स्त्री पुनर्विवाह करू शकत होती व विवाह न करता चिरकाल ब्रम्हचर्य पाळून राहणा–या स्त्रियांकडे समाज आधुनिक काळाप्रमाणे उपहासाने व वाईट दृष्टीनी पाहत नव्हता.[4]

आर्यपूर्वकाळात स्त्रीचा दर्जा उच्च होता. हे मोहंजोदारो व हडप्पा येथील सापडलेल्या शिलालेखावरून स्पष्ट होते. उत्खननात सापडलेल्या मुर्तीवरून स्त्रीला देवत्व दिलेले आढळते. पुरूषांप्रमाणे स्त्रियांना तेव्हा स्वतंत्र बौध्दिक व आत्मिक जीवन होते. या जीवनाला आवश्यक असे उच्च शिक्षण त्यांना मुलांच्या बरोबरीने मिळत होते.[5]

मध्ययुगीन काळात भारतीय स्त्रीच्या दर्जामध्ये गौणता आली. यासाठी तत्कालीन परिस्थिती कारणीभूत होती. यवनांनी भारतावर हल्ले केल्यामुळे सर्वसामान्य स्त्रीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला होता. स्त्रीसंरक्षण म्हणून ब्राम्हणांनी जी बंधने घातली तीच हळूहळू तीला जाचक झाली व व्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटला जावू लागला. हिंदुत्वरक्षण स्त्री–चारित्र्याचे रक्षण व पावित्र्य या कल्पनांचे स्तोम वाढले. स्त्रीवर बंधने घातली तरीही तरूण मुली व स्त्रियांचे यवनांकडून अपहरण होऊ लागले. म्हणून स्त्रीच्या रक्षणार्थ पडदा पध्दतीची प्रथा रूढ झाली असावी.[6] मात्र मध्ययुगीन काळातील मोगल बादशाहांचा काळात अकबरासारखा स्त्रियांबाबतच्या सामाजिक प्रश्नांचा उदारपणे विचार करणारा दुसरा राजा झाला नाही. अकबराला बालविवाह, विधवे वरील धार्मिक बंधने, पूनर्विवाहास बंदी, बहुपत्नी विवाह, सतीप्रथा इ. रूढी अजिबात मान्य नव्हत्या. अकबराने आपल्या राजवटीत सतीप्रथा बंदी करण्याचा प्रयत्न केला. मुलीच्या विवाहाचे वय 14 पेक्षा कमी असू नये असे सांगितले. वयस्कर स्त्रीयांनी सार्वजनिक प्रसंगी बुरखा न घेता भाग घ्यावा. वेश्यांनी स्वतंत्र वस्ती करून राहावे इ. अशाप्रकारे अकबराने स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने धाडसी सुधारणा अंमलात आणण्याचा प्रयत्न केला.[7] हजारो वर्षापासून जोपासत आलेला दृष्टीकोण ब्रिटिश येथे येऊन स्थिर होईपर्यत समाजात तसाच रूढ होता. ब्रिटिश सुधारणावादी होते. त्यांनी काही सुधारणा भारतात घडवून आणल्या.

**स्वतंत्र भारतातील स्त्रियांचा दर्जा** : – भारतात परिवर्तनाची प्रकिया ख–या अर्थाने स्वातंत्र्यानंतर सुरू झाली. 'शुद्र' आणि 'स्त्री' हयांच्या दृष्टीने फार महत्वाचे निर्णय घेण्यात आले. भारतीय स्त्रीच्या वाटयाला स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत दुःख, दास्य, छळ, अवहेलना होत होती. यामुळे तिला आपल्या माणूसपणाची जाणीवच नव्हती. 'जाचू नको राया, तुमच्या पायाची दासी राहिन मी उपासी, घास घालीन तुपासी' असे म्हणत ती त्यागाची परिसिमा गाठत होती.[8] स्त्री जीवनात मुख्य बदल स्वातंत्र्यानंतर घडून आले.

स्वतंत्र भारताच्या संविधानात मूलभूत अधिकाराच्या अंतर्गत समतेचा अधिकार बहाल करण्यात आला. स्त्री–पुरूष दोघांना समान हक्क जाणीवपुर्वक बहाल केले आहेत. स्त्रियांबाबत विशेष कायदे निर्माण करण्यात आले. स्त्रीला कायद्याने समानता मिळाली पण तिच्या दर्जात सुधारणा झाली काय ? हा प्रश्न आज ही अनुत्तरीत आहे. जेव्हा की, सरकारने नवे महिलांविषयक धोरणामध्ये नव–याच्या संपत्तीमध्ये अधिकार, घराच्या रजिस्ट्रीमध्ये पत्नीचे नाव, इ. प्रकारच्या समान संधी स्त्रियांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत. नवनविन धोरणांनी पुन्हा नविन संधीचा लाभ स्त्रियांना मिळणार आहे. तो आता कितपत होता हे काळच ठरवील. प्रत्यक्षात मात्र गेल्या काही दशकात स्त्रियांकरिता कल्याणकारी योजना ख–या अर्थाने राबविण्यात आल्या नाहीत. काम करणा–या स्त्रियांच्या कल्याणकारी योजनासंबंधीचे विधेयक 1985 (Working Women's Welfare Bill) हे खाजगी विधेयक मॉर्क्सवादी खासदार श्रीमती विभा घोष यांनी लोकसभेत सादर केले. त्यात ब–याच योजनांचा समावेश करण्यात आला होता व कायदयातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.[9] पण कायदयातील पळवाटा आणि अकार्यक्षम शासकीय यंत्रणा यामुळे सर्व कायदे कुचकामी ठरले.

**2001 महिला सबलीकरण वर्ष** :– 2001 हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून घोषित झाले. महिलांच्या सबलीकरणाची गरज वाटू लागली. हे यावरून जाणवते सक्षमीकरण किंवा सबलीकरण म्हणजे अधिकारात वाढ होणे.[10] महिलांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर कसे करावे याची जाणीव करून देणे. यासाठी अनेक समित्या–आयोग निर्माण केले गेले. महिलांच्या विकासासाठी व त्यांच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी शासनाने अनेक कायदे करून महिलांना सोयी सुविधा प्रदान करण्याचा प्रयत्न केला व याद्वारे स्त्री–पुरूष भेद नष्ट करून त्याच्यात योग्य समन्वय साधण्याचा प्रयत्न सर्व पातळीवर करण्यात आला. बालविवाह, हुंडाबळी, नवजात मुलींची हत्या, बलात्कार, लैगिंक शोषण, विनयभंग, वडिलांच्या संपत्तीतील वाटा इ. बाबतच्या कायद्यांची जाणीव

महिलांना करून देण्यात आली. महिलांचा सर्वागिंण विकास करण्याचा प्रयत्न शासनानी आरंभिला आहे.

**महिला सबलीकरणासाठी आवश्यक बाबी :–**

**1. राज्यसंस्थेची भूमिका –** United Nation Development Project 1995 च्या मानवी विकास अहवालातील जागतिक आकडेवारी ही स्त्रिया अनेक बाबतीत वंचित आहेत याची साक्ष देते. लोकसंख्येत साधारण निम्म्या असणा–या स्त्रियांचे जगभरातील गरिबीमध्ये प्रमाण मात्र 70 टक्के व निरक्षरांमध्ये प्रमाण 66 टक्के आहे. सत्तास्थानी असणा–या स्त्रियांचे प्रमाण नगण्य आहे. प्रशासकीय व व्यवस्थापकीय जागांवर 14 टक्के आहेत. विधीमंडळात 10 टक्के व मंत्रिमंडळात 06 टक्के प्रमाण स्त्री प्रतिनिधित्वांचे आहे.[11] त्याचप्रमाणे United Nation Development Project 2014 च्या मानवी विकास अहवाल समाधान कारक नाही. UNDP 2014 अहवालानुसार 187 देशांमध्ये भारताचा 135 वा क्रमांक आहे. यावरून हे स्पष्ट होते की, विविध सोयी सवलती पासून भारतीय व्यक्ती वंचीत आहे. महिला सत्तास्थानापासून वंचित आहेत. कोणत्याही व्यक्तीचे स्थान तिच्या सत्तास्थानावर अवलंबून असते. सत्ता प्राप्त झाली की सामर्थ्य निर्माण होत असते. स्त्रियांच्या सामर्थ्यशीलतेचा विचार करतांना UNDP च्या Gender Empowerment Measure चे निकष लक्षात घेतले जातात. GEM मध्ये स्त्रियांचा आर्थिक, व्यावसायिक व राजकीय निर्णय प्रकियेतील सहभाग विचारात घेण्यात येतो. भारतात स्त्रियांचा राजकीय क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी राखीव जागांचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. लोकसभा व विधानसभेत महिलांना 30 टक्के आरक्षण प्राप्त व्हावं ही मागणी महिला चळवळीची प्रलंबित असली तरी, 1993 मध्ये 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती करण्यात आली व त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेत 33 टक्के आरक्षण महिलांना प्राप्त झाले. एवढेच नाही तर केन्द्रिय मंत्रिमंडळाने (2011) केलेल्या शिफारशी नुसार अनेक राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 50 टक्के आरक्षण महिलांना दिले आहे व राजकीय क्षेत्रात महिलांचे सबलीकरण घडवून आणण्याचा प्रयत्न शासनाने आरंभिला आहे. त्याचबरोबर आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण आवश्यक आहे.

**2. आर्थिक क्षेत्रात सबलीकरण** – भारत हा कृषीप्रधान देश आहे. अनेक उद्योग हे कृषीवर आधारित आहेत. कृषी व्यवसायात महिलांचा सहभाग परंपरने चालत आला आहे. 80 टक्के महिला कृषी व्यवसायात सक्रिय आहेत. त्यापैकी 34 टक्के महिला शेती कामगार म्हणून काम करत आहेत. तर 48 टक्के महिला स्वतःची शेती सांभाळत आहेत. नुकत्याच केलेल्या एका संशोधनानुसार असे आढळले की, 18 टक्के शेतकरी कुटुंबे स्त्रियांवर अवलंबून आहेत.[12] त्यामुळे कृषी विषयक क्षेत्रात सबलीकरण घडवून आणण्यासाठी काही स्वयंसेवी संघटना पुढे आलेल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे **एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशन** आहे. या संस्थेचा 'महिला किसान सबलीकरण प्रकल्प' महिलांना शेतीसाठी पाठिंबा देतो. 2008 मध्ये स्थापण केलेल्या या संस्थेने शेतकरी महिलांना आर्थिक सहाय्य, शेतीविषयक मार्गदर्शन देणे आणि ग्रामीण स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविणे हेच आपले उद्दिष्टे बनवले.[13] या संस्थेचे कार्य सराहनीय आहे. याच प्रमाणे अनेक संस्था भारतात आहेत. त्या प्रत्येक संस्थेची दखल घेतली जाते असे नाही. अनेक एन.जी. ओ. महिलांचा आर्थिक क्षेत्रात विकास करण्यासाठी कार्यरत आहेत आणि हे आवश्यक आहे.

राज्यघटनेनुसार संपत्तीत स्त्री व पुरूष यांना समान हक्क असला तरीही ग्रामीण भागात आर्थिक बाबतीत असमानता आढळते. बहुतांशी महिला दुस–यांच्या शेतात बिनपगारी मजुर म्हणून काम करत आहेत आणि पगार मिळालाच तर पुरूषाच्या तुलनेत स्त्रियांना अतिशय कमी मजूरी मिळते. रोजगार बंद होऊ नये म्हणून स्त्रिया देखील हक्कासाठी आवाज उठवत नाहीत. जी मानसिकता स्त्रियांची तीच त्यांच्या मुलीची 'तुमची स्वतःची शेतजमीन असावी असे तुम्हाला नाही का वाटतं'? असा प्रश्न विचारल्यावर बहुतेक मुली म्हणतात 'कशाला हवी स्वतःची शेती ? लग्नानंतर आमचा नवरा सांभाळेल ना आम्हाला' एकविसाव्या शतकातल्या स्त्रिया जर अशाप्रकारे परावलंबी राहू लागल्या तर.....[14]

**3. महिला बचत गट** – महिला बचत गटामुळे महिलांचा आर्थिक स्तर उंचावला आहे. त्या स्वावलंबी झाल्या आहेत. आणि त्यांचे आर्थिक सबलीकरण होत आहे. 1998 पासून महिलांच्या बचत गटाने आकार घेतला आहे. अगदी 10 महिला सदस्य पासून सुरू होणा–या बचत गटांनी आज यशाचे अनेक क्षेत्र पादाक्रांत केले आहे. पाळणाघर चालविण्यापासून तर चित्रपट निर्मिती पर्यंत अशा अनेक उद्योगात महिला

कार्यरत आहेत. आज महाराष्ट्रात 2.5 लाख महिला बचत गट कार्यरत असून (इ.स.2008) त्यातील जवळपास निम्मे बचत गट हे बॅकांशी संलग्न आहेत. विखुरलेल्या महिला बचत गटांचा एकत्रित आढावा घेतला तर निश्चितपणे महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील फार मोठा हिस्सा त्यांच्या ताब्यात असल्याचेच लक्षात येईल. बचत गटांमुळे महिलांच्या सबलीकरणाची प्रक्रिया ख–या अर्थाने प्रत्यक्षात येऊ लागलेली आहे.[15]

**4. शिक्षण–सबलीकरणाचा मूलभूत घटक –** स्त्री सबलीकरणात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. कारण शिक्षणाचे प्रमाण वाढले तर अपेक्षित विकास साध्य करणे शक्य होते. 1998–99 च्या जागतिक अहवालानुसार स्त्री शिक्षण हे आर्थिक विकासासाठी तर आवश्यक आहे. त्याचबरोबर स्त्रियामधील सुप्त गुणांचा विकास घडून आणणे, त्याच्या व्यक्तीमत्वाला नविन आकार देणे, नविन क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यासाठी पात्र बनविणे यासाठी शिक्षण ही प्राथमिक गरज आहे. स्त्री शिक्षणाबद्दल तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी 30 मार्च 1984 रोजी नवी दिल्लीत झालेल्या सातव्या अखील भारतीय मुस्लिम शिक्षण संमेलनात विचार व्यक्त केले होते. त्या म्हणाल्या की, ''वर्तमान सामाजिक संरचनेत स्त्रियांवर मोठे ओझे आहे, स्त्रिया या घर चालवतात, तशाच नवी पिढी घडवतात. एवढेच नाही तर इतर कामामध्ये देखील हातभार लावतात. अशा परिस्थितीत शिक्षण महत्वाची भूमिका पार पाडते, शिक्षण स्वाभिमानाची भावना जागृत करते, म्हणून शिक्षण हे स्त्री सबलीकरणासाठी आवश्यक आहे ''.[16]

**5. सामूहिक प्रयत्नाची गरज** – महिलांचे सबलीकरण करण्याची प्रक्रिया ही सुरूच आहे. मात्र त्यातील त्यांचा सहभाग व समाजातील सर्वच घटकांचा सामूहिक प्रयत्न देखील तितकाच महत्वाचा आहे. सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचे महत्व अथवा अनिवार्यता ही सातत्याने बिंबली गेली पाहिजे. वेगवेगळे प्रकल्प, उपक्रम तसेच त्यातील महिलांचा अधिकाधिक सहभाग, त्यातील गुणवत्ता अथवा परिणाम हे साहजिकच या प्रक्रियेला हातभार लावत असतात. वास्तविक समाजाच्या सुख, समुध्दी आणि भरभराटीसाठी महिलांचे सबलीकरण हे अत्यंत महत्वाचे असून या गोष्टीवर प्रामुख्याने वा अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

**6. समान संधीची आवश्यकता** – केवळ शिक्षण देऊन महिलांविषयी जवाबदारी पूर्ण झाली आहे असे म्हणता येणार नाही. तर या महिलांना आधुनिक काळात सामाजिक, औद्योगिक व राजकीय क्षेत्रात जाणीवपूर्वक समान संधी दिल्या गेल्या पाहिजे. काही बाबतीत नियमांची शिथिलता करण्याची गरज आहे. आरक्षण हा त्याच्यावर एकमात्र उपाय होणार नाही. परंतू गुणवत्तेच्या समिकरणाला महिलांच्या सबलीकरणाची निकड देखील विचारात घेतली गेली पाहिजे. त्यामुळे निश्चितपणे तळागाळातील कर्तबगार महिलांना योग्य संधी मिळू शकेल व त्याचे सबलीकरणाची प्रक्रिया अधिकाधिक परिणामकारकरित्या पुढे येईल आणि हा वारसा भविष्यात जोपासला जावू शकेल.

आपल्या जाणीवांविषयी व हक्कांविषयी महिलांनी जागरूक होणे आवश्यक आहे. त्यांनी प्रत्येक संधीचा लाभ घेण्यासाठी व त्यातून आपली गुणवत्ता सिध्द करण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे. आपल्या विकासप्रक्रियेला जोपर्यंत ती स्वतः समजून घेत नाही. तोपर्यंत तिच्या मार्गात हे अडथळे येणारच. जेव्हा तिला तिच्यातील सक्षमतेची जाणीव तीव्रतेने होईल. त्यावेळी आपल्या मार्गातील अडथळे ती स्वतः दूर करू शकेल व सबलीकरणाचा मार्ग मोकळा होईल.

भारतातील तत्कालीन पहिल्या महिला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई देविसींग पाटील, यांनी दिनांक 16 फेब्रुवारी 2008 मध्ये 'मुख्यमंत्री कन्या विवाह योजने' चे उद्घाटन करतांना पाटणा येथे दिलेले भाषण संपूर्ण महिला वर्गाला प्रोत्साहित करणारे आहे. त्या म्हणतात..

'हटवा अडथळे सारे, मार्गातील माझ्या
आणि करा दूर शंका मनीच्या,
ओळखा शक्तीला जग बदलण्याच्या,
सोबतीने सर्वाच्या वाटचाल करू द्या मजला'

---

संदर्भ सूची :

1. रॉय अनुपमा , 'महिला सक्षमीकरण : मुद्दे आणि प्रश्न ' योजना, ऑक्टोंबर 2008 पृ. 07
2. कित्ता पृ. 07.
3. Sapru R.K. 1989, 'Women and Development' Ashish Publication, New Delhi, p.232
4. भाई, विशाखा वंसतराव, 'स्त्रियांबद्दल सकारात्मक मानसिकतेची गरज' महिला सबलीकरण एक दृष्टीकोन, प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळ नागपूर विद्यापीठ. 2002 पृ. 10
5. परूळेकर, आशा ' स्त्री आणि स्त्रीत्व' उन्मेष प्रकाशन, पूणे 1995, पृ.11
6. कित्ता. पृ.14

7. काळदाते, सुधा, 'भारतीय समाज रचना' भारत मुद्रक आणि प्रकाशन, औरंगाबाद 1976, पृ. 145
8. इंगोले प्रतिमा, 'स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकीकरण' सोनल प्रकाश्न अमरावती 1998 पृ.16
9. मेहेन्ने स्मीता, ' भारतीय स्त्री आणि मानवाधिकार' साईनाथ प्रकाशन नागपूर 2011 पृ. 92
10. जोहरापूरकर हेमलता, 'महिला सबलीकरण एक दृष्टीकोन प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळ नागपूर विद्यापीठ. 2002 पृ.24
11. यादव प्रेमा, 'स्त्रीयांचे सबलीकरण', योजना ऑक्टोबर 2008 पृ. 13
12. मार्मिक व्यंगचित्र साप्ताहिक, 8 जुलै 2012, संस्थापक संपादक– बाळ ठाकरे पृ.12
13. कित्ता, पृ. 13
14. कित्ता पृ. 14
15. शिंदे अशोक, ' महिलांच्या सबलीकरणासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज' योजना ऑक्टोबर 2008 पृ.31
16. मुजावर रमजान, ' स्त्री सबलीकरणाची गरज' योजना ऑक्टोंबर 2008 पृ. 20.

# नागपूर विभागातील मुख्य शहरात गणेशोत्सवात ध्वनी प्रदूषणाची वाढती समस्या

**प्रा. जयंतकुमार मस्के,** अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर

ध्वनी हा पर्यावरणाचा एक महत्वाचा घटक आहे. ध्वनीची पातळी ठराविक मर्यादेपलिकडे गेली म्हणजे ध्वनी त्रासदायक होतो व त्याचे ध्वनीप्रदूषणात रूपांतर होते. पर्यावरणात उत्पन्न होणा–या भयंकर आवाज आणि गोंगाटातून ध्वनी प्रदूषणाची समस्या उद्‌भवते. ध्वनी प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होऊन पर्यावरणाची स्थिती ढासळू शकते. डायमंड अर्थशास्त्र कोशमध्ये दिल्याप्रमाणे – ''व्यक्तीच्या दैनंदिन कार्यात अडथळा आणणा–या अवांच्छनीय, त्रासदायक अपायकारक आवाजास ध्वनीप्रदूषण म्हणतात.''[1]

ध्वनीप्रदूषण ही पूर्णपणे मानवनिर्मित समस्या आहे. जगाच्या वाढत्या लोकसंख्येबरोबरच आवाजाचे प्रदूषणही वाढत आहे. लोकसंख्या वाढीबरोबर ध्वनीप्रदूषणास कारणीभूत असलेले घटक म्हणजे उद्योगधंदे, स्वयंचलित वाहने, विमाने, सण, उत्सव, रहदारी इत्यादी गोष्टीही मोठया प्रमाणात वाढल्या आहेत.[2] वाढत्या शहरीकरणाबरोबर ध्वनी प्रदूषणाची समस्या वाढत आहे. कारण शहरामध्ये वाहने, उद्योगधंदे मोठया प्रमाणात असतात. तसेच तेथे सण, उत्सवांनाही उधान आलेले आहे. त्यामुळे शहरी भागात मोठे ध्वनी नेहमीच निर्माण होत असतात. इतर प्रदूषणकारी घटकांप्रमाणेच मोठा ध्वनी हा पर्यावरण प्रदूषक आहे. त्यामुळे माणसाचे आरोग्य तर बिघडतेच पण मृत्यू ही ओढावते. ध्वनी प्रदूषणामुळे बहिरेपणा, कर्णबधिरत्व, मधुमेह, हृदयरोग, रक्तदाब वाढणे तसेच मानसिक व शारीरिक असंतूलन सारखे आजार होऊ शकतात. ध्वनीची तीव्रता ही डेसिबल (Decibel db) या एककात मोजतात. डेसिबल हा एकक लॉगॅरिथामिक एकक असून एक दशांश बल म्हणजे एक डेसिबल होय. डेसिबल प्रमाणात ऐकू येण्या–जोगा कमीत–कमी आवाज म्हणजे नाडीचे ठोके समजून तो आवाज 10 डेसिबल समजला जातो. दर 10 डेसिबल ने आवाजाची तीव्रता दुप्पट होते. 50 डेसिबल तीव्रतेचा आवाज 40 डेसिबलपेक्षा दहापट तीव्र असतो. जास्तीत जास्त 80 डेसिबल पर्यंतचा आवाज माणूस त्रासाविना ऐकू शकतो. परंतु 80 डेसिबल तीव्रतेच्या पुढील ध्वनी मात्र एक प्रदूषक घटकच मानला जातो आणि त्यामुळे आपल्याला तो आवाज कानाच्या श्रवणशक्तीवर दुष्परिणाम करणारा ठरतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मापदंडानुसार शहरामध्ये 45 डेसिबल आवाजाची पातही सुरक्षित मालनी गेली आहे.[3] केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने औद्योगिक, व्यापारी, निवासी व शांत क्षेत्रासाठी ध्वनीप्रदूषणाची मर्यादा निश्चित केली आहे. या चारही क्षेत्रासाठी ध्वनीची मर्यादा दिवसाकरीता अनुक्रमे 75 डेसिबल, 65 डेसिबल, 55 डेसिबल व 50 डेसिबल व रात्रीकरीता अनुक्रमे 70 डेसिबल, 55 डेसिबल, 45 डेसिबल व 40 डेसिबल असावे. मात्र सन 2002 मध्ये नागपूर महानगरपालिकेच्या जवळ ध्वनीची तीव्रता औद्योगिक, व्यापारी, निवासी व शांत या क्षेत्रासाठी अनुक्रमे 87.17 डेसिबल, 83.7 डेसिबल, 78.3 डेसिबल, 76.8 डेसिबल होते. यावरून मंडळाने प्रत्येक क्षेत्रासाठी निश्चित केलेली ध्वनीची मर्यादा नागपूर शहराने केव्हाची ओलांडली आहे.[4] महाराष्ट्रात वाहनामुळे व उद्योगांमुळे होणा–या ध्वनीप्रदूषणाबरोबरच विविध सण व समारंभाच्या वेळी होणारे ध्वनीप्रदूषण हे अत्यंत तीव्र स्वरूपाचे आहे.[5] गणेशोत्सवामध्ये ढोलताशांची

ढणढणाट, डॉल्बी, डीजे, बेंजोच्या कर्णकर्कश आवाजामुळे शहरातील शाळा, महाविद्यालये, हॉस्पीटल, पोलिस मुख्यालय आणि सरकारी कार्यालये परिसर अशा शांतता क्षेत्रातही आवाजाची मर्यादा पाळली जात नाही. ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी ध्वनीप्रदूषण अधिनियम 2000 तयार करण्यात आला. या अधिनियमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पोलिस दलावर आहे. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी आणि नंतर आवाजाची पातळी स्थानिक पोलिस ठाणाच्या स्तरावर तपासली जाणे आवश्यक आहे. मर्यादा ओलांडण्या–याला पाच वर्षे कारावास आणि एक लाख रूपये दंडाची तरतूद आहे.

तक्त्यामध्ये नागपूर विभागातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा व नागपूर शहरात गणेशोत्सवाच्या वेळी (दिनांक 15 सप्टेंबर 2007) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ध्वनीच्या प्रदूषणाचे प्रमाण दर्शविलेले आहे.

**नागपूर विभागातील काही मुख्य शहरात ध्वनीची तीव्रता**

(Sound Level – db Leq. 15 Sep. 2007)

| अ. क्र. | स्थळ | ध्वनीची तिव्रता (Leq. db) |
|---|---|---|
| | नागपूर | |
| 1 | राम नगर चौक | 79.2 dB |
| 2 | झाशीराणी चौक | 82.5 dB |
| 3 | रेशिमबाग चौक | 89.2 dB |
| 4 | कमाल चौक | 88.3 dB |
| 5 | बडकस चौक | 88.9 dB |
| 6 | मेडीकल चौक | 81.9 dB |
| | वर्धा | |
| 1 | झाशी चौक | 90.6 dB |
| 2 | राम नगर | 97.7 dB |
| 3 | मेन मार्केट एरिया | 98.8 dB |
| 4 | कॉटन मार्केट जवळ | 98.8 dB |
| 5 | हनुमान टेकडी जवळ | 87.8 dB |
| 6 | पवनार ब्रिज | 83.7 dB |
| | चंद्रपूर | |
| 1 | महाकाली चौक | 84.6 dB |
| 2 | गांधी चौक | 90.2 dB |
| 3 | जेटपुरा गेट | 91.3 dB |
| 4 | प्रियदर्शनी चौक | 80.3 dB |
| 5 | वरोरा चौक | 86.3 dB |
| | भंडारा | |
| 1 | राजीव गांधी चौक | 79.8 dB |
| | गोंदिया | |
| 1 | सिव्हील लाईन | 73.5 dB |

Source – Monitoring of Noise Pollution during Ganesh Festival, 2007, Maharashtra Pollution Control Board.

शहरातील ध्वनीची तीव्रता 80 डेसिबलपेक्षा अधिक असल्यास त्रासदायक व 90 डेसिबलपेक्षा अधिक असल्यास बहिरेपणास सुरूवात करणारी असते. नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर व भंडारा शहरातील विविध चौकांमध्ये गणेश उत्सवाच्या पहिल्या दिवशी ध्वनीची तीव्रता मोजली असता बहुतांश चौकांमध्ये ध्वनीप्रदूषण हे 80 डेसिबल च्या जवळपास किंवा 80 डेसिबलपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. वर्धा शहरातील झाशी चौक, रामनगर, मेन मार्केट एरिया व कॉटन मार्केट जवळ तसेच चंद्रपूर शहरातील गांधी चौक व जेटपुरा गेट जवळ ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण 90 डेसिबल पेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. नागपूर विभागातील जिल्हा मुख्यालय असणा–या शहरात सार्वजनिक ठिकाणी ध्वनीचे प्रमाण मर्यादेपेक्षा अधिक आहे. यावरून गणेशोत्सव सारख्या सनाच्या वेळी ध्वनीप्रदूषण हे उच्च पातळीवर असते. तसेच यामुळे शांतता भंग होते याची दखलच घेतली जात नसल्याची स्थिती सर्व शहरात दिसून येते.

शहरी भागातील ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी कडक कायदे, त्याची ठोस अंमलबजावणी व नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. ध्वनीप्रदूषण अधिनियम 2000 तयार करण्यात आला मात्र या अधिनियमाकडे दुर्लक्ष केले जात आहे. या अधिनियमाअंतर्गत ध्वनीप्रतिबंधक क्षेत्रामध्ये ध्वनीप्रदूषण करणा–यांवर कडक कार्यवाही करीत ध्वनीप्रदूषण करणारे साहित्य जप्त करण्याचे अधिकार पोलिसांना आहेत. मात्र असे नियम तोडले जात असतांनाही शहरात पोलिसांकडून कानाडोळा केल्या जात आहे. ध्वनीप्रदूषणाबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारीवर पोलिसांनी त्वरीत कार्यवाही करावी. सन उत्सवाच्या वेळी मोठया शक्तीचे ध्नवीवर्धक वापरण्यावर बंदी असावी.

**संदर्भ :**


1. रारावीकर यशवंत, गोडबोले वि. ज., बोर्जेस जॉन्सन (2008) : ''डायमंड अर्थशास्त्र कोश'', डायमंड पब्लिकेशन, पुणे. पृ. 582.
2. पवार किशोर, पवार नलिनी (2009) : उपरोक्त. पृ. 103.
3. कित्ता, पृ. 108.
4. State of Environment Report, Op. Cit. P. 134.
5. वावरे अनिल कृष्णराव, उपरोक्त. पृ. 260.

# ग्रामीण विकासात राष्ट्रसंताचे तत्वज्ञान व श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे कार्य

**प्रा. धनराज चौखुंडे,** सहयोगी प्राध्यापक, आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा

वंदनीय राष्ट्रसंतानी ''जे जे गावी शहाने झाले । शक्ती–युक्तीने पुढे निघाले। ते सर्व शहराकडे धावले। म्हणोनी माजले रान येथे ।। (12.29) अशी कारणमिमांसा केलेली आहे. तणकराने माजलेले रान तसेच ठेवायचे नाही आणि हे पडीत रान उठविण्यासाठी शक्तीयुक्तीने पुढे गेलेल्या व्यक्ती आपल्या खेडयाचा विकास करण्यासाठी परत येणे शक्य नाही म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजींनी खेड्यातील साध्याभोळया अशिक्षित ग्रामनाथांना एकत्र येऊन आपल्याच बळावर उपलब्ध साधनांचा उपयोग करूण ग्रामविकास करण्याचा हितोपदेश ग्रामगीतेच्या माध्यमातून केलेला आहे. याकरीता राष्ट्रसंतानी ग्रामसंघटना उभारण्याचा प्रथम प्रयत्न करावा असे सुचविलेले आहे. ही ग्रामसंघटना सर्व जाती–धर्माच्या लोकांचा समन्वय साधणारी असली पाहिजे यासाठी त्यांनी सामुदायीक प्रार्थनेचे व्यासपीठ गावोगाव उभारले. आपण सर्व एकची आहो (26.67) हा विचार प्रत्येक मनुष्याच्या हृदयात शिरावा यासाठी त्यांनी सत्य सांगीतले. सामुदायीक प्रार्थना, सामुदायीक ध्यान, रामधुन ही उत्कृष्ठ साधने आहेत; असे राष्ट्रसंताचे मत आहे. आणि त्यांनी त्यांच्या काळात आदर्श ग्रामरचनेचे प्रात्यक्षिक करूण थोरामोठयांना दाखविले. 'आदर्श आमगाव' पाहण्यासाठी गुलझारीलाल नंदा, जयप्रकाश नारायण, लालबहादूर शास्त्री, द्वारकाप्रसाद मिश्र, वैराग्यमूर्ती गाडगे महाराज येऊन गेले होते. आजही राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेच्या आधारे अनेक गाव आदर्श करण्याचे प्रयत्न सुरूच आहे. राष्ट्रसंताच्या ग्रामीण विकासाच्या तत्वज्ञानामध्ये उच्च ज्ञानाची विद्यालये गावीच उभारावी, गावाच्या बळबुध्दीचा उपयोग करावा, नव–नवीन प्रयोग करावेत, बचत हीच संपत्ती, कोर्ट कचेऱ्या करणे थांबविले पाहीजे, गोवंशाकडे लक्ष द्यावे, व्यवहार चतूर गाव करावे, ग्रामोद्योगांना चालना द्यावी, भोळेपणाचा त्याग करावा, अंधश्रध्दा निर्मुलनाकडे विशेष लक्ष द्यावे, कर्ज वेळीच परत करावे, स्वच्छतेचे पाठ सर्वानां द्यावे, सणोत्सवात सहभाग घ्यावे, दुर्वसनापासून मूक्त रहावे, ग्रामसंघटना उभाराव्या इत्यादी ग्रामीण विकासाशी तत्वज्ञानाचा समावेश आहे.

''देशकाल समया वरती ऋषी नेते होऊनी येती, परिवर्तन धर्मा देती'' या निसर्ग नियमानुसार या एकविसाच्या शतकात जीवनात समत्व घडवून आणणारी समाजरचना बनविण्याकरीता व्यक्तीत्व बाजूला सारून सामुदायीकत्व समोर आणण्याकरीता प्रत्येक गावात स्वावलंबी, स्वंयशासीत व स्वयंपूर्ण बनविण्याकरीता, सर्व धर्माचा समन्वय करून गावापासून विश्वापर्यंत शांतता व एकात्मता घडविण्याकरीता राष्ट्रसंतानी सर्व ग्रंथाचा सार असलेला गुरूशास्त्र संमत असा ग्रामगीता ग्रंथराज निर्माण केला. हे कार्य साकार करण्याकरीता प्रत्येक गावात श्रीगुरूदेव सेवा मंडळाची स्थापना व्हावी याकरीता प्रथम 1943 साली श्रीगुरूदेव मंडळाची स्थापना केली. अश्या या गुरूदेव सेवा मंडळाच्या भारतात 40 हजार च्यावर शाखा स्थापन झाल्या. या मंडळाला प्रेरक, मार्गदर्शक व स्फुर्तीदायक असा भव्य श्रीगुरूदेव सेवाश्रम गुरूकुंज मोझरी येथे तयार झाला. 1963 साली अ. भा. श्रीगुरूदेव सेवा मंडळाची संस्था रजिस्ट्रर झाली. सर्वात महत्वाचे म्हणजे 1961 मध्ये खामगाव बुलढाना येथे जाहीर कार्यक्रमात राष्ट्रसंतानी श्रीगुरूदेव सेवा मंडळाच्या संदर्भात ''हे गुरूदेव सेवा मंडळ तत्वज्ञान जे भारतात जन्माला आले ते 2 हजार वर्षाचे आयुष्य घेऊन आलेले आहे. या आयुष्याचे मानाने आज तत्वज्ञानाचे 50/60 वर्षाचे वय म्हणजे अगदी बालपणच आहे'' असे मोठया आवेश्यात म्हणाले होते. आज त्या दृष्टीने आत्मानुसंधान अड्याळ टेकळी, जि. चंद्रपुर, मु. जवळा (आर्णी) जि. यवतमाळ, मु. दारौडा जि. वर्धा, आंबोडा जि. बुलढाना, गुरूकुंज मोझरी जि. अमरावती, जामधरी जि. नांदेळ, मोवाळ जि. नागपूर, भुताई जि. आदिलाबाद, पंढरपूर जि. सोलापूर इ. ठिकाणी मुख्य केंद्रस्थाने निर्माण होऊन अनेक शाखा निर्माण झालेल्या आहेत.

अध्ययनाचे उद्देशः– विषयाचे काही प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे ठेवण्यात आलेले होते. 1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या तत्वज्ञानातील ग्रामीण विकासाची संकल्पना, दिशा व पैलू यांचे अध्ययन करणे. 2) ग्रामविकास प्रयोगात यशस्वी झालेल्या गावातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तनाची माहिती जाणून घेणे. 3) ग्रामीण विकासात श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे कार्य व त्यांची भूमिका कशी असते याचे अध्ययन करणे.

**अध्ययनाची उपकल्पनाः**– 1) ग्रामीण समाजातील सर्व घटकांचा विकास हेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या तत्वज्ञानातील अंतीम ध्येय्य आहे. 2) श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे कार्य व भूमिका ग्रामीण विकासात अत्यंत महत्वाची आहे.

**अध्ययनाचे क्षेत्रः**– गुरूकुंज सेवाश्रम मोझरी जि. अमरावती व भुवैकुंठ आत्मानुसंधान केंद्र अडयाळ टेकळी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर संलग्नीत चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा जिल्हयातील वास्तव्यात कार्यरत असलेले 300 श्रीगुरूदेव सेवा मंडळे हे अध्ययनाचे क्षेत्र आहे.

**नमूना निवडः**– प्रस्तुत अध्ययनात पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्हयातील प्रती जिल्हा 60 श्रीगुरूदेव सेवा मंडळाची अध्ययनाकरीता गैरसंभाव्यता नमूना निवड पद्धतीपैकी सोयीस्कर नमूना निवडीद्वारे एकूण 300 श्रीगुरूदेव सेवा मंडळांची निवड उत्तरदाते म्हणून करण्यात आली.

**तथ्य संकलन पद्धतीः**– प्राथमिक स्त्रोतः– संशोधन कार्य यशस्वी होण्यासाठी तथ्य संकलनाच्या वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करण्यात आला. यात मुलाखत अनुसूचीद्वारा उपयुक्त माहिती उत्तरदात्यांकडून भरण्यात आली. याकरीता अनुसूचीमध्ये बंद व मुक्त प्रश्नांचा समावेश करण्यात आला.

**द्वितीय स्त्रोतः**– द्वितीयक स्वरूपाची माहिती वर्तमानपत्रे, मासिके, ग्रंथाचा वापर करून उपयुक्त माहिती मिळविता आली. तसेच ग्रामसभा, लोकांचे अनुभव, व गावाशी संबंधीत शासकीय कार्यालये यांच्या माध्यमातून माहितीचे संकलन करण्यात आले.

**संशोधन आराखडाः**– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ग्रामीण विकासाशी असलेले तत्वज्ञान काय आहे व यामध्ये श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे कार्य व भूमिका कशी आहे यादृष्टीने प्रस्तुत अध्यनाचा आराखडा हा वर्णनात्मक व अंशतः निदानात्मक स्वरूपाचा ठेवण्यात आलेला आहे.

**तथ्य विश्लेशण आणि निर्वचनः**– अ) तथ्य संपादन ब) वर्गीकरण क) संकेतीकरण ड) मास्टर चार्ट इ) सारणीयन आणि विश्लेषण.

**अध्ययनाचा कालावधीः**– मार्च 2013 ते जानेवारी 2015.

उत्तरदात्यांकडून प्राप्त मतांचा विचार करता खालील सारण्यांच्या माध्यमातून राष्ट्रसंताचे ग्रामीण विकास तत्वज्ञान व श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे कार्य व भूमिका स्पष्ट करता येते.

सारणी क्र. 1

श्रीगुरूदेव सेवा मंडळामार्फत ग्रामीण विकासाचे कार्यक्रम

| अ. क्र. | कार्यक्रम | पुर्णतः यशस्वी | अंशतः यशस्वी | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | बालसंस्कार शिबीर | 26 (8.67) | 04 (1.33) | 30 | 10 |
| 2. | व्यक्तीमत्व विकास शिबीर | 13 (4.33) | 17 (5.67) | 30 | 10 |
| 3. | ध्यान प्रार्थना | 49 (16.33) | 11 (3.67) | 60 | 20 |
| 4. | प्रबोधनात्मक कार्यक्रम | 130 (43.33) | 20 (6.67) | 150 | 50 |
| 5. | वरील सर्व | 21 (7.00) | 09 (3.00) | 30 | 10 |
| | एकुण : | 239 | 61 | 300 | 100 |

वरिल सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, श्रीगुरूदेव सेवा मंडळामार्फत ग्रामीण विकासाचे दृष्टीकोणातून जे कार्यक्रम राबविले जातात त्यात प्रामुख्याने प्रबोधनात्मक कार्यक्रम असतात ते 50 टक्के यशस्वी होतात असे स्पष्ट होते. तरीसुध्दा संपूर्ण कार्यक्रम हे 10.00 टक्के यशस्वी होतात असेही मत व्यक्त करतात त्यामूळे राबविले जाणारे कार्यक्रम हे शेकडा प्रमाण 60 टक्के यशस्वी होतात हे सिध्द होते व हे प्रमाण सर्वाधिक आहे.

सारणी क्र. 2

अ.भा. श्रीगुरुदेव सेवा मंडळाचा गावात स्विकार

| अ.क्र. | स्विकार | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | पुर्णतः | 225 | 75 |
| 2. | नाही | 15 | 05 |
| 3. | काही प्रमाणात | 60 | 20 |
| | एकुण : | 300 | 100 |

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण 300 उत्तरदात्यांपैकी 225 उत्तरदात्यांच्या मते अ.भा. श्रीगुरुदेव मंडळाचा गावात पुर्णतः स्विकार आहे असे असून त्यांचे शेकडा प्रमाण 75 आहे. 15 उत्तरदात्यांच्या मते गावात स्विकार नाही असे असून त्यांचे शेकडा प्रमाण 05 आहे. तर 60 उत्तरदात्यांच्या

मते गावात काही प्रमाणात स्विकार आहे असे असून त्यांचे शेकडा प्रमाण 20 आहे.

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, महत्तम 225 उत्तरदात्यांच्या मते अ.भा. श्रीगुरूदेव मंडळाचा गावात पुर्णतः स्विकार असून त्यांचे शेकडा प्रमाण 75 आहे.

सारणी क्र. 3

शिक्षण आणि ग्रामगीता ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी सहाय्यक

| अ.क्र. | शिक्षण | विवरण | | एकूण वारंवारिता |
|---|---|---|---|---|
| | | पुर्णतः सहमत | अंशतः सहमत | |
| 1. | अशिक्षीत | 04 (26.67) | 11 (73.33) | 15 (100) |
| 2. | प्राथमिक | 40 (66.67) | 20 (33.33) | 60 (100) |
| 3. | माध्यमिक | 80 (88.89) | 10 (11.11) | 90 (100) |
| 4. | उच्च माध्यमिक | 80 (84.89) | 15 (15.11) | 95 (100) |
| 5. | पदवीधर | 36 (90) | 04 (10) | 40 (100) |
| | एकुण : | 240 | 60 | 300 |

टिपः– कंसातील आकडेवारी ही शेकडा प्रमाण दर्शविते.

वरिल सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, ग्रामगीता ही ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये बळकटी निर्माण करू शकते याबाबतीत प्राथमिक ते पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्यांची पुर्णतः सहमती असून त्याची वारंवारीता ही 240 व शेकडा प्रमाण 80 आहे व हे प्रमाण सर्वाधिक आहे.

**निष्कर्षः**– 1)श्रीगुरूदेव सेवा मंडळामार्फत ग्रामीण विकासाचे दृष्टीकोणातून जे कार्यक्रम राबविले जातात त्यात बालसंस्कार शिबीर, व्यक्तिमत्व विकास शिबीर, ध्यान प्रार्थना, प्रबोधनात्मक कार्यक्रम इ. चा समावेश असला तरी प्रामुख्याने प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे प्रमाण अधिक आहे. 2) श्रीगुरूदेव सेवा मंडळ स्थापनेमागील उद्देश हा राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बंधुभाव, व्यसन निर्मुलन इ. प्रकारे असला तरी सामाजिक बंधूभाव जोपासणे व त्याचा प्रसार व प्रचार करणे हा आहे. 3) श्रीगुरूदेव सेवा मंडळाचा बहुतांश गावाने स्विकार केला आहे. 4) श्रीगुरूदेव सेवा मंडळामार्फत ग्रामगीतेच्या माध्यमातून ज्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मार्गदर्शन दिल्या जाते त्यात महिला उन्नती, आदर्श विवाह व सामुहिक विवाहास प्राधान्य दिल्या जाते. 5) ग्रामगीतेमुळे विश्वात शांती लाभेल, मानसाला मानवतेची स्पष्ट दृष्टी मिळेल, ग्रामगीतेच्या आचरणाने व वाचनाने ग्राम आदर्श होण्यास सहाय्यक होईल व गाव स्वावलंबी व स्पयंपूर्ण होईल, ग्रामगीतेमुळे ग्रामीण विकासाला योग्य दिशा मिळेल व ग्रामगीतेचे साहित्य शैक्षणिक प्रवाहात आले तर सामाजिक सुधार होईल इ. बाबीला उत्तरदात्यांनी पूर्णतः सहमती दर्शविली आहे.

**सूचनाः**– 1) श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे कार्यात व चळवळीस शासनाने अधिकार देऊन ग्रामविकासाची जबाबदारी पूर्ण करण्यास अधिनियम समंत करण्यात यावा. 2) श्रीगुरूदेव सेवा मंडळ व ग्रामीण जनता यांच्यामध्ये समन्वय साधण्याकरीता ग्रामसभेला विशेष व अनिवार्य अश्या तरतूदी करण्यास शासनाने मदत करावी. 3)राष्ट्रसंताच्या ''ग्रामगीतेचा'' अंतर्भाव शालेय अभ्यासक्रमामध्ये अनिवार्य करण्यात यावा.

**संदर्भ ग्रंथ सूची** :–


1. घाटोळे रा.ना. : ''समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती'' (मंगेश प्रकाशन, नागपूर, 1990)
2. खापर्डे, सुदर्शन देवीदासः ''चंद्रपुर जिल्ह्यातील ग्रामीण विकासाशी संबंधित ग्रामपंचायतीच्या कार्य पद्धतीचे अध्ययन'' (पीएच.डी. थेसीस, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर)
3. शर्मा डॉ. श्रीनाथ, सिंह डॉ. मनोजकुमार : ''पंचायत राज एवं ग्रामीण विकास'' (अर्जुन पब्लिशिंग हाऊस)
4. बोधनकर, सुधीर; अलोणी विवेक : ''सामाजिक संशोधन पद्धती'' (श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर, प्रथमावृत्ती 1993)
5. कडवे प्रा. रघुनाथ : ''राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय खंड 6 व 7'' (श्री गुरूदेव प्रकाशन गुरूकुंज आश्रम, 2001, 2002)
6. कडवे प्रा. रघुनाथः ''ग्रामविकास दृष्टी'' (अमोल प्रकाशन, नागपूर)
7. मेश्राम प्रा. सुरेश : ''प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन'' (यश प्रकाशन, नागपूर)
8. पदवाळ डॉ. बाळ : ''राष्ट्रसंताची विचारधारा'' (मंगेश प्रकाशन, नागपूर, 2009)
9. नारखेडे ल. मा. : ''गुरूदेव सेवा मंडळ तत्वज्ञान म्हणजे संताचे राज्य'' (गुरूदेव आत्मानुसंधान प्रकाशन अडयाळ टेकळी)
10. नारखेडे ल. भा : ''नाणे–एक बाजू दोन''
11. नारखेडे ल. भा.: ''विशाल श्रीगुरूदेव सेवामंडळ तत्वज्ञान''
12. Anderson, J. : "Thesis and Assignment Writing", (New Delhi: Wiley Eastern Limited, 1970)
13. Bailey, Kenneth D. : "Methodology and Techniques of Social Research" (London: Collier Macmillion Publishers, 1978)

# आदीवासी संस्कृती आणि त्यापुढील आव्हाने

**डॉ. नलिनी बोरकर,** समाजषास्त्र विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, जवाहनगर, जि. भंडारा.

आदिवासी हा शब्द दैनंदिन जिवनात वावंरवार वापरला जातो. या शब्दामागे आदिम जिवन जगणारे, दऱ्याखोऱ्यात राहणारे, गीरीजन, वनवासी असे अनेक अर्थ लपलेले आढळतात. कोणाला हा समाज भोळा वाटतो तर कोणाला त्याचे भ्रमही वाटते. अशिक्षित, रानटी समाज म्हणून या समाजाची ओळख आहे. आदिवासींचे जिवन मुख्य प्रवाहापासुन दूर असते. आधुनिक समाजात आणि आदिवासी समाजात लक्षात घेण्याजोगा फरक आढळतो. त्यांचे खाणपाण, राहणीमान, त्यांची वस्त्रे, अंलकार, विवाह पध्दती आणि प्रथा, पंरपरा नेहमीच समाजतज्ञांच्या आकर्षणाचे केंद्र राहीले आहे. भारतात येणारे अनेक पर्यटक आदिवासी क्षेत्राला अवश्य भेट देतात. त्यांची भाषा, चालीरीती जवळून पाहतात आणि हा सांस्कृतिक ठेवा जपूनच परतीच्या मार्गाला लागतात. या सर्व प्रक्रियेत समाजशास्त्रज्ञही मागे राहत नाही. 'भारतीय आदिवासी' आणि त्यांचे जिवन नेहमीच अभ्यास विषय राहीला आहे. त्यासाठी 'सामाजिक मानवशास्त्र' ही नवी शाखा निर्माण करण्यात आली आहे.

**आदिवासी जमात या संज्ञेचा अर्थ** : आदिवासी हा शब्द इंग्रजी मधील Aborigines या शब्दाचा मराठी पर्यायी शब्द समजला जातो. (कराडे बी. 2004:5) भारतीय राज्यघटनेत 'अनुसुचित जमाती' 'Sheduled Tribe' असा उल्लेख केलेला आहे. समाजशास्त्रात 'जमात' हा शब्द विशिष्ट अर्थाने वापरला जातो. एक जमात म्हणजे अनेक कुटुंबाचा समूच्चय होय. प्रत्येक जमातीला विशिष्ट नांव असते. उदा. कोरकु, कोलाम, गोंड, बंजारा, भिल्ल, महादेव कोळी इत्यादी प्रत्येक जमातीची एक विशिष्ट बोलीभाषा असते आणि ती एखाद्या निश्चित भुभागावर वसलेली असते.

व्याख्या : गिलिन आणि गिलिन : एका विशिष्ट भुप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थनिक गटाच्या समुच्चायाला आदिवासी समाज असे म्हणतात.

डॉ. रिव्हर्स म्हणतात – ज्या समुहातील सदस्य एकसमान बोलीभाषा बोलतात, युध्द वगैरेसारख्या उद्दिष्ट पूर्तीकरिता एक होऊन झटतात. अशा सरळ व साध्या समुहाला आदिवासी समाज असे म्हणतात.

मदन व मजुमदार : समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टिने परस्पर संबधीत असणाऱ्या ग्रामिण समुदायाच्या समुच्चयाचा उल्लेख आदिवासी समाज म्हणून नेहमी केला जातो.

बोगार्डस म्हणतात ''सुरक्षिततेची जरूरी रक्त संबंधाचे बंध समान धर्म यावर आदिवासी धर्म आधारलेला होता''

इंपिरीयल गॅझेट मध्ये आदिवासींची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. ''समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भूभागात राहणाऱ्या सुरवातीला अंतर्विवाही असणाऱ्यांची शक्यता असलेला पण सर्वसामन्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात.

वरील सर्व व्याख्यांवरून आदिवासी समाजाची काही वैशिष्टये खालीलप्रमाणे निदर्शनास येतात.

1) आदिवासी समाज हा विशिष्ट भुप्रदेशावर वास्तव्य करतो. 2) प्रगत समाजाशी तुलना करण्यात आदिवासी समाज लहान आहे. 3) हा एक रक्त संबंधावर आधारलेला समुह आहे. 4) आदिवासी समुदायाला स्वतःची बोलीभाषा असते. 5) या समाजाची अर्थव्यवस्था अत्यंत साधी आहे. वस्तूंचे विनिमय नसल्याने बाजारपेठ, नफा पध्दती यांचा अभाव आढळतो. 6) या सुमदायाची जिवनपध्दती विशिष्ट स्वरूपाची असते सामाजिक नियंत्रण व्यवस्था सक्षम आहे तसेच रूढी परंपरा, धर्म यामुळे त्यांचे सामाजिक जिवन नियंत्रित झाले आहे. 7) धर्माचरणाला विशेष महत्व आहे. निसर्ग शक्तीला ते पुजनीय मानतात. 8) त्यांची तंत्रविद्या जुळावी स्वरूपाची असते. 9) या समुदायात सामाजिक ऐक्यभाव आढळतो.

**आदिवासींची संस्कृती** : आदिवासींची संस्कृती ही संपन्न आहे. लोकगीते, लोकनाटये, सण समारंभ, विवाह पध्दती माध्यमातून ती दिसत असते. त्यांच्या संस्कृतीत गोहूल किंवा युवागृह नावाचे एक संघटन आहे. या युवागृहाच्या माध्यमातून सर्व आदिवासी तरूण व तरूणी आपली आदिवासी संस्कृती शिकत असतात. त्यांची संस्कृती लोकगिते, नृत्ये सणसमारंभ प्रसंगी होणारी नाटके यातून स्पष्टपणे दिसते. युवागृहात तरूणांना वादन, गायन, अभिनय, घर बांधणे, शिकार करणे इत्यादी कला शिकविल्या जातात. तर तरूणींना

विविध वस्तु तयार करणे, मुलांचे संगोपण करणे शिकविले जाते. याशिवाय आदिवासींमध्ये तिचे शिक्षणावरही भर दिला जातो.

नीति शिक्षण : आदिवासी समाजाच्या नीतिकल्पना अभिव्यक्त होतात त्यातुन जल–जंगल–जमीन प्रचलीत रूढी, प्रथा, परंपरा नीतिकता, प्राथमिकता, याव्दारे विशेषत्वाने कार्य घडत असते. यासबंधीच्या कल्पना परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढी पर्यंत लोकसंस्कृती व्दारा संक्रमीत होत आहेत. (मेश्राम एच. 2014:407)

आदिवासी लोक गीतांच्या किंवा त्यांच्या कलागुणांचा साक्षर, निरक्षर लोकांना अप्रत्यक्षपणे शिक्षण देण्याचे कार्य करीत असतात. संकेत रूढी परंपरा, प्रथा यामुळे समाजाचे नैतिक शिक्षण होत असते. आदिवासींच्या संस्कृतिची जडणघडण अत्यंत साधी आहे. विनामुल्य व सेवाभावाने असलेली संस्कृती त्यांना लाभली आहे. आपल्या चालीरिती, राष्ट्रीय ऐक्य, उत्सव समारंभ यातून ते संस्कृतिची जोपासना करतात. मनोरंजन, कला, नृत्य त्यांचे साहित्य यात त्यांच्या संस्कृतिचा मोठा वाटा आहे. बोलीभाषा, संगीत, नृत्य, कला, राहणी, दागिणे तसेच घराच्या स्वच्छतेवरूनही त्यांच्या मौलिक संस्कृतिचे श्रेष्ठत्व लक्षात येते. त्यांचे सणवार, लोककथा, लोकगिते, वाद्यप्रकार हे त्यांच्या मानसिक आणि वैचारिक श्रेष्टत्वाची साक्ष आहे.

शेती मधुन धान्य निघाल्यानंतर त्यांचे पीठ करण्याचा देखील उत्सव ते साजरा करतात. माडिया लोक याला ''दिण्डी पण्डूम'' म्हणतात. ''विज्जा पण्डूम'' म्हणजे नवीन बी पेरण्याचा सण होय. कोणत्याही गोष्टींची सुरूवात करण्याला ते पोलवा म्हणतात. (मेश्राम एच. 2014:408) त्यांच्या गितांमधुन ते निसर्गवर्णन करतात.

आदिम जमातीचे लोकगीत म्हणजे सांस्कृतिक मुल्यच आहेत. डिंक, मोहफुले, हिरडा, मध गोळा करणे, शिकार करणे यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. जंगलाच्या, निसर्गाच्या सानिध्यात ते राहतात. त्यांना वनौषधीचेही ज्ञान असते. दैनंदिन जिवनात याचा ते उपयोग करतात.

**आदिवासींच्या सांस्कृतिक समस्या** : आदिवासींच्या आधुनिक समाजाशी येणारा संपर्क दिवसेंदिवस वाढतच आहे. या संपर्कामुळेच आदिवासींच्या जिवनात सामाजिक सांस्कृतिक समस्या निर्माण होत आहेत. त्यांच्यामध्ये न्युनगंड निर्माण होत आहे. आपली मुल्ये सोडून ते अधःपतनाकडे वळत आहेत. इतर समाजाच्या संपर्कामुळे त्यांची भाषा, जीवनपध्दती, लोककला यांचा ऱ्हास होतांना दिसतो आहे.

1) बाहय संस्कृतिचा संपर्क व त्यामुळे निर्माण झालेल्या समस्या : आधुनिक समाजातील लोकांशी त्यांचा संपर्क येऊ लागला. उदा. ब्रिटिश लोक, श्रीमंत जमीनदार, खिस्ती धर्मप्रसारक हे आर्थिक दृष्टया सघन असल्याने आदिवासी त्यांच्याकडे आकर्षित झाले. ते आदिवासींना श्रेष्ठ वाटू लागले व त्यांच्या न्युनगंडाची भावना निर्माण झाली. अनेक आदिवासींनी आपल्या धर्माचा त्याग करून नवीन धर्म स्विकारला परंतू त्यामुळे ते आपल्या भाऊबंदाशी दुरावले. आणि ज्यांच्यासाठी त्यांनी धर्म परिवर्तन केले होते ते त्यांना बरोबरीचे स्थान देऊ शकले नाही. काही आदिवासी हिंदू झाले, काही ख्रिश्नच झाले तर कोणी परंपरागत आपलाच धर्म पाळीत राहीले. ज्यामुळे आदिवासींमध्येच वेगवेगळे समूह निर्माण झाले. एकत्वाची भावना नष्ट होवून समुहकेंद्रितता वाढली. अशाप्रकारे आदिवासींच्या मूळ संस्कृतित बदल झाला.

2) भाषा विषयक समस्या : प्रत्येक आदिवासींची एक स्वतंत्र भाषा असते. इतर समाजाच्या संपर्कामुळे सभ्य समाजाची भाषा ते शिकू लागले. आता नवीन विढीतील आदिवासींना आपलीच भाषा परकी वाटते. शाळेमध्ये त्याच्या प्रदेशाच्या प्रादेशिक भाषेत शिक्षण दिले जाते. त्यामुळे आपली भाषा ते विसरत चाललेत. भारतीय राज्यघटनेच्या 350 अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व अल्पसंख्यांक समूहाच्या मूलांमुलींना प्राथमिक शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून मिळायला हवे. शाळेत विशिष्ट भाषा बोलणारे किमान 40 विद्यार्थी असल्यास किंवा एखाद्या वर्गात किमान 90 विद्यार्थी असल्यास संबंधित भाषेतून शिक्षण देण्यासाठी एका शिक्षकाची नेमणूक करावी अशी अपेक्षा आहे. परंतु आदिवासी क्षेत्रात या तत्वाचे भान राखल्याचे दिसत नाही. (कऱ्हाडे बी.एम. 2009:129).

3) बालविवाह आणि अतिरिक्त वधूमुल्याची समस्या : आदिवासी समाजात बालविवाहाची पध्दती हिंदू समाजाशी संपर्क आल्यामुळे सुरू झाली आहे. स्त्रि पुरूष संबंधाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अगदी निकोप होती. प्रेमासारखी दुसरी भावनाच त्यांना मान्य नव्हती म्हणून विवाहपूर्व किंवा विवाहबाहय संबंधाला ते

उपहासाने पाहात नसत परंतु आधुनिक सताजाशी संपर्क आल्याने त्यांची ही मते संकूचीत होवू लागली. वधूमूल्य ही प्रथाही त्यांच्यात प्राचीन आहे. परंतू आधुनिक समाजातील हुंडा प्रथेप्रमाणे तोही महान रूप धारण करते आहे. त्यामुळे अनेक आदिवासी कर्ज बाजारी झालेत. तर काहींनी जबरदस्तीने मुलीला पळवून नेवून विवाह केले. काही आदिवासी वधूमुल्य देण्याची ऐपत नसल्याने अविवाही राहीलेत.

4) युवागृहाचा ऱ्हास : आदिवासींच्या जिवनातील युवागृह ही एक सामाजिक, सांस्कृतिक महत्व असलेली संस्था होती. प्रथा, परंपरा, जीवनपध्दती इत्यादींचे संस्कार नवीन पिढीला मात्र युवागृहातून दिले जात. सामाजिक बांधीलकी, आर्थिक कार्यात सहभागी होणे, उत्साहपूर्वक आपले जीवन जगणे असे अनेक निति विचार युवागृहात दिले जात होते. परंतू सभ्य समाजाच्या संपर्कात आल्याने आदिवासी मुलांना युवागृहात जाणे कमीपणाचे वाटू लागले. शाळेत शिकणारी मुले युवागृहात जाणे तुच्छ मानतात. रेंगामानागा लोक तर आपल्या जमातीत युवागृह होते. हेही मानावयास तयार नाहीत ऐवढे परिवर्तन झाले आहे. युवागृहाला पर्याय म्हणून कोणतीही संस्था नाही म्हणून आदिवासी जीवनातील एक मोठा ऱ्हास म्हणजे युवागृह नष्ट होणे होय.

5) वेशावृत्ती व गुप्तरोग : सभ्य समाजाशी संपर्क आल्याने या जमातीशी संपर्क येणारे ठेकेदार, व्यापारी, शासकीय अधिकारी आपले कुटुंब शहरात ठेवून कामासाठी येणारे लोक विविध प्रलोभने देवून अदिवासी स्त्रियांचा गैरफायदा घेतात. त्यांच्याशी शरीर संबंध स्थापित करून त्यांना वेशावृत्ती, कुमारीमाता, गुप्तरोग यासारख्या समस्यांना सामोरे नेतात. सभ्य समाजानेच आदिवासी समाजाला भेट दिलेली विकृती म्हणजे गुप्तरोग होय.

6) व्यसनधिनता : मद्यपान करणे हा आदिवासी संस्कृतिचा एक भाग आहे. मोहाची दारू, ताडी, गोरगा इत्यादीपासून तयार केलेले मद्य ते दैंनदिन जिवनात घेत असतात. सिंमिंग्टन म्हणतात 'सर्व आदिवासी जमातच व्यसनी असते. त्यांच्या मुलांना लहानपणापासूनच दारू पिण्याचे धडे मिळतात. उसणवारी करून किंवा भिक मागून पैसे मिळाले तरी हे लोक त्याचा उपयोग दारू विकत घेऊन पिण्यासाठीच करतात.' (वऱ्हाडे बी.एम. 2009:131) बी. या व्यासनाधिनतेमुळे आदिवासी लोक अगतिक झाले आहेत. त्यांच्या व्यसनतेधिनचा फायदा घेऊन ठेकेदार, जमीनदार त्यांना एखादी दारूची किंवा ताडीची बाटली देवून वाटेल ते भरपूर कामे करून घेतात. आता दारू गाळणे हा गुन्हा ठरविल्याने आदिवासी मिळेल ती दारू पितात. त्यामुळे त्याचा आरोग्यावरही परिणाम होत असतो. अशा प्रकारे आदिवासी व्यसनधिनतेमुळे दारिद्ररूाच्या दृष्टचक्रात अडकला आहे.

अशा प्रकारे आदिवासींना आज आपली संस्कृती टिकवितांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. भाषेच्या अडचणीमुळे त्यांना त्यांचा सांस्कृतिक वारसा लिहून ठेवता येत नाही. सभ्य समाजात त्यांच्या संस्कृतीला असभ्य समजले जाते म्हणून सभ्य समाजात मिसळतांना त्यांना ही संस्कृती सोडावी लागते. धर्म आणि परंपरांना पालन करतांना शासकिय कायदे व नियमांना ही पालन करावे लागते. वस्तु आभुषण आता सभ्य समाजाप्रमाणे घालावी लागतात. त्यामुळे एकुणच त्यांची संस्कृती आणि प्रथा, परंपरा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आधुनिक समाजाशी संपर्क आल्यामुळे त्यांची संस्कृती नष्ट पावत चालली आहे. त्यांच्या संस्कृतिचे संवर्धन करण्याची कोणतीच संस्था परिस्थितीत आढळून येत नाही.

---

संदर्भ ग्रंथ :–


1. 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', प्रा. डॉ. बाबु कऱ्हाडे, हिंद मुद्रण, टिळक पुतला, महाल, नागपूर. नोव्हें 2004.
2. 'आदिवासी विकास एंव गैर–सरकारी संघटन', उदयसिंह राजपूत, रावत पब्लिकेशन, नई दिल्ली, 2010.
3. Scheduled Tribes In India - Dr. K.S. Patil, Rainbow Printing & Packging, Nagpur.
4. 'भारतीय समाजः प्रश्न आणि समस्या', डॉ. बी.एम. कऱ्हाडे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर. जून 2009.
5. 'जनजातीय विकासः नियम एंव यथार्थ', नरेशकुमार वैद्य, रावत पब्लिकेशन, नई दिल्ली, 2003.

# महिलांचा राजकीय सहभाग

## (विशेष संदर्भः भंडारा विधानसभा मतदारसंघ)

**प्रा. छाया देशमुख,** राज्यशास्त्र विभाग, पार्वताबाई मदनकर महाविद्यालय, वरठी जि. भंडारा.

**प्रस्तावना**:— मानव हा स्वभावतः राजकीय आणि सामाजिक प्राणी आहे. स्वतःच्या गरजा आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी व्यक्तिंनी जे प्रयत्न केले त्यातून राज्याची निर्मिती झाली. कालातंराने ज्या विविध राजकीय संस्था उद्यास आल्या त्यात व्यक्तींच्या राजकीय सहभागाचा फार मोठा वाटा आहे. **बाक्रर** च्या मते, 'राज्य हे पूर्ण विकसित झालेल्या व्यक्तिंचे नैसर्गिक घर आहे. व्यक्तीच्या नैसर्गिक विकासाचे ते साधन आहे.' यावरुन मनुष्याच्या वैचारिक सहभागाने व्यवस्था निर्माण होऊ शकते. म्हणून 'राजकीय सहभाग' या संकल्पनेला विशेष महत्व आले आहे.

**राजकीय सहभागाचे महत्व**:— सर्वच प्रकारच्या राजकीय व्यवस्थेचा अनिवार्य घटक म्हणजे राजकीय सहभाग होय. लोकशाही शासन पध्दतीत तर राजकीय सहभागाचे विशेष महत्व असते. कारण लोकशाही व्यवस्थेत नागरिकांच्या सहभागाची अपेक्षा मोठया प्रमाणात व्यक्त केली जाते. बहुतांश देशात राजकीय सत्ता ही काही मोजक्या लोकांच्या हातात असते. परंतू हे मोजके सत्ताधारी लोक सर्वसामान्य जनतेला राजकीय व्यवस्थेच्या विविध प्रक्रियांमध्ये राजकीय सहभागासाठी प्रेरित करित असतात. कारण त्यामूळेच त्यांच्या राजकीय सत्तेला प्रबळ केल्या जावू शकते व राजकीय व्यवस्थेला स्थायित्व व निरंतरता प्रदान केल्या जावू शकते. डॉ. धर्मविर यांच्यामते, 'जर एखाद्या समाजातील बहुतांश जनतेला राजकीय सहभागाच्या संधी उपलब्ध होवू शकत नसतील किंवा त्यांना त्यापासून वंचित ठेवल्या जात असेल तर तेथे विस्फोटक स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते'[1] एस. एम. नंदा यांच्यामते, 'स्वातंत्र्य, समता व बंधुता हे लोकशाहीचे मूल आधार मानले जात असले तरीही व्यावहारिक सत्य असे आहे की, केवळ याच तत्वांच्या अस्तित्वामुळे एखाद्या देशातील लोकशाही यशस्वी होवू शकत नाही, तर लोकशाहीला यशस्वी करण्यासाठी वरील तत्वांव्यतिरिक्त राजकीय सहभागाची नितांत आवश्यकता असते'.[2] थोडक्यात, लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी राजकीय सहभाग हा सर्वात महत्वाचा आधार आहे.

ज्या राजकीय व्यवस्थेत, निर्वाचनाच्या प्रक्रियेत लोकांचा अधिक सहभाग असतो, उदा.— उमेदवाराचा प्रचार करणे, जनसभेला हजर राहणे, मतदान करणे, निवडणुकीच्या कार्यामध्ये रस घेणे इत्यादी. तेथील संस्थाचा अधिकाधिक विकास होत असतो व त्या राजकीय व्यवस्थेला लोकतांत्रिक समाजाचे स्वरूप प्राप्त होत असते. भांबरी व वर्मा यांच्यामते, 'नागरिकांच्या सहभागामूळे केवळ संस्थाच्या आंतररचनेप्रतीच विश्वास प्राप्त होत नाही तर त्याचबरोबर तेथील निर्णय निर्धारण प्रक्रियासुध्दा प्रभावित होत असते. लोकतांत्रिक राजकीय व्यवस्थेतील नागरिकांच्या राजकीय सहभागामुळे त्या व्यवस्थेला कार्यक्षमता, अधिमान्यता व स्थायित्व प्राप्त होत असते.'[3] तर के. एन. शर्मा यांच्यामते, 'राजकीय सहभाग हा राजकीय विकास, आधुनिकीकरण व प्रगत राजकीय संस्कृतीची एक आवश्यक कसोटी होय.'[4] तथापी, काही असेही विचारवंत आहेत की, जे राजकीय सहभागाचे महत्व मानत नाहीत. सॅम्युअल हंटिंग्टन यांच्यामते, 'राजकीय सहभागाचा शेवट हा —हासामध्ये होतो.[5] त्यांच्यामते, 'राजकीय सहभागामुळे जनतेच्या आशा व अपेक्षा खुप वाढतात, परंतु या अपेक्षा संस्थात्मिकरणाच्या अभावाने जेव्हा पूर्ण होवू शकत नाहीत, तेव्हा जनतेमध्ये नैराश्याची भावना तीव्र होत जाते व शेवटी राजकीय सहभागाचा अंत होतो.'[6]

राजकीय सहभागाच्या महत्वासंबधी उपरोक्त विविध विचारवंताच्या मतांमध्ये मतभिन्नता असली तरी, एक गोष्ट मात्र निश्चितच सत्य आहे व ती म्हणजे राजकीय सहभागाचे स्वतःचे एक महत्व असून, याबाबत कोणीही शंका घेवू शकत नाही. कारण 'राजकीय सहभागामुळेच राजकीय व्यवस्थेला स्थायित्व व अधिमान्यता प्राप्त होत असते.'[7] असे मत के. एन. शर्मा यांनी व्यक्त कले आहे. म्हणूनच जगातील सर्वच देशांमध्ये व्यक्तीच्या राजकीय सहभागाला अधिक महत्व दिल्या जाते. आधुनिक काळात तर राजकीय व्यक्तीच्या राजकीय सहभागाचे महत्व प्रकर्षाने वाढत आहे.

**राजकीय सहभागाची व्याख्या :- आल्मंड** व **पॉवेल** यांच्यामते, 'जे लोक आदान मागणी व प्रदान

कार्याशी कोणत्याही स्वरूपात भाग घेतात त्यांना राजकीय सहभागी म्हटल्या जावू शकते. त्यांच्या मते, राजकीय सहभागाचा अर्थ, 'व्यवस्थेच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेत समाजाच्या सदस्यांनी सामील होणे होय'.[8] **के. एन. शर्मा** यांच्यामते, 'विशिष्ट व्यवस्थेच्या चौकटीतील व्यक्तींच्या अशा क्रिया की, ज्यामुळे निर्णय निर्धारण प्रक्रियेला प्रभावित केले जाते.'[9] **रश** व **अल्थाप** यांच्या मते, 'राजकीय सहभाग म्हणजे राजकीय प्रणालीच्या पृथक पृथक स्तरांवरील व्यक्तींचे सम्मिलित होणे होय.'[10] **मॅक्लॉस्की** यांच्या मते, 'ज्याव्दारे लोकशाहीला संमती प्रदान केली जाते आणि परत घेतली जाते आणि शासकांना शासितांप्रती उत्तरदायी बनविले जाते, असे प्रमुख साधन म्हणजे सहभाग होय व ज्यामुळे समाजाचे सदस्य, शासकांच्या निवडीमध्ये सहभागी होतात आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रूपात सार्वजनिक नीतीच्या निर्माणामध्ये भाग घेत असतात, अशा ऐच्छिक क्रिया म्हणजे राजकीय सहभाग होय.'[11] थोडक्यात, व्यक्तींचा राजकीय व्यवस्थेच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाग घेणे म्हणजे राजकीय सहभाग होय.

**अध्ययन पध्दती**:– प्रस्तुत अध्ययनासाठी अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा (Exploratory or Formulative Research Design.) व वर्णनात्मक संशोधन आराखडा (Descriptive Research Design.) या दोन्हींचा संयुक्त वापर केला आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी अध्ययनाचे क्षेत्र म्हणून भंडारा जिल्हयातील 'भंडारा विधानसभा' मतदारसंघाची निवड केली आहे. प्रस्तुत अध्ययनाचे समग्र किंवा विश्व भंडारा विधानसभा मतदारसंघातील 1,45,000 महिला मतदार हेच या अध्ययनाचे समग्र आहेत. प्रस्तुत अध्ययनासाठी 1,45,000 महिला मतदारांच्या समग्रातून 30 महिला मतदारांची नमुना म्हणून निवड केली आहे. यामध्ये 15 महिला शहरी भागातील व 15 महिला ग्रामीण भागातील आहेत. प्रस्तुत अध्ययनात तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूचीचा उपयोग करण्यात आला. मुलाखत अनुसूची तयार झाल्यावर अध्ययनातील सर्व 30 उत्तरदात्यां मतदार महिलांकडे जाऊन त्यांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन अनुसूचीतील प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडून प्राप्त केली. प्रस्तुत अध्ययनातील तथ्य संकलनासाठी तथ्य संकलनाचे स्त्रोत म्हणुन प्राथमिक तथ्ये (Primary Data) व द्वितीयक तथ्ये (Secondary Data) या दोन्हीचांही वापर करण्यात आला. प्रस्तुत अध्ययनामध्ये तथ्यांचे Master Chart, Tabulation, Table, Cross Table, Graph तयार करण्यासाठी संगणकाच्या एस. पी. एस. एस. (Statastical Programme for Social Sciences) या सॉफ्टवेअरचा उपयोग करण्यात आला. तसेच तथ्य विश्लेषणासाठी प्रामुख्याने सांख्यकीय पद्धतीचा अवलंब केला. तथ्यांचे निर्वचन करण्यासाठी साध्या व बहुचल सारणींचा (Cross Tabulation) वापर केला.

प्रस्तुत अध्ययनात, 'भंडारा विधानसभा मतदार संघातील महिलांच्या राजकीय सहभागाचे अध्ययन करण्यासाठी महिलांच्या काही निवडक व प्रमुख क्रियांना विचारात घेण्यात आले होते. उदा. – 1. महिलांचा विधानसभा निवडणूकीतील मतदान प्रक्रियेतील सहभाग. 2. महिलांचा निवडणूक प्रचार संदर्भातील सहभाग. 3. महिलांचे राजकीय पक्षाचे सदस्यत्व प्राप्त करणे. 4. महिलाांनी स्वतः निवडणूक लढविणे. 5. राजकीय पक्षाच्या सभांना उपस्थित राहणे. 6. राजकीय माहिती प्राप्त करणे. 7. राजकीय विषयावर चर्चा करणे.

महिलांच्या उपरोक्त क्रियांच्या अनुषंगाने त्यांच्या राजकीय सहभागाचे मूल्यांकन करण्यात आले. प्रस्तुत अध्ययनात 'भंडारा विधानसभा मतदार संघातील महिलांचा राजकीय सहभाग' या विषयाचा अभ्यास करावयाचा असल्याने या महिलांचा राजकीय सहभाग कशाप्रकारचा आहे याचे विवेचन या शोधनिबंधात करण्यात आले आहे.

**निष्कर्ष**:– भंडारा विधानसभा मतदार संघातील महिलांचा राजकीय सहभाग अभ्यासण्यासाठी, त्यांना राजकीय सहभाग विषयक विविध प्रश्न विचारून व या प्रश्नांना महिलांनी दिलेल्या प्रतिसादाच्या आधारे विविध सारण्या तयार करुन व त्यांचे विश्लेषण करून पुढीलप्रमाणे निष्कर्ष प्रतिपादन करण्यात आले आहेत.

1. प्रस्तुत अध्ययनातील बहुतांश 90.0 % महिलांच्या कुटुंबातील एकही सदस्य प्रत्यक्ष राजकारणात सक्रीय नाही. केवळ 10.0 % महिलांच्या कुटुंबातील सदस्य राजकारणात सक्रीय आहेत.

2. प्रस्तुत अध्ययनातील ज्यांच्या कुटुंबातील सदस्य राजकारणात सक्रीय आहेत अशा एकूण महिलांपैकी 66.6% महिलांचे पती राजकारणात सक्रीय आहेत. 33.3% महिलांचे वडील राजकारणात सक्रीय आहेत.

3. प्रस्तुत अध्ययनातील 66.6 % महिलांवर कुटुंबातील राजकारणी व्यक्तीच्या वर्तनाचा सकारात्मक परिणाम होतो असे दिसते. कारण या महिलांनी राजकारणी व्यक्तीच्या वर्तनाने प्रभावित होवून राजकारणात जाण्याची इच्छा व्यक्त केलेली दिसते.

4. प्रस्तुत अध्ययनातील फक्त 10.0 % मतदार महिला राजकारणात प्रत्यक्षपणे सहभागी आहेत.

5. प्रस्तुत अध्ययनातील प्रत्यक्ष राजकारणात सक्रीय असलेल्या सर्वच महिला आपल्या पतीच्या प्रेरणेमूळेच सक्रीय राजकारणात आलेल्या आहेत.

6. या अध्ययनातील राजकारणात सक्रीय असलेल्या महिलापैकी 100 % महिला आपल्या कुटुंबाचा राजकीय वारसा चालविण्यासाठीच राजकारणात आलेल्या आहेत.

7. महिलांच्या राजकीय वारशाचा त्यांच्या राजकीय वर्तनावर प्रभाव पडतो. ज्या महिलांच्या कुटुंबातील सदस्य राजकारणात आहेत म्हणजेच ज्या महिलांना राजकीय वारसा प्राप्त झालेला आहे त्यांचा राजकीय सहभाग सुध्दा उच्च प्रकारचा आहे.

8. प्रस्तुत अध्ययनातील 66.6 % महिला राजकीय पक्षाच्या सभासद आहेत.

9. या अध्ययनातील 90.0 % महिला प्रत्येक निवडणूकीत नियमित मतदान करतात.

10. प्रस्तुत अध्ययनातील 90.0% महिला प्रत्येक विधानसभा निवडणूकीत नियमितपणे मतदान करतात.

11. प्रस्तुत अध्ययनातील बहुतांश म्हणजे 86.6% महिला त्यांच्या क्षेत्रातील राजकीय सभा किंवा राजकीय कार्यक्रमांना जात नाहीत किंवा एक श्रोता म्हणूनही आपला राजकीय सहभाग दर्शवित नाहीत.

12. प्रस्तुत अध्ययनातील बहुतांश म्हणजे 70.0% महिला त्यांच्या गावात होणा–या स्थानिक पातळीवरच्या राजकीय सभा किंवा कार्यक्रमांना जातात. गावात होणा–या कार्यक्रमांना जाणे या महिलांना शक्य होत असावे म्हणून त्यांचा स्थानिक पातळीवरचा राजकीय सहभाग चांगला दिसतो आहे. तथापि 30 % महिला त्यांच्या गावात होणा–या राजकीय कार्यक्रमांनाही जात नाहीत ही वास्तविकताही निदर्शनास येते. महिलांच्या या अत्यल्प राजकीय सहभागाची स्थिती शहरी व ग्रामीण भागात कमी अधिक फरकाने सारखीच दिसते.

13. या अध्ययनातील बहुतांश म्हणजे 60.0 % महिला निवडणूक प्रचारात कधी–कधी भाग घेतात. तर 33.3 % महिला निवडणूक प्रचारात कधीही भाग घेत नाहीत.

14. प्रस्तुत अध्ययनातील बहुतांश म्हणजे 90.0 % महिला राजकीय सभामधून कधीही भाषण देत नाहीत आणि या माध्यमातूनही आपला राजकीय सहभाग दर्शवित नाहीत.

15. या अध्ययनातील बहुतांश म्हणजे 80.0 % महिला महिला कोणत्याही निवडणूकीत उमेद्वार म्हणून सहभागी झालेल्या नाहीत.

16. या अध्ययनातील 83.3 % महिला निवडणूकीच्या काळात कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रचार किंवा आपल्या क्षेत्रातील एखा्द्या विशिष्ट उमेद्वाराला मते मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत नाहीत. म्हणजेच इथे सुध्दा त्यांचा राजकीय सहभाग अत्यल्प दिसतो.

17. प्रस्तुत अध्ययनातील 83.3 % महिला राजकीय संघटनेत किंवा राजकीय पक्षाशी संबधीत चळवळीत किंवा कार्यात सहभागी नाहीत. इथेसुध्दा महिलांचा राजकीय सहभाग अत्यल्प आहे.

18. या अध्ययनातील 90.0 % महिला त्यांच्या क्षेत्रातील समस्येबाबत त्यांच्या क्षेत्राच्या आमदाराशी कधीच चर्चा करीत नाहीत. क्षेत्राच्या आमदारांशी क्षेत्राच्या समस्येवर चर्चा करणा–या 10.0 टक्के महिला या सकिय राजकारणात असलेल्याच आहेत.

19. या अध्ययनातील जवळपास 73.2 % महिलांच्यामते आधुनिक काळात महिलांचा राजकीय सहभाग वाढत आहे.

20. या अध्ययनातील सर्वच महिला 'महिलांनी राजकारणात अधिक प्रमाणात सहभागी व्हायला पाहिजे' या विधानाशी सहमत व पूर्णतः सहमत असलेल्या दिसतात.

21. या अध्ययनातील 96.6 % महिला 'महिलांना राजकारणात सहभाग घेण्यासाठी आरक्षण आवश्यक आहे.' या विधानाशी सहमत व पूर्णतः सहमत असलेल्या दिसतात.

22. या अध्ययनातील जवळपास 94.5 % महिला 'महिलांना राजकारणात सहभाग घेण्यासाठी आरक्षण किंवा संविधानिक तरतूदी आवश्यक आहेत' या मताशी सहमत व पूर्णतः सहमत आहेत. आणि विशेष म्हणजे या मताशी सहमत असलेल्या 94.5 % महिलांचा राजकीय सहभाग कनिष्ठ स्वरूपाचा आहे, तर या मताशी पूर्णतः सहमत असलेल्या सर्वच महिलांचा

राजकीय सहभाग उच्च प्रकारचा आहे. यावरून हे स्पष्ट होते की, 'महिलांच्या राजकीय सहभागावर संविधानिक तरतूदींचा (सार्वजनिक व राजकीय क्षेत्रात स्त्रियांना 33 % आरक्षण) प्रभाव पडलेला दिसून येतो.

23. या अध्ययनातील बहुतांश म्हणजे 76.6 % महिला, 'महिला निवडणूकीत सहभागी झाल्यास चांगले नेतृत्व पुढे येईल.' या विधानाशी सहमत व पूर्णतः सहमत आहेत.

24. प्रस्तुत अध्ययनातील फक्त 13.3 % महिलांचा राजकीय सहभाग उच्च स्तराचा आहे. तर 87.7 % महिलांचा राजकीय सहभाग कनिष्ठ व अत्यंत कनिष्ठ स्वरूपाचा आहे.

---

संदर्भ :–

1. Dharmvir, 'Political Sociology', Rajasthan Granth Academi, Jaipur, 1983, p. 122.
2. Nanda S. S., 'Political Theory', Modern Publishers, Jallandhar, 1984, p. 468.
3. Bhambhari C. P. & Varma P. S., 'The Urban Voter', (Municipal Elections in Rajasthan, An Empirical Study), National Publishers, Delhi, 1973, p. 73-74.
4. Sharma K. N., 'Modern Political Analysis', M. B. D., New Delhi, 1984, p. 216.
5. Hantington Samual cited in Sharma K. N.,..... op. .......cit........ p. 216.
6. Ibid, p. 216.
7. Sharma K. N., 'Modern Political Analysis', M. B. D., New Delhi, 1984, p. 216.
8. Almond and Powell, Cited in Nanda S. S., 'Political Theory', Modern Publishers, Jallandhar, 1984, p. 470.
9. Sharma K. N., 'Modern Political Analysis', M. B. D., New Delhi, 1984, p. 216.
10. Rush and Althop, Cited in Nanda S. S., 'Political Theory', Modern Publishers, Jallandhar, 1984, p. 470.
11. Myclosky, Cited in Nanda S. S., .... op. cit........... 468-470.

# प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्तनविषयक समस्या

प्रा. कु. अर्चना आ. निखाडे, गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख, एन. पी. डब्लु. कॉलेज मुरमाडी/तुप. मो.9766553754

प्रस्तावना :– आजचे बालक हे उद्याचे म्हणजे भावी काळाचे आधारस्तंभ आहेत. आजच्या नवपिढीला भविष्यात सुजाण नागरीक होऊन देशाची धुरा सांभाळण्याचे महत्वाचे कार्य करावयाचे आहे. त्यासाठी बालकांचा सर्वांगीण विकास होणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यासाठी त्यांना योग्य वळण लावण्याचे काम, चांगल्या सवयी लावण्याचे महत्वाचे कार्य सर्वांनाच म्हणजे कुंटूबातील मोठी मंडळी, शाळेतील शिक्षक तसेच इतरही अन्य लोकांची जबाबदारी आहे.

लहानपणी मुलांना चांगल्या सवयी जडल्यानंतर त्या अनुषंगाने त्याचे वर्तन घडून येईल. पालकांचे आचार–विचार, वर्तन इतर कुटूंबीयाची वागणुक, घराबाहेर येणारे विविध अनुभव, शारीरिक, मानसिक नीतीनियम या सर्वांचा बालकांच्या मुळ प्रवृत्तीवर हळूहळू परीणाम होऊन बालकाचे व्यक्तीमत्व घडत जाते. अर्थात लहानपणी दिसणाऱ्या स्वभाव वैशिष्टयांवरून प्रौढपणातील व्यक्तीमत्वाचा अंदाज बांधने धाडसाचे ठरेल.

बालकांच्या व्यक्तीमत्व बांधणीत, त्याच्या पालकांचा सिंहाचा वाटा असतो. पालकांनी केलेले संस्कार खोलवर रूजले असतील तर पुढील आयुष्यात मुलाला त्या संस्कारांच्या आधाराने येणाऱ्या कोणत्याही परिस्थीतीला तोंड देण्याचे सामर्थ्य येते. म्हणुन बालकांवर योग्य त्या पध्दतीने संस्कार केले पाहीजे. कारण लहान बालक हे संस्कारक्षम असतात. अनुकरणशील असतात, लहान मुलांमध्ये अनुकरण करण्याची प्रवृत्ती अतिशय प्रबळ असते. साधारणतः 6 ते 7 वर्षांपर्यंत मुलांशी आपण तसे वर्तन करू, त्यांच्याशी जसे वागु त्यांना तशी सवय लागते, वळण लागते.

रविंद्रनाथ टागोर म्हणतात की, 'मूल म्हणजे कुंभाराच्या चाकावरील ओल्या मातीचा गोळा होय' त्याला आपण जसा आकार देऊ तसा तो घडत जातो. त्याला आकार देण्याचे महत्वपूर्ण कार्य प्रथम माता–पित्याचे असते. नंतर शिक्षकाचे मुलांना लहानपणापासून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी चांगल्या सवयी लावल्या पाहिजेत. तेव्हाच ते योग्य वर्तन करतील. समजा अयोग्य वर्तन केल्यास त्यांना अयोग्य सवयी लागल्यास त्याचा त्यांच्या व्यक्तीमत्वावर अनुकूल किंवा प्रतिकुल परिणाम होतात. म्हणुन त्यांना योग्य त्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रयत्न करावयास हवे.

आजचे युग हे बालकाचे युग आहे असे म्हटले जाते. तेव्हा प्रत्येक बालक हा शाळेत जाऊन शिक्षण घेतले पाहीजे त्यापासुन कोणत्याही बालक वंचित राहु नये, यासाठी सरकारचे सुद्‌धा प्रयत्न सुरूच आहेत. अशा परिस्थीतीत बालकाचे वर्तन कसे आहे? त्याच्या सवयी कशा आहेत? त्याच्या काही वर्तनसमस्या दिसतात का? याचा संपूर्णपणे आढावा शाळेतील शिक्षक व कुंटूबातील लोकांनी घ्यायला पाहीजे. व तसे आढळल्यास सोडविण्यासाठी तसे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

बालकांमधील वर्तनसमस्या आढळल्यास त्या कोणकोणत्या प्रकारच्या वर्तनसमस्या आहेत. याचा संपूर्ण अभ्यास करून त्यामागील कारणे कोणती, त्याचे परिणाम कोणते? त्यावर कोणकोणत्या उपयोजना करू शकतो? त्या वर्तनसमस्याचा कोणाकोणावर व कसा परिणाम होतो. म्हणजेच कुंटूबावर, मुलांवर, समाजावर, शाळेवर कसा परिणाम होतो? हया वर्तनसमस्या कशाप्रकारे ओळखावे याचा अभ्यास केला पाहिजे म्हणुन प्राथमिक शाळेच्या मुलांच्या वर्तनसमस्याचे अध्ययन करणे गरजेचे वाटले. म्हणुन हया मुलांच्या वर्तनविषयक समस्याचे अध्ययन करून वर्तनसमस्या सोडविण्यासाठी पालकांना व शिक्षकांना जाणीव करून देऊन त्यानुसार आपल्या मुलांशी त्यांनी वागणुक करावी. शाळेत येणारा प्रत्येक बालक विविध जाती, धर्मांचे, वशांचे, पंथाचे कोणी गरीब तर कोणी श्रीमंत तर कोणी मध्यम कुटूंबातील असतो. तेव्हा त्याच्यात काही वर्तनसमस्या आढळतात काय? त्याचा इतरांवर, त्यांच्यावर कश्याप्रकारे दुष्परीणाम होतात? याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणजेच बालकाच्या वर्तनसमस्याचे अध्ययन करणे आवश्यक व अत्यंत महत्वाचे आहे.

विकास ही अतिशय गुंतागुंतीची प्रदीर्घ अशी प्रक्रिया आहे. विकासाच्या प्रदीर्घ प्रवासात प्रत्येक व्यक्तीला अनेक महत्वपूर्ण अवस्थामधुन जावे लागते. या सर्व अवस्थाची प्रत्येकी काही ठळक लक्षणे व वैशिष्टये असतात.

शेक्सपियरने म्हटल्याप्रमाणे 'जग' नावाच्या रंगभुमीवर येणारा प्रत्येक जीव वयोमानाप्रमाणे वेगवेगळया भुमिका बजावत असतो.

विकास हा टप्याटप्याने होत असतो. त्याचा अभ्यास करण्यासाठी विकासाच्या विविध अवस्थांमध्ये विभागण्यात आले आहे. त्या अवस्था पुढीलप्रमाणे. 1. गर्भावस्था, 2. अर्भकावस्था, 3. शैशवावस्था, 4. बाल्यावस्था, 5. किशोरावस्था, 6. प्रौढावस्था व 7. वृध्दावस्था.

बाल्यावस्था:— या विविध अवस्थापैकी सर्वात संस्कारमय वय हे बाल्यावस्थेचे असते. म्हणुन जशी आपण त्यांच्याशी वागणूक करतो त्याचप्रकारे त्यांना सवयी लागतात. म्हणजेच जे संस्कार ते वळण आपण त्यांना या वयात लावतो तेच मोठेपणी टिकून राहतात. म्हणुन बाल्यावस्थेचा अभ्यास करावयाचा आहे. या वयातील मूले प्राथमिक शाळेत जावू लागतात, विविध अनुभव घेतात, बाहेरच्या जगाचा परिचय वाढतो. विकासाच्या विविध अवस्थापैकी बाल्यावस्था हे सर्वात संस्कारक्षम वय आहे. शैशावस्था व किशोरावस्था या मधील काळ म्हणजे बाल्यावस्था होय. या बाल्यावस्थेचे दोन भागात विभाजन केले जाते. 1. पूर्वबाल्यावस्था :— शालेयपूर्व अवस्था (Early Childhood) व 2. उत्तर बाल्यावस्था :— शालेय अवस्था ( Late Childhood) उत्तर बाल्यावस्था हे 6 ते 11—12 इतका कालावधीचा असतो. बालकांचे 6 व्या वर्षात पदार्पण झालेले असते ही प्राथमिक औपचारीक शिक्षणाची सुरूवात असते.

विषय निवड :— आजच्या माहिती व तंत्रज्ञान युगातील विकासाचा परिणाम मुलांच्या बालमनावर सकारात्मक व नकारात्मक प्रकारे आलेला दिसुन येतो. अशावेळी त्यांच्या वर्तनावर वेळीच नियत्रंण ठेवले नाही तर त्याचा अनिष्ट परिणाम बालकांच्या व्यक्तिमत्वावर तसेच समाजावर, देशावर, पर्यायाने, राष्ट्रावरही झालेला दिसून येईल देशाची धुरा सांभाळण्याचे महत्वाचे कार्य आपल्या नवपिढीला करावयाचे आहे. परंतु बालवयात ज्या बालकांमध्ये वर्तनसमस्या असतील त्या वर्तनसमस्येवर वेळीच उपाययोजना केली तर पुढचा भावी काळ सुखावह राहील. व बालकांच्या भावी विघातक प्रवृत्तीना प्रतिबंध घालता येईल. अशी कळकळीची भावना मनात निर्माण झाल्यामुळे बालकांच्या शैक्षिणक वर्तनसमस्या जाणून त्यावर उपयोजना करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :— 1. प्राथमिक शाळेतील मुलांमध्ये कोणकोणत्या प्रकारच्या वर्तनसमस्या आढळतात याचा शोध घेणे. 2. शालेय वातावरण व मित्रमंडळीमुळे बालकांच्या शैक्षणिक वर्तनसमस्येत वाढ होते काय याचा शोध घेणे. 3. शैक्षणिक वर्तन समस्यांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वार होणारा परिणाम अभ्यासणे. 4. कुटूंबप्रकाराचा (संयुक्त/विभक्त) बालकांच्या शैक्षणिक वर्तनसमस्येवर परिणाम होतो काय हे अभ्यासणे. 5. पालक—बालक संबंधावर शैक्षणिक वर्तनसमस्या अवलंबून असतात काय हे जाणून घेणे.

गृहितकृत्ये :— 1. ग्रामीण व शहरी भागातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्तनसमस्या प्रकटीकरणामध्ये व्यक्तीगत भिन्नता आढळून येते. 2. कुटूंबप्रकाराचा (संयुक्त/विभक्त) परिणाम बालकांच्या शैक्षणिक वर्तनसमस्यांवर झालेला आढळतो. 3. सामाजिक, आर्थीक, परिस्थीतीनुसार बालकांच्या शैक्षणिक वर्तन समस्या भिन्न असतात. 4. शैक्षणिक वर्तन समस्या सोडविण्यात पालक—बालक संबंधाचा खुप प्रभाव पडतो. 5. शैक्षणिक वर्तन समस्या सोडविण्यात शिक्षकांची भुमीका महत्वपूर्ण ठरते.

साहीत्य अवलोकन :— 'मुले ही देवाघरची फुले' या म्हणीप्रमाणे मुले म्हणजे देवाघरची फुले असून याचे उत्तम प्रकारे संगोपण करणे आवश्यक आहे. त्यासाठी बालशिक्षण व बालमानसशास्त्र याचा अभ्यास जाणुन घेणे, प्रत्येक पालकाचे, शिक्षकांचे कर्तव्य आहे. पण काळ झपाटयाने बदलत आहे. पाश्चिमात्य राष्ट्रामध्ये अन्य शास्त्राबरोबर मानसशास्त्राचा अभ्यास व संशोधन सुरू झाले होते. त्याचे निष्कर्ष हाती येत होते. मानसशास्त्रात प्रौढ मन व बाल मन यांची सांगड घातली बालसंगोपण करतांना बालशिक्षणाचा, आधुनिक विचार समजुन घेण्यासाठी बाल शिक्षणाच्या कल्पनेचा जन्म झाला व संगोपनाबरोबर शिक्षणाचा काहीसा प्रयत्न झाला.

डेनिस (Dennis) या शास्त्रज्ञाने 1949 मध्ये बालमानसशास्त्राचे संक्षिप्त वर्णन प्रकाशित केले. इतिहासात बालमानसशास्त्राचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने टाकलेले पुढचे पाऊल म्हणजे एका नव्या विचाराचा शोध होय. क्लार्क हॉल (Clark Hall) 1891 या प्रश्नोत्तरांना ऐतिहासिक महत्व आहे. बालवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी 17 व्या शतकात इ.स. 1628 साली 'जॉन ॲमास कॅमेनिअस' या शिक्षणतज्ञाने

(School of Infancy) तर 1654 मध्ये (Word in Piture) ही दोन पुस्तके बालकांसंबंधी प्रसिध्द केली त्याच्यामते बालक एक स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. त्यांचा भावना निराळया आहेत. 17 व्या शतकाच्या अखेरीस जॉन लॉक यांनी मुलासंबधी लिहीलेले मानसशास्त्रानुसार शिक्षणाचा मुळ उद्देश बालकांच्या नैसर्गिक संवेगांना लगाम घालुन नवीन सवयी बालकांच्या ठिकाणी निर्माण करणे असा आहे. रूसो या फ्रेंच तत्वज्ञाने आपल्या (Emile) या ग्रंथात बालकाला जन्मतःच चांगल्या–वाईटाची जाण नसते, पण ती सामाजिक नियंत्रणामुळे धोक्यात येते. 1877 मध्ये डार्विनचे “Biogrophical Sketchof an Infant” तर प्रेयर यांचे The mind of the child” ही पुस्तके लिहील्या गेली.

21 व्या शतकाला बालकाचे युग असे म्हणतात. आज बालकासंबधी वैज्ञानिक दृष्टया व मानसशास्त्रीय दृष्टया खुप अभ्यास केला जात आहे. त्यामुळे बालकांची पहिली 12 वर्षे अत्यंत महत्वाची आहेत. या मुद्यावर बालकांचा अभ्यास करतांना भर दिला जातो. त्यासाठी काही शास्त्रज्ञानी बालवर्तनाच्या अभ्यासासाठी काही बौध्दिक कसोटया काढल्या इतरही बरेच संशोधन केलेले आहेत. व अजुनही सुरूच आहेत व नवनवीन शोध ज्ञानात भर टाकीत आहेत.

संशोधन पध्दती :– प्रस्तुत विषयाचा अभ्यास करतांना भंडारा जिल्हयातील लाखनी तालुक्याला शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टया अनन्य साधारण महत्व आहे. लाखनी तालुक्यातील एकुण 131 शाळेपैकी समर्थ प्राथमिक शाळा या एका शाळेची निवड दैवनिदर्शन पध्दतीने करून 500 विद्यार्थ्यांमधून 100 विद्यार्थ्यांचा म्हणजे इयत्ता 1 ली, 2 री, 3 री, 4 थी, या चार वर्गातील प्रत्येकी 25–25 मुले व मुली या प्रमाणे एकुण 100 विद्यार्थ्यांचे अध्ययन केलेले आहे. यासाठी प्राथमिक शाळेतील मुलांच्या वर्तन समस्येचे अध्ययन करण्यासाठी सर्वात प्रथम शाळेत जाऊन विद्यार्थ्यांमध्ये समरूप होऊन त्यांना प्रश्न विचारले. त्यांचे निरीक्षण, सर्वेक्षण करून त्यांच्या पालकांच्या व शिक्षकांच्या मुलाखती घेऊन प्रश्नावली भरून घेतल्या. यासाठी क्षेत्र अभ्यास व बैठा अभ्यास दोन्ही पध्दतीचा उपयोग केला. वर्गात असलेल्या मुलं–मुली दोन्ही गटाचा अभ्यास केला.

वर्तनसमस्येची व्याख्या :– Valentine याच्या मताप्रमाणे, 'ज्या बालकांचे वर्तन आणि व्यक्तीमत्व एखादया गोष्टीमध्ये गंभीर स्वरूपाचे अप–सामान्य असते.

वर्तनसमस्येचे प्रकार :– 1. शारीरिक वर्तनसमस्या, 2. मानसिक वर्तनसमस्या, 3. भाषिक वर्तनसमस्या, 4. शैक्षणिक वर्तनसमस्या, 5. सामाजिक वर्तनसमस्या, 6. नैतिक वर्तनसमस्या, 7. आरोग्य विषयक वर्तनसमस्या, 8. क्रियात्मक वर्तनसमस्या, 9. आहार विषयक वर्तनसमस्या, 10. क्रिडात्मक वर्तनसमस्या, 11. कौटुंबीक वर्तनसमस्या.

शैक्षणिक वर्तनसमस्या :– ज्या मुलांच्या वर्तनात काही अडचणी येतात. व ते इतर मुलांच्या तुलनेत मागे पडतात व शिक्षणात योग्यरित्या प्रगती करू शकत नाही. अशा मुलांमध्ये शैक्षणिक वर्तनसमस्या निर्माण होतात. जसे– 1. शाळेत जायला आवडत नाही. 2) शिक्षकांविषयी भीती वाटते. 3) अभ्यासाची नावड निर्माण होते. 4) न्युनगंडाची भावना निर्माण होते.

सारणी क्र. 1

इयत्तेनुसार विद्यार्थ्यांची विभागणी

| अ.क्र. | इयत्ता | एकूण विद्यार्थी संख्या | मुले | मुली | ग2 Value |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 25 | 15 | 10 | 0.64 P>0.05 |
| 2 | 2 | 25 | 13 | 12 | |
| 3 | 3 | 25 | 15 | 10 | |
| 4 | 4 | 25 | 13 | 12 | |
| | | 100 | 56 | 44 | |

सारणी क्र. 2

शैक्षणिक वर्तनसमस्यांची कारणे

शैक्षणिक वर्तनसमस्यांच्या कारणाबाबत पालकांच्या व शिक्षकांच्या प्रतिक्रिया

| अ.क्र. | वर्तनसमस्यांची कारणे | प्रतिक्रीया | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 100 | ग2 Value |
| 1 | पती–पत्नी संबंध | 20 | 21 | 17 | 12 | 70 | 2.8(P>0.05) |
| 2 | चुकीचे संस्कार | 19 | 18 | 16 | 15 | 68 | 0.58(P>0.05) |
| 3 | परस्परविरोधी बोलणे | 24 | 24 | 25 | 25 | 98 | 0.04(P>0.05) |
| 4 | दुसऱ्यांशी तुलना करणे | 24 | 25 | 25 | 25 | 99 | 0.024(P>0.05) |
| 5 | मुलांकडून अत्याधिक अपेक्षा करणे | 20 | 21 | 23 | 25 | 89 | 0.65(P>0.05) |
| 6 | इतरांचा हस्तक्षेप | 10 | 11 | 09 | 07 | 37 | 0.94(P>0.05) |
| 7 | पालकांच्या योग्यतेचा अभाव | | | | | | |
| | 1 अपुरे शिक्षण | 19 | 17 | 22 | 21 | 79 | 0.74(P>0.05) |
| | 2 अपुरे सहकार्य | 10 | 15 | 21 | 20 | 66 | 4.69(P>0.05) |
| | 3 अपुरे मार्गदर्शन | 14 | 16 | 22 | 24 | 76 | 3.56(P>0.05) |
| 8 | आई–वडीलांची मानसिक स्थिती | 20 | 21 | 10 | 07 | 58 | 8.26(P<0.05) |
| 9 | आर्थिक परिस्थिती | | | | | | |
| | 1 अधिक उत्पन्न | 10 | 21 | 18 | 22 | 71 | 4.99(P>0.05) |
| | 2 कमी उत्पन्न | 15 | 20 | 22 | 24 | 81 | 1.65(P>0.05) |
| | 3 मर्यादीत उत्पन्न | 24 | 20 | 21 | 23 | 88 | 0.44(P>0.05) |

स्पष्टीकरण :– या सारणीवरून असे दिसुन येते की, मुलांमध्ये वर्तनसमस्या निर्माण होण्यास वरील संपूर्ण करणांमध्ये आई–वडीलांची मानसिक स्थिती Chi-Square Test 8.26 असून त्याची P Value (P<0.05) म्हणजेच सार्थक (Significance) आहे.

परिणाम :– 1) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक वर्तनसमस्येचे जास्तीत जास्त वाईट परीणाम झालेले दिसून येतात. त्यांचे अभ्यासात लक्ष लागत नाही. कोणतीही गोष्ट शिकविण्यासाठी मुलांचा मानसिक कल लक्षात घ्यावे, जर त्याच्या मानसिक क्षमते पलीकडील अपेक्षा ठेवली. व त्यात त्याला अपयश आले. तर मन निराश होते व ते अश्या परिस्थितीशी समायोजन करू शकत नाही.

2) पालकांकडून कळत न कळत होणारे भेदभाव, पक्ष पात, अत्याधिक अपेक्षा, उपेक्षा, अतिसरंक्षण इ. कारणामुळे मुलांमध्ये वर्तन समस्या निर्माण होतात.

3) पालक–शिक्षक सभेचे आयोजन शाळेत केले जाते. तेव्हा पालकांचे सहकार्य मिळत नाही. त्यामुळे पालक–शिक्षक यांच्यात योग्य ते बालकांच्या बाबतीत सुसंवाद होऊ शकत नाही. व त्यामुळे वर्तनसमस्या हे दोघांनाही नीट कळू शकत नाही त्याचे परिणाम मुलांवर, पालकांवर, शिक्षकांवर होत असतात.

4) आपल्या मुलांची दुसऱ्यामुलांबरोबर तुलना केली जाते. याचा परिणाम म्हणजे मुलांच्या मनात एक प्रकारे न्युनगंड तयार होते व ते इतर मुलांचा द्वेष करू लागतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची वर्तणुक बिघडते. व त्याचा पालकांवरही अयोग्य परीणाम होतो.

5) मुलांना काही शिकवितांना खेळाच्या माध्यमातून शिकवावे. त्यामुळे त्यांना त्या गोष्टी/विषय शिकतांना भीती वाटणार नाही. तो विषय सहज व चांगल्या प्रकारे शिकता येईल. व त्याबद्दल आवड निर्माण होईल.

6) शाळेत जर मित्रसंगती चांगली नसेल तर आपली मुलं बिघडतात, हे पालकांच्या लक्षात येत नाही. व त्याचा होणारा वाईट परिणाम सर्वांवर होत असतो.

7) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास नसेल तर कोणत्याही गोष्टीत सहभागी होणार नाही स्वतःत उत्साह दाखविणार नाही प्रत्येक कार्यात मागे–मागे राहील व आपण काहीही करू शकत नाही अशी न्युनगंड ची भावना त्यांच्या मनात निर्माण होईल.

8) कुटूंबात आवश्यक गरजाची पूर्ती न होणे, यामुळे वाईट मार्गाचा अवलंब करतात. त्यामुळे वाईट सवयी लागून नैतिक समतोल ढासळतो व त्याचे दुष्परीणाम कुटूंबातील व्यक्ती, मुलांवर, समाजावर होतो. व कुंटूंबात ताण–तणाव निर्माण होतो. व कौटूंबिक वातावरण कलह, भांडणे, यामुळे दुषित होतो.

9) समाजात अशिक्षित व कुसमायोजन असणाऱ्या कुटूंबाविषयी अयोग्य विचार निर्माण होतात. अशिक्षीत असणाऱ्या कुटूंबाशी संवाद साधण्यास टाळाटाळ करतात.

सुचना/शिफारशी :– मुलांचे संगोपन करणे हे काम खुप सोपेही आहे. आणि खुप कठिणही आहे. आई–वडीलांनी लक्ष न देता ही मुल आपणहुन वाढतात. पण त्यांना जे संस्कार, प्रेम, वळण ज्ञान देण्याचे कार्य होऊ शकणार नाही. पण योग्य संगोपन करायचे ठरवले तर पालक शिक्षक हा फार मोठा सागर आहे. आजचे युग हे धकाधकीचे आहे. जीवनाच्या क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा, माणसाच्या प्रगतीचा वेग अडवत उभे असते. जर प्रत्येक मुलाला उद्याचा यशस्वी नागरीक व्हायचे असेल, स्वावलंबी व्हायचे असेल तर मुलांचे हे सुप्तगुण जाणुन घेणे आवश्यक ठरते. परंतु आपल्या मनात काही पारंपारीक कल्पना फार खोलवर रूजलेले आहेत. आपले मुलं डॉक्टर, इंजिनीअर झाले तरच ते जीवनात यशस्वी झाले असा अनेक पालकांना दृढ गैरसमज असतो.

खरं म्हणजे आपली मुलं ही भावी काळातील आपली एकप्रकारे गुंतवणुकच असते. त्यामुळे ही गुंतवणुक जास्तीत जास्त समृध्द कशी करता येईल. हा विचार करणे पालकांसाठी आवश्यक बनले आहे. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक–बालक संबंध फार महत्वाचे आहेत. बालकांचे व्यक्तिमत्व हे पालक–बालक संबंधामुळे विकसित होण्यास मदत होते. त्यांना प्रेम, मायेची ऊब विश्वास, सुरक्षितता इ. गोष्टीची फार आवश्यकता असते. ती कुटूंबातून मिळालीच पाहीजे. त्याच्या आवश्यक गरजेची पुर्ती त्या कुटूंबातून पूर्ण होणे आवश्यक आहे.

फ्राईडच्या सिध्दांतानुसार, 'जन्मापासूनच बाळाच्या मनात दृढ विश्वास निर्माण होणे हे निकोप मनोवृत्तीच्या संवर्धनासाठी आवश्यक असते.'

उपायोजना :– 1. मुलांच्या शैक्षणिक वर्तन समस्या सोडविण्यासाठी त्यांच्यात योग्य संस्कार करावे. त्यांना योग्य वाचणाची, लिखाणाची आवड निर्माण करावी. त्यासाठी रामायण, महाभारत, सानेगुरूजींनी लिहीलेली श्यामची आई, बोधकथा, याशिवाय चांदोबा, चंपक लहान मुलांच्या कॉमीक्स वाचायला शिकवावे. 2. मुलांना व्यवहारी बनविण्यासाठी त्यांना प्रत्यक्षपणे व्यवहार करता यावे. म्हणुन त्यांना संधी द्यावी. उदा. 10 रूपये देवून त्यांचे सुटे पैसे घेऊन येण्यास सांगावे कारण मुले जेवढे व्यवहारी बनतील तेवढी ते लवकर प्रगती करतील हे लक्षात ठेवणे. 3. मुलांना कधीकधी घराबाहेर, निसर्गरम्य ठिकाणी घेऊन जावे. जेणेकरून नेहमीच्या जीवनापेक्षा काहीतरी नाविण्य वाटेल व मन प्रसन्न होईल व त्याचा कंटाळा निघून जाईल. 4. आपल्या मुलांची इतर मुलांशी तुलना करण्यापेक्षा त्याच्या कृतीचे कौतुक करावे. उदा. तुझे हस्ताक्षर सुधारले तुला अधिक मार्क मिळतील वरचा नंबर येईल असे पालकांनी समजावून सांगावे यासाठी प्रसंगानुसार हव्या त्या बक्षिसांचा वापर करावा. सुचना देतांना त्या सरळ व सोप्या शब्दात द्यावे. 5. मुलांना कोणतीही गोष्ट शिकवितांना खेळाच्या माध्यमाचा वापर करावा. त्यामुळे ती क्रिया लवकर अवगत केली जाते. व त्यांना टेन्शन येत नाही. 6. मुलांना टि. व्ही. वरील शैक्षणिक कार्यक्रम आर्वजुन पाहु द्यावे. जसे 'आओ बच्चो' हा कार्यक्रम सामान्यज्ञान वाढविणारा, प्रश्नमंजुषा सारखा कार्यक्रम, विविध क्रिडा स्पर्धाचे चित्रीकरण हे कार्यक्रम दाखवावे. जेणे करून मुलांच्या ज्ञानात भर पडेल. अमेरीकन बालरोग तज्ञ संघटनेच्या शिफारशी प्रमाणे एक ते दोन तास टि.व्ही पाहणे योग्य आहे. 7. मुलांना कशात आवड आहे. हे लक्षात घेऊन नुसता अभ्यासाकडे लक्ष न देता, ज्याच्यात आवड आहे. ते गुण समृध्द करण्यासाठी प्रयत्न करा. कारण प्रत्येकामध्ये अनेक सुप्तगुण असतात. त्यानुसार संधी व सोयी उपलब्ध करून द्यावे. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास वाढेल. काहीतरी करण्याची जिद्द निर्माण होईल. 8. शाळेतील पालक, शिक्षक सभेत प्रत्येक पालकाने उपस्थित राहून आपल्या बालकाच्या समस्या, वर्तणूक शालेय परीस्थितीशी समायोजन करतो की

नाही यावर शिक्षकांशी चर्चेच्या माध्यमातून सुसंवाद करून उपाय सुचविले पाहिजेत.

निष्कर्ष :— 1. मुलांच्या शैक्षणिक वर्तनसमस्येची कारणे व परिणामे पाहील्यावर असे लक्षात येते की, बहूतांशी पालक—बालक संबंध योग्य नसल्यामुळे समस्या निर्माण होतात. 2. प्राथमिक शाळेतील मुलांच्या शैक्षणिक वर्तन समस्या निर्माण होण्यास शालेय वातावरण व मित्र परिवार यांचा प्रभाव असल्याचे बऱ्याच अंशी जाणवते. 3. विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष लागत नाही. शालेय वस्तु घेऊन न दिल्यामुळे मॅडम—सर रागवतील ही भीती वाटते. 4. कुटूंबात असलेल्या अशिक्षीत, अडाणी आई—वडीलांचा तसेच समाजातील लोकांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्तनसमस्यावर अतिशय वाईट परिणाम होतात. 5. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्तनसमस्यांचे त्यांच्या एकुण व्यक्तीमत्वावर वाईट परिणाम होतात.

संदर्भ :—


१. बिना जोशी, उन्हाळी शाळा त्यांचे प्रश्न, संपादक भास्कर जोशी पुणे, एप्रिल 2002
२. डॉ. चंद्रकांत शंकर वागळे, मुले व त्यांचे प्रश्न, पॉपुलर प्रकाशन, मुंबई, वर्ष 1999
३. हरीभाऊ रा. मोहतुरे, असा आमचा भंडारा जिल्हा, नागपूर, 1999
४. इंदुमती शिरवाळकर, बाळाची पहिली सहा वर्षे, संपादक—अशोक केशव कोठवळे, मुंबई, 1996
५. मीना सुनिल गणोरकर, बाल विकास आदी संबंधित क्षेत्र, इ. अ. कुलकर्णी पुणे, 1982
६. डॉ. नलिनी वऱ्हाडपांडे, बालविकास, मनोहर पिंपळापूरे, नागपूर, 2000
७. डॉ. प्रदिप आगलावे, संशोधन पध्दती व तंत्रे, नागपूर विद्या प्रकाशन, 2000
८. डॉ. शिरीष विष्णु गुळवणी, मुलांच्या विकासात पालकांचा सहभाग, जाने. 2002
९. वनराज मालवी, तुमची मुले प्रतिभा संपन्न बाळे, सेल्फ डेव्हपमेंट प्रकाशन मुंबई, 2002
१०. त्रिवेणी फरकाडे, सुलभा भोंगे, बालविकासाची मूलतत्वे, मनोहर पिंपळापुरे नागपूर, जुन 2010

# भूमिहीन शेतमजुरांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक स्पष्टीकरण

**प्रा. चंद्रशेखर आर. भेजे,** समाजशास्त्र विभाग, आर्टस् कॉलेज, सिहोरा ता. तुमसर, जि. भंडारा

भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेती हा भारतीय लोकांचा मुलभूत व प्रमुख असा व्यवसाय असल्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. भारताच्या ग्रामिण भागातील मोठया प्रमाणावरील लोकांचे उत्पन्न मिळविण्याचे प्रमुख साधन शेती आहे. स्वातंत्र्यापूर्वी आधूनिक उद्योगधंदयाची वाढ व त्या अनूषंगाने शहरांची वाढ होण्यास आरंभ झाला होता. स्वातंत्र्याच्या पासष्ट वर्षामध्ये आधुनिक उद्योगधंदयाची व शहरे तसेच महानगरे यांची वाढ पुष्कळ वेगाने होऊनही दर शंभर माणसांपैकी साठ – सत्तर माणसे खेडयामधून राहत आहेत. आणि शेतीवर कोणत्या न कोणत्या प्रकारे अवलंबून आहेत. प्राचीन काळापासून खेडयांची अर्थव्यवस्था ही शेतीवर आणि शेतीशी सबंधित व्यवसायावर अवलंबून आहे.

देशातील फार मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. ही लोकसंख्या प्रामुख्याने खेडयातील आहे. ''1991 च्या आकडेवारीनुसार एकूण श्रमिकांपैकी 68ः लोक शेतीव्यवसायामध्ये गुंतलेले होते''[1] ग्रामिण भारतातील मोठया लोकसख्येला रोजगार पुरविण्याचे काम शेतीने केले आहे. ग्रामिण क्षेत्रात उद्योग व सेवा क्षेत्रातील उत्पन्नापेक्षा शेती क्षेत्रातील उत्पन्नाचा वाटा फार मोठा आहे. जगातील इतर कृषीप्रधान देशात साधारणपणे शेतमजूर आढळत नाहीत. कारण त्या देशामध्ये शेतजमीन पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. भारतात मात्र भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण बरेच अधिक आढळते. शेतकरी लोकांपैकी अठरा ते वीस टक्के लोक भूमिहीन आहेत.[2] भारतात ग्रामिण विभागातील बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असला तरी ते शेतीकडे एक व्यवसाय म्हणून न पाहता एक उपजिवीकेचे साधन या दृष्ट्रीनेच पाहतात. स्वतःच्या मालकीची शेती नसल्यास दुस–याच्या शेतीत स्वतःचे श्रम विकून उत्पन्न मिळविणे अथवा शेती उत्पादनासाठी उपयुक्त सेवा पुरवून उत्पन्न मिळविणे या मार्गानी भूमिहीन शेतमजूर उत्पन्न मिळवितात. हा गट शेतीत काम करतो ते मजुरी मिळविण्याच्या उद्देशाने. भूमिहीन शेतमजुराला उत्पन्नातील नफा मिळत नाही. मिळतो तो केवळ दिवसभर केलेल्या कामाचा मोबदला. व हया मोबदल्यातच हा भूमिहीन शेतमजूर सुख, समाधान मानून आपले आयुष्यातील जीवनाचे स्वप्न रंगवित असतो.

भारतात भूमिहीन शेतमजूर हे जास्त प्रमाणात आढळून येतात. शेतमालक व भूमिहीन शेतमजूर यांच्यात प्रभुत्व व परावलंबन यातून सबंध निर्माण झालेले दिसून येतात. शेतमालक व भूमिहीन यांच्या सबंधात भिन्नता दिसून येते. शेती नसलेले व विशेषतः दुस–याच्या शेतीवर श्रम करणारे जे लोक आहेत, त्यांना 'भूमिहीन शेतमजूर' म्हणतात. बहुतेक शेतकरी हे भूमिहीन शेतमजूर झाले आहेत. शेतीचा आकार लहान होत असल्यामुळे त्यांना त्यांच्याच शेतात संपुर्ण वर्षभर रोजगार मिळत नसतो. त्यामुळे तो शेवटी स्वतःची शेती विकून दुस–याच्या शेतीवर भूमिहीन शेतमजूर म्हणून मजुरी करीत असतो. अशा स्थितीत हया भूमिहीन शेतमजुरांना विविध प्रसंगाना तोंड द्यावे लागते. शेतमजुरांचा प्रश्न ही एक जखम बनली आहे. हे खरे आहे. व हया प्रश्नाकडे सर्वच सबंधीत लोकांचे दुर्लक्ष झाल्यामुळे ही जखम वाहते आहे. ती चिघळलेली आहे. या संदर्भात माजी राष्ट्रपती, श्री. संजीव रेड्डी यांनी त्यांच्या शब्दात 'या भारतामधील शेतमजुरांचा प्रश्न हा एक धुमसणारा ज्वालामुखी आहे. हा ज्वालामुखी केव्हाही जागृत होवून लाव्हा फेकू लागेल असे मत व्यक्त केले.'[3]

**भूमिहीन शेतमजूर कोण?ः–** भूमिहीन नेमके कोणाला म्हणायचे? हा प्रश्न पडतो. सरकारी नियमाप्रमाणे जी व्यक्ती तीन वर्षाहून अधिक काळ एखाद्या गावात वास्तव्य करते, व जिच्या नावे घरठाण व गावठाण नसून उदरनिर्वाहासाठी काही शेतजमीन नसते, ती व्यक्ती 'भूमिहीन शेतमजूर' होय. यांच्याकडे शेतीचे कौशल्य आहे, पण मालकीची शेतजमीन नाही. पिढयानुपिढया यांनी शेतमालकांची शेतमजूरी केली, दुस–याच्या शेतात राबून हे लोक पराजीत मनोवृत्तीने जगतात. सातबारा नावावर नसल्याने शेतीविषयक कुठल्याही सरकारी कर्जयोजनेला ते पात्र नाहीत. गावात त्यांच्यासाठी उकिरडा व शहरात झोपडपटया आहेत. भूमिहीन शेतमजूर कोण? ते खालील संकल्पनावरून स्पष्ट होते.

राष्ट्रीय श्रम आयोग : 'भूमिहीन शेतमजूर ते आहेत की, जे अकुशल व अव्यवस्थीत आहेत, ज्यांच्याजवळ

जिविकोपार्जनासाठी श्रमाव्यतिरीक्त काहीही नाही. ज्यांचा अर्थप्राप्तीचा सर्वात जास्त भाग शेतीच्या मजुरीवर अवलंबून आहेत.'[4]

1961 च्या जनगणनेनुसार, 'त्या व्यक्तींना भूमिहीन शेतमजूर म्हटल्या गेले की, जे दुस—यांच्या शेतीवर शेतमजुरी करतात, आणि ज्यांना नगदी अथवा वस्तुंच्या स्वरूपात उत्पादनाचा मोबदला मजुरी म्हणून दिला जातो.'[5]

'स्वतःच्या घराव्यतिरीक्त काहीही शेतजमीन नसणारी व एकूण मिळकतीच्या पन्नास टक्यांपेक्षा जास्त उत्पन्न शेतातील मजुरीपासून मिळविणारी व्यक्ती म्हणजे 'भूमिहीन शेतमजूर' होय.'[6]

वरील सर्व व्याख्यांचा परामर्श लक्षात घेता भूमिहीन शेतमजूर ते आहेत की, ज्यांच्याजवळ अजिबात शेती नाही, व जे कृषी क्षेत्रात मजुरी करतात. तसेच वर्षाचे जास्तीत जास्त दिवस शेतमजुरी करतात व ज्यांचा अर्थप्राप्तीचा अधिकतम भाग शेतीतून प्राप्त होणा—या मजुरीवर अवलंबून आहे असा भूमिहीन शेतमजुरांचा अर्थ लावला जातो.

उपरोक्त व्याख्येवरून भूमिहीन शेतमजुरांची वैशिष्टये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात. 1. भूमिहीन शेतमजूर हे दुस—याच्या शेतीवर शेतमजूर म्हणून काम करतात. 2. भूमिहीन शेतमजुरांना शेतावर काम करतांना मजूर म्हणून निश्चित दराने मजुरी प्राप्त होते. 2. भूमिहीन शेतमजुरांना प्राप्त होणारी शेतमजुरी ही शेतमजूर आणि त्यांच्या कुटूंबाचा जीवननिर्वाह करण्यासाठी उपयुक्त असते. 4. भूमिहीन शेतमजुरांना वर्षभर शेतात काम उपलब्ध होईलच असे सांगता येत नाही. काही दिवस त्यांना बेरोजगार म्हणून राहावे लागते. 5. भूमिहीन शेतमजुरांना प्राप्त होणारा मजुरी दर हा कामाचे स्वरूप आणि कालावधीच्या तुलनेत कमी असतो. शेतमजूर हे शेतीसोबत शेतीपुरक व्यवसायामध्ये काम करतात. बहुतेक भुमिहीन शेतमजूर विखूरलेले आढळून येतात.

भूमिहीन शेतमजुरांचे एकूण उत्पन्न कमी असल्याने त्यांचा सामाजिक दर्जा व जीवनविषयक दर्जा हा निम्न प्रतीचा आढळून येतो. शेतमजुरांमध्ये कर्जबाजारीपणा दिसून येतो. भूमिहीन शेतमजुरांना जिविकोपार्जनासाठी त्यांची स्वतःची काहीही शेतजमिन नसते. त्यामुळे त्यांना इतर शेतकरी, शेतमालक यांच्यावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे त्यांच्यात आर्थिक परावलंबनाची स्थिती आढळून येते.

**भूमिहीन शेतमजुरांची निर्मिती कशी झाली?** :— पुर्वी भारतात शेतसारा वसूल करण्याच्या जमिनदारीसारख्या अन्यायकारक पध्दती होत्या. जमिनदार आपल्या मर्जीप्रमाणे निरनिराळया शेतक—यांकडून सारा वसूल करीत असत. कोणत्याही अटिवर जमीन मिळवून पोटासाठी धान्य पिकविण्याची गरज असल्याने जमीनदार शेतक—यांकडून जास्त सारा वसूल करू लागले. यातून जमिनदार श्रीमंत बनले, गरीबीमुळे अडचणीच्यावेळी कर्ज घ्यायची वेळ येत असे. याचा फायदा सावकारी करणारे व्यापारी व जमिनदार घेत असत आणि वाटेल त्या अटीवर कर्ज देत असत. यातून कर्जापोटी जमीन गमवायची वेळ शेतक—यांवर येत असे. यातून एकीकडे मोजके श्रीमंत आणि बाकी गरीब अशी रचना निर्माण झाली. श्रीमंताची जमिनीवर मालकी वाढत गेली आणि बाकी लोक मजूर बनले. त्यातही ज्यांच्याजवळ अजिबात जमीन राहीली नाही अशांना 'भूमिहीन' बनून दुस—यांच्या शेतात मजुरी करण्याशिवाय गत्यंतर राहीले नाही.

वाढती लोकसंख्या, पर्यायी रोजगाराचा अभाव, पारंपारीक विचारसरणी आणि वारसा हक्क कायदा यामुळे शेतक—यांजवळील जमीनीचे मोठया प्रमाणावर विभाजन होत गेले. याचा परिणाम म्हणून लहान जमीन असणा—यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत गेले व कालांतराने अशा अल्पभूधारकांना कर्ज घ्यावे लागले. हे अल्प भूधारक कर्जाचा मोठा भाग घरगुती गरजा भागविण्यासाठी, लग्नासाठी खर्च करतात. कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या अल्पभूधारकांजवळ आपली शेती सोडणे एवढाच मार्ग असतो. व यातच त्यांना आपल्या जमीनी सावकाराकडे हस्तांतरीत कराव्या लागतात. अर्धमजुरी करण्याऐवजी पूर्ण शेतमजूर होण्याची वेळ त्यांच्यावर येते. व त्यातून त्यांना शेवटी शेतीला रामराम ठोकून भूमिहीन होण्याची वेळ येवून तुटपूंज्या मजुरीवर दुस—याच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम करणे एवढाच त्यांच्यापूढे पर्याय असतो.

'भूमी वितरणाचे वाटप हे असमान स्वरूपाचे आहे, काही कुटूंबाजवळ भरपूर शेती आहे, तर काहींजवळ अत्यंत कमी भूमी असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती हीन आहे. त्यातही अनेक ग्रामिण कुटूंबे भूमिहीन आहेत की, ज्यांच्याजवळ स्वतःची झोपडी बनविण्यासाठी सुध्दा जमीन नाही. भूस्वामीत्वाच्या असमान वितरणाच्या कारणामुळे भारतीय कृषीची

संरचना त्रिस्तरीय पिरॅमिडसारखी दिसून येते. ज्यांच्या आधारावर शेतमजुरांची निर्मिती होते व ज्यामध्ये खालच्या टोकाला अधिकतर भूमिहीन दिसून येतात. असेच लहान शेतकरी व अल्पभूधारक अधिक प्रमाणात आहेत. मध्यंतरी मध्यम स्वरूपाचे शेतकरी संख्येने कमी आहेत व वरच्या टोकाला मोठे शेतकरी आहेत, जे मुख्यतः ब्रिटीश काळापासून भूस्वामित्व म्हणून सुखी, संपन्न जीवन जगत आहेत.'[7]

**भूमिहीन शेतमजूरांची आर्थिक स्थिती :–** भूमिहीन शेतमजुरांना आजच्या परिस्थितीत अनेक प्रसंगाना तोंड द्यावे लागते. कारण त्यांचे सर्व एकमेव उत्पन्न म्हणजे रोजच्या श्रमाचा मोबदला होय. त्यांच्या सद्यःपरिस्थीतीनूसार विचार केल्यास ते जीवनच कसे जगतात हे सांगणे कठीण आहे. या लोकांचा जीवनस्तर फार निम्न स्वरूपाचा आहे. कमी उत्पन्नामुळे हे पोटासाठी फार कमी खर्च करतात. आपल्या महत्वपूर्ण आवश्यकता सुध्दा सरळपणे पुर्ण करू शकत नाही. भूमिहीन शेतमजूर आपल्या उत्पन्नाचा जवळपास 77 टक्के भाग खाद्य पदार्थावर, 6 टक्के भाग कपडयांवर, 8 टक्के भाग इंधन व वीज तर 9 टक्के भाग सेवा व अन्य बाबीवर खर्च करतात. सर्वसामान्यपणे हे लोक ठोकळ धान्य व खंडा जेवणात उपयोगात आणतात. पौष्टिक पदार्थांचा व अन्नाचा वापर यांच्या जीवनात नाहीच्या बरोबरच असतो.[8]

भूमिहीन शेतमजुरांच्या समस्यांमधून त्यांच्या आर्थिक स्थितीचे दर्शन होत असल्याचे दिसते.

**मजुरीच्या दराविषयी अनिश्चितता :** भूमिहीन शेतमजुरांच्या उत्पन्नासबंधी पाहणी केल्यानंतर असे आढळून येते की, मजुरी ही दर दिवसाला फार अल्प प्रमाणात दिली जाते. भूमिहीन शेतमजुरांना केवळ हंगामाच्या वेळेसच योग्य मजुरीचा मोबदला दिला जातो. त्यातही उन्हाळयाच्या दिवसात कामाच्या अभावामुळे मजुरीचा दर वेगळाच दिसून येतो. मध्यंतरीच्या काळात वाढलेल्या महागाईचा विचार करता शेतमजुरांना मिळणा–या निव्वळ मजुरीमधील पुरेशी वाढ झालेली नाही. त्यामुळे भूमिहीन शेतमजुरांचे उत्पन्न फारच कमी आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती फारच दयनिय आहे.

**कामाचा अनियमित कालावधी :** भूमिहीन शेतमजुरांकडून ठरलेल्या वेळेव्यतिरीक्त अतिरीक्त श्रम करवून घेतात. मात्र त्याचा मोबदला अल्पप्रमाणात दिला जातो. नेमके कीती तास शेतमजुरांकडून काम करवून घ्यावे याची सुध्दा कुठलीही निश्चितता नसल्यामुळे भूमिहीनांना आपल्या शरीराची हाडेच झिजवावी लागतात. त्यामुळे त्यांची आर्थिक बाजू गंभीर असल्याचे आढळून येते.

**शेतमजुरांच्या अत्यल्प उत्पन्नामुळे आर्थिक स्थिती निम्न स्वरूपाची :** भूमिहीन शेतमजुरांना केवळ दिवसाच्या मजुरीच्या उत्पन्नावरच अवलंबून राहावे लागते. कारण भारतीय शेती ही केवळ एक आर्थिक क्रिया नाही तर ती एक ग्रामिण भागातील लोकांची जीवनपध्दती आहे. ती शेतमजुरांच्या जीवनांशी निगडीत असणारी आर्थिक क्रिया असल्यामुळे शेतमजूर कुटूबांना अल्प उत्पन्नात दुर्देवी परिस्थितीतच जीवन जगण्यास प्रवृत्त करीत असल्याचे दिसते.

**रिकाम्या वेळेचा दुरूपयोग :** कामाच्या वेळेत भूमिहीन शेतमजूर श्रम गाळतात व त्याच्या मोबदल्यात अर्थप्राप्ती करतात. बरेच भूमिहीन शेतमजूर रिकाम्या वेळेचा विनियोग वाईट मार्गाने करतात. रिकाम्या वेळेचा उपयोग जुगार खेळणे, गप्पा गोष्टी करणे, पानटपरीवर वेळ घालविणे, मद्यपान करून नशेत राहणे इत्यादी बाबीमध्ये घालवितात. त्यामुळे त्यांची आर्थिक उन्नती न होता ते गरीबीतच जीवन घालवितात.

**खर्चाचे नियोजन चुकीच्या पध्दतीने :** प्राप्त झालेल्या मजूरीचे नियोजन चुकीच्या पध्दतीने होत असल्यामुळे अशा कुटूंबातील लोक सदैव गरीबीतच जीवन जगतात. कारण मिळकत कमी व खर्च जास्त असतो. त्यातही कोणत्या बाबीला किती महत्व द्यायचे, कोणत्या बाबीवर किती खर्च करायचे, भविष्यासाठी किती बचत करायची, प्रसंग ओढवल्यास पैसा कुठून आणायचा या बाबीचे कुठलेही नियोजन नसते. त्यामुळे अशा कुटूंबातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती हीन दर्जाची असल्याचे दिसून आले.

**कमी बचत :** अल्प उत्पन्नाअभावी भूमिहीन शेतमजूर फार कमी बचत करतात. त्यांच्या कमी उत्पन्नातून ते आपल्या गरजांची पुर्ती करू शकत नाही. म्हणून हे लोक बचत करू शकत नाही. बचत कमी म्हणून गुंतवणूक कमी असल्यामुळे अन्य ठिकाणी सुध्दा रोजगाराची संधी देखील कमी आहे. त्यामुळे देशाचा पर्यायाने समाजाचा सुध्दा विकास होत नाही.[10]

**यांत्रिकीकरणामुळे बेकार राहण्याची पाळी :** आधुनिक युगात शेती ही विशेषतः यंत्राने केली जाते.

त्यामुळे मनुष्यबळाचा वापर सुध्दा कमी केला जातो. या यंत्रयुगाचा परिणाम मानवी जीवनावर होत असून त्यामुळे भूमिहीन शेतमजुरांवर उपवाशी मरण्याची पाळी आलेली आहे. कारण दहा मजुरांचे काम केवळ एकच यंत्र करते. अशावेळी शेतमजुरांच्या हाताला काम मिळत नाही व त्यांना निकामी राहण्याची वेळे येते. व यंत्र हाताळण्याचे कौशल्यही त्यांच्यात नसते. त्यामुळे संपूर्ण कुटूंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न त्यांच्या समोर असतो.

**वाढते किंमतमान** : सन 1950 पासून आणि विशेषतः सन 1970 पासून वाढत्या किंमतीची प्रवृत्ती निर्माण झाली असल्याने स्थिर उत्पन्न गटातील शेतमजुरांची स्थिती तसेच ज्यांच्या उत्पन्नात केवळ मामुली वाढ झाली आहे. अशा शेतमजुरांची स्थिती अधिकच कष्टमय झाली आहे.[11] जेथे पूर्वी शेतमजुरांना वस्तुच्या स्वरूपात मजुरी दिली जाई, तेथेही वस्तुच्या स्वरूपात मजुरी देण्याची पध्दती बंद करून जमीनमालक पैशाच्या स्वरूपातच मजुरी देवू लागले आहेत. पण पैशाची मुल्य अलिकडील काळात फार मोठया प्रमाणात घटू लागल्याने केवळ जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे ही भूमिहीन शेतमजुरांना कठिण झाले आहे.

याबरोबरच हंगामी स्वरूपाच्या शेतीवरच उदरनिर्वाह, मासीक आय प्राप्तीत अन्य सदस्यांचे अत्यल्प सहकार्य, वाईट सवयींवर खर्चाची उधळपट्टी, जोडधंदयाचा अभाव, कमी मजुरी ऋणग्रस्ततेसाठी जबाबदार, कामाचा अनियमित कालावधी, निसर्गावर अवलंबून असलेला कृषी व्यवसाय, शेतमालाला कमी भावामुळे शेतमजुरांची कुचंबना, इत्यादी सर्व मुद्यावरून भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचे दर्शन होते.

**भूमिहीन शेतमजुरांची सामाजिक स्थिती** :– व्यक्तीला समाजात सामाजिक दर्जा प्राप्त होण्यासाठी पैशाची गरज असते. त्यामुळे व्यक्तीच्या आर्थिक स्थितीवरच त्याची सामाजिक बाजू निर्धारित असते. भूमिहीन शेतमजुरांच्या समस्येचा आधार सामाजिक व आर्थिकच आहे. नगदी उत्पन्नाच्या अभावी शेतमजुरांच्या जीवनाचा आर्थिक पक्ष मात्र फारच दुबळा होतो.

भुमिहीन शेतमजुरांचे राहणीमान हे त्यांच्या मिळणा–या मजुरीवर अवलंबून आहे, कुटूंबाच्या आकारावर अवलंबून आहे. हे शेतमजूर आपल्या उत्पन्नाव्दारे कुटूंबातील व्यक्तींना पोटभर अन्न, व पुरेशे वस्त्र, राहण्याकरिता योग्य घर देवू शकत नाही. कुटूंबातील सदस्य आजारी पडल्यास त्यांच्या औषधोपचारावर योग्य खर्च करू शकत नाही. सामाजिक रूढी परंपरा टिकविण्याच्या दृष्टीने सनसमारंभावरती आपल्या मनाप्रमाणे योग्य प्रकारे खर्च करू शकत नाही. भूमिहीन शेतमजुरांच्या सामाजिक स्थितीविषयी माहीती पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट होण्यास मदत होते.

**भूमिहीन शेतमजुरांची गृहस्थिती** :– भूमिहीन शेतमजुराला योग्य मजुरी व उत्पन्न, घर मिळाले तर तो अधिक कार्यक्षमतेने काम करू शकतो. स्वतःचे घर असल्यास व्यक्तीचा सामाजिक दर्जा उंचावतो. परंतु शेतमजुरांना घरांची उपलब्धता होत नसल्यामुळे त्यांचे सामाजिक जीवन अतिशय निकृष्ठ असल्याचे दिसते. 'कधी कधी भूमिहीन शेतमजूर आपल्या झोपडीच्या सभोवताल शेतमालकांच्या गुरांनाही बांधतात, तिथेच कोंबडया, बक–यांचे अस्तित्व असते. एक प्रकारे भूमिहीन शेतमजुरांचे जीवन जनावराच्या गोठयाप्रमाणे असते. त्यामुळे हया भूमिहीनांचे व त्यांच्या कुटूंबियांचे आरोग्य नेहमीच बिघडत असते.'[12]

**जमिनीच्या अभावामुळे प्रतिष्ठेचा प्रश्न** :– खेडयात राहणा–या कुटूंबाजवळ जमिनीचा लहानसा तुकडा जरी असला तरी तो त्याच्या आर्थिक जीवनाचा आधार असतो. जमीनीची मालकी असल्याशिवाय कुटूंबाला खेडयामध्ये प्रचलित असलेल्या समाजव्यवस्थेत स्थानही मिळू शकत नाही. भूमिहीन शेतमजुरांकडे शेतजमीन नसल्यामुळे त्यांच्या मुलांच्या विवाह जोडणीत ब–याच अडचणी आल्याचे दिसून येते. भूमिहीन शेतमजुरांच्या जीवनाला जमिनीचा आधार नसतो. त्यामुळे त्याला स्वतःचा व कुटूंबियाचा उदरनिर्वाह कसा करावा असा प्रश्न पडतो.

**दैनंदिन वातावरण** :– रोजच्या भुकेसाठी प्रत्येक व्यक्तीला स्वतः काहीतरी करावे लागते. परंतु शेतमजूर हा एक असा घटक आहे की, त्याला संध्याकाळी झोपल्यानंतर उद्या कोठे काम मिळेल ही चिंता तो सतत करीत असतो. व त्यादृष्टीने तो सतत प्रयत्नशिल असतो. दैनंदिन वातावरणात त्याला समाजातील इतर घटक झोपलेले दिसतात. तोच या शेतमजुराला दिवस उगवण्याच्या अगोदरच दुस–याच्या दारात मजुरी मागण्यासाठी उभे राहावे लागते व मालक सांगेल ते काम करावे लागते. त्यात त्याला कोणताही फेरबदल करता येत नाही.

**कुटूंबातील सदस्यांची वाढती संख्या :–** आर्थिक उत्पन्नाचा विचार न करता दर दिड ते दोन वर्षाला कुटूंबात एका नव्या मुलाला जन्म देतात. अल्पवयात होणारे ग्रामिण भागातील विवाह आणि प्रजोत्पादनाचा दिर्घ कालावधी यामुळे कुटूंबातील सदस्यांची संख्या वाढतच जाते. कुटूंबातील सदस्यांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहासाठी आणि उत्पन्नाचे साधन शोधण्यासाठी शेतमजुरास बराच त्रास होतो. कुटूंबातील सदस्यांची वाढती संख्या आणि तुटपुंजे उत्पन्न यामुळे शेतमजुरांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ स्वरूपाचा असल्याचे दिसून येते.

**शेतमालकाकडून अपमानास्पद वागणूक :–** भूमिहीन शेतमजूर हा एक धनहीन घटक आहे. व तो रोजच्या रोजी–रोटीचा भुकेला आहे असे समजून शेतमालक त्यात त्याची आणखी परिक्षा घेतल्यासारखे करतात. व त्यांना कमीत कमी मजुरीत जास्तीत जास्त काम कसे घेता येईल या प्रयत्नात असतात, व विशेष म्हणजे मजुरांचे शोषण करण्यासाठी शेतमालक संघटीत झालेले असतात. भूमिमालक शेतजुरांकडून कष्टाची कामे करून घेतात. एक प्रकारे जनावरांप्रमाणे वागणूक देत असतात.

**श्रेष्ठ कनिष्ठतेची भावना :–** शेतमालक व शेतमजूर यांच्यात परस्पर सबंधामध्ये उच्च–निम्नतेची भावना दिसून येते. आपले जास्तीत जास्त काम कसे निघेल याकडेच फक्त शेतमालकाचे लक्ष असते. श्रेष्ठत्वाच्या व श्रीमंतीच्या भावनेतून शेतमालक मजुराला वागवित असतो. माणुस म्हणून जन्माला येवूनही एक माणुस दुस–या माणसाला माणुसकीच्या वागण्यापासून वंचीत करीत असतो. आजही उच्च जातीतील भूमिमालक निम्न जातीतील भूमिहीन शेतमजुरांशी स्पृश्य–अस्पृश्य असा भेदभाव पाळतांना दिसतात. बहुतांश भूमिहीन शेतमजूर वर्षानुवर्षापासून उपेक्षित व मागास जातीचे सदस्य आहेत. ज्यांची सामाजीक स्थिती मुक्या प्राण्यासारखी दिसून येते. यामुळे हे भूमिहीन शेतमजूर शेतमालकांशी मजुरीच्या संदर्भात कोणतीही सौदेबाजी करू शकत नाही.[13]

**कौटुंबिक व सामाजिक विघटन :–** कमी उत्पन्नामुळे कुटूंबप्रमुख व्यक्ती कुटूंबातील सदस्यांच्या गरजांची पुर्ती करण्यास असमर्थ ठरतात. व्यसनांच्या आहारी गेलेल्या भूमिहीन शेतमजुरांचे मानसिक संतूलन बिघडलेले असते. त्यामुळे पती पत्नीमध्ये सदैव भांडणे होतात. करीता कौटुंबिक विघटनाची स्थिती उद्भवते. वाईट व्यसनामुळे वैयक्तिक विघटन, कौटुंबिक विघटन, सामाजिक विघटन घडून येते. नशेत व्यक्ती विचलीत व्यवहार करतो, त्याचा परिणाम भूमिहीन शेतमजुरांच्या समाजिक जीवनावर होतो. हया स्थितीमुळे भूमिहीन शेतमजुराला व त्याच्या कुटूंबियांना कोणताही मान दिला जात नाही.

**निम्न जीवनस्तरामुळे दयनिय सामाजिक स्थिती :–** या लोकांचा जीवनस्तर फार निम्न प्रतीचा असतो. अल्प उत्पन्नामुळे ते चांगले भोजन करू शकत नाही. साफ कपडे वापरू शकत नाही. कधी कधी तर त्यांच्या घरातील सदस्यांना उपवाशीच राहावे लागते. त्यांच्या बाबतीत म्हटले जाते की, ते अर्धपोटी जेवण करतात. आणि अर्धनग्न वस्त्र त्यांच्या नशिबी असते.

**सुरक्षिततेची हमी नाही :–** आज मोठमोठे शेतमालक भूमिहीन शेतमजूर महिलांना आर्थिक बाबीचे आमिष दाखवून त्यांचा लैगिंक छळ करीत असल्याच्या घटना वृत्तपत्रामध्ये येतात. स्वतःच्या इज्जत व लाज वाचविण्यासाठी अशा स्त्रिया आपल्यावर ओढवलेल्या प्रसंगाची वाच्यता कुठेही करीत नाही. पोटासाठी भूमिहीन शेतमजूर महिलेला आपली अब्रू रस्त्यावर मांडावी लागते. याचाच अर्थ तिला सुरक्षिततेची कुठलीही हमी दिसून येत नाही.

**स्थलांतराच्या संकटामुळे कुटूंबाकडे दुर्लक्ष :–** शेतीच्या हंगामी स्वरूपामुळे मोसम संपल्यानंतर भूमिहीन शेतमजुरांना काम मिळविण्यासाठी वणवण फीरावे लागते. काही दिवसासाठी आपल्या कुटूंबियाला पोरके टाकून तसेच वृध्द माता–पित्यांना सोडून बाहेर स्थलांतरीत होण्याची पाळी या भूमिहीन शेतमजुरांवर येते. आपल्या मुलाबाळांना प्रेम, सहानुभूती देवू शकत नाही. एक प्रकारे स्थलांतरामुळे हया भूमिहन शेतमजुरांचे त्यांच्या कुटूंबाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

**दारिद्रयाचा समाज जीवनावर परीणाम :–** दारिद्रयामुळे ते कुटूंबातील इतर सदस्यांच्या गरजांची पूर्ती करू शकत नाही. समाजाची जी काही मुल्ये आहेत त्या मुल्यानूसार ते जीवन जगू शकत नाही. दररोजच्या जेवणात जेवढया कीलोकॅलरीजची आवश्यकता शरीराला आहे. तेवढे आहार त्यांना मिळू शकत नाही. दारिद्रयातच जन्मलो व दारिद्रयातच आपल्याला मरायचे आहे. असा त्यांचा समज झालेला

दिसून येतो. बेटेली, गौ व शर्मा म्हणतात की, वाढते दारिद्रय हेच गरीब शेतक–यांच्या व भूमिहीन शेतमजुरांच्या आंदोलनाचे कारण आहे.[14]

याबरोबरच निरक्षरता व अज्ञान, शेतीव्यतिरिक्त अन्य कामावर फसवणूक, समाजातील स्थान व सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव, सामाजिक प्रथा, परंपरांचे पालन करण्यास असमर्थ इत्यादि बाबीवरून सूध्दा भुमिहीन शेतमजुरांच्या सामाजिक जीवनाविषयीची स्थिती प्राप्त होते.

**निष्कर्ष** :– 1. भूमिहीन शेतमजुरांची कौटुंबिक स्थिती निम्न स्वरूपाची आहे. त्यांचे वास्तव्य अतिशय निकृष्ट अशा घरात असल्यामुळे त्यांचे राहाणिमान निकृष्ट प्रतीचे असल्याचे दिसून येते. 2. भूमिहीन शेतमजुरांना मिळणारा रोजगार हा हंगामी स्वरूपाचा असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती निम्न दर्जाची असल्याचे आढळून येते. 3. हीन स्वरूपाची आर्थिक स्थिती त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास व सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यात अडसर ठरते. 4. आजही शेतमालकाकडून भूमिहीन शेतमजुरांचे आर्थिक शोषण होत असल्याचे दिसून येते. 5.भूमिहीन शेतमजुरांचे आर्थिक व सामाजिक जीवन अत्यंत दुःखी असल्याचे दिसून येते. 6.भूमिहीन शेतमजुरांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचे दिसून येते. 7.बहुसंख्य भूमिहीन शेतमजूर कर्जबाजारी असल्याचे दिसून येते.

**उपाय** :– 1. भूमिहीन शेतमजुरांना 'घरकुल' योजनेअंतर्गत जागेची व घर बांधण्याची व्यवस्था शासनाकडून करण्यात यावी. 2. भूमिहीन शेतमजुरांना वर्षभर काम मिळता यावे म्हणून अनेक उद्योगधंद्याची निर्मिती करण्यात यावी. 3.भूमिहीन शेतमजुरांचे शोषण थांबविता यावे यासाठी कायद्याव्दारे त्यांना योग्य ते संरक्षण देण्यात यावे. 4.शासनाकडून राबविल्या जाणा–या विविध शासकीय योजनांचा भूमिहीन शेतमजुरांना पूरेपूर फायदा मिळवून द्यावा. 5. भूमिहीन शेतमजुरांना अनुदानात्मक आर्थिक सहाय्य देण्यात यावे, जेणेकरून त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

---


संदर्भ :–

१. प्रा. संजय सावळे : (3) भारतीय खेडी : अर्थ व राजकारण, ग्रंथनिर्मीती केन्द्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, नोव्हेंबर, 2002, पृ. 73
२. डॉ. सुधाकर शास्त्री, भारतीय अर्थव्यवस्था, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, 2004, पृ 131
३. डॉ. प्रभाकर देशमुख, भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, 1987, पृ 170
४. श्री.गुप्ता एम.एल., डॉ.शर्मा डी.डी. प्रतियोगिता साहित्य भवन प्रिंटर्स, आगरा, 2003, पृ. 82
५. Ibid पृ. 82
६. प्रा. काळे/प्रा. डोईफोडे/प्रा. राजदेरकर (1) ग्रामिण भारताच्या समस्या, य. च. म. मुक्त.विद्यापीठ, नाशिक, ऑगष्ट 2002, पृ. 90
७. डॉ. बद्री विशाल त्रिपाठी, भारतीय कृषी, किताब महल, एजन्सिज, इलाहाबाद, व्दितीय आवृत्ती 1992, पृ. 373
८. प्रा. गुप्ता. एम.एल. डॉ. शर्मा.डी.डी. प्रतियोगीता साहित्य, भवन प्रिंटर्स, आगरा 2003, पृ. 84
९. गुरूनाथ नाडगोंडे, सामाजिक आंदोलने, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे 1986, पृ. 16
१०. डॉ. प्रदीप आगलावे, आधूनिक भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर. 1984, पृ. 141
११. डॉ. देसाई/डॉ. सौ. भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पूणे, पृ. 255
१२. जयप्रकाश मिश्र, कृषी अर्थशास्त्र, साहित्य भवन, पब्लिकेशन्स, आगरा, 2009 पृ. 162
१३. बी. सी. सिन्हा, भारतीय अर्थशास्त्र : विकास सम्बंध्द, लोकभारती प्रकाशन, ईलाहाबाद, 1970 पृ. 338
१४. गुरूनाथ नाडगोंडे, सामाजिक आंदोलने, कान्टिनेंटल प्रकाशन, पूणे, 1986, पृ. 12

# पु. ल. देशपांडे यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातून प्रकट होणारे सामाजिक मानस

**प्रा. गामा सेलोकर,** कला व वाणिज्य महाविद्यालय, पेट्रोलपंप (जवाहरनगर), त.जि.भंडारा–441 906
Mob. 9823521187 e-mail : selokar28@rediffmail.com

'तुझे आहे तुजपाशी' हे 'भाग्यवान' नंतर 1957 साली प्रसिद्ध झालेले पुलंचे चौथे नाटक आहे. आणि स्वतंत्ररित्या लिहिलेले दुसरे नाटक होय. मुंबई मराठी साहित्य संघ, नाट्यशाखेतर्फे हे नाटक रंगभूमीवर आले व स्वतः पुलंनी या नाटकाचे दिग्दर्शन केले. आतापर्यंत त्याच्या पंधरा आवृत्त्या निघाल्या. 'तुझे आहे तुजपाशी' हे नामांकित नाटक असून आजही तेवढेच रंगतदार भासते. आचार्य अत्रे ह्यांनी म्हटल्याप्रमाणे– '''तुझे आहे तुजपाशी' या एकाच नाटकाने पुलंना श्रेष्ठ मराठी नाटककांरामध्ये स्थान प्राप्त झाले आहे आणि ते खरेच आहे.''

या नाटकात कोणत्याही एका व्यक्तीला स्थान नाही. यात नायक–खलनायक नाही पण नाटकाच्या कथावस्तुतील अतिविशाल महिला मंडळाचा प्रवेश आहे आणि 'विनोदाच्या हव्यासासाठी हा प्रवेश आलेला आहे' नाटकाची कथावस्तू तीन अंकात विभागलेली असून हे तिन्ही अंक परस्परांशी एकसंघ आहेत. अतिविशाल महिला मंडळाची कथावस्तुशी चांगली सांगड आहे.

पु.ल. देशपांडे यांनी आपल्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाद्वारे समाजासमोर एक विचार मांडलेला आहे. त्यातून त्यांना लोकांचे उद्बोधन करायचे आहे. पुलंनी ह्या नाटकाचे नाव 'तुझे आहे तुजपाशी' का ठेवले? असा प्रश्न निर्माण होतो तर त्यांच्या ह्या शीर्षक देण्यामागे त्या शिर्षकातूनच खूप काही आपल्याला समजून येते ते म्हणजे 'तुझे आहे तुजपाशी ! परि तू जागा चुकलासी' हे सत्य समजून येते की माणूस स्वतःची क्षमता जाणू शकला पाहिजे, एरवी त्याची जागा चुकण्याचीच शक्यता जास्त असते.

ज्या काळात पुलंनी हे नाटक लिहिलं तो काळ, त्याचा राजकीय–सामाजिक संदर्भ या दृष्टीनं बघण्याजोगा आहे. नुकतंनुकतंच स्वातंत्र मिळालेले होते. ध्येयवाद, त्याग, निष्ठा, देशभक्ती, देशासाठी सर्वस्वाची होळी करणं या कल्पना वास्तवात व साहित्यात प्रखर होत्या. त्याच्याभोवती एक उदात्ततेच वलय होतं हे लोकांना जाणवू लागलेलं होत. विशिष्ट ध्येयापोटी सतत स्वतःच्या जीवनप्रेरणा डावलत राहायचं, सुखं नाकारत राहायची आणि त्या नकाराचंच एक तत्वज्ञान करून पुढच्या पिढ्यांवर एक दबाव आणायचा, हा प्रकार मावळती पिढी मोठ्या प्रमाणावर करीत होती. त्यांचे प्रतिनिधी म्हणूनच 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातील आचार्य हे पात्र या आचार्यांच्या पात्रातूनच पुलंना समाजामध्ये असणाऱ्या सत्य परिस्थितीचे दर्शन घडवायचे आहे. अहंकारी आणि ढोंगी अशा प्रवृत्तीमुळे हे एक चांगले तत्वज्ञान हास्यास्पदतेच्या पातळीवर जायला लागल्याने पुलंना इथे दाखवायचे आहे. समाजामध्ये अनेक विचारसरणीची माणसे असतात. त्या प्रत्येक व्यक्तिंचे तत्वज्ञान हे काही सारखे नसतात. तर वेगवेगळे तत्वज्ञान हे बाळगत असतात. पुलंना असा संदेश या नाटकातून द्यायचा आहे की, आपले तत्वज्ञान इतरांना सांगावे परंतु ते इतरावर लादू नये त्यांच्यावर सक्ती करू नये. 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातून पुलंनी मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे. त्यासाठी त्यांनी अशा काही पात्रांची योजना केली त्यामध्ये एक काकाजी देवासकर आणि दुसरी आचार्य पोफळे गुरूजी. या दोन्ही व्यक्तिंचे जीवन जगण्याविषयीचे असणारे तत्वज्ञान त्यांनी स्पष्ट केलेले आहे. एक भोगवादी तत्वज्ञान आणि दुसरे त्यागवादी तत्वज्ञान. जीवनप्रणालीची ही दोन प्रतीके विविध प्रसंगातून संघर्ष रंगवीत आहे. दोघांचीही विचारसरणी वेगळी राहाणीमान, खानपान वेगळं जीवन जगण्याविषयीचं तत्वज्ञान वेगळं. असा वेगळेपणा पुलंनी 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातून दर्शविलेला आहे. काकाजींच्या अंगी रंगेलपणा रसिकता आहे. सौंदर्यदृष्टी बरोबरच ते संगीत व शेरोशायऱ्याचे चांगले जाणकार आहेत. त्यांचे असे मत आहे की, सुतकी तत्वज्ञानाने उगाचच गंभीर होण्यापेक्षा मस्तीत जगणे त्यांना अधिक भावते. काकांजीची व्यक्तिरेखा नाटककार प्रेक्षकांना छायेसारखी वाटते. काकाजींचे विचार आचार्यांना पटत नाही. त्यांची त्यागवादी जीवनप्रणाली आहे. गांधीपंथाचा हा मनुष्य पुलंनी इथे उभा केलेला आहे. हा कमालीचा कडक, व्रतस्थ, निग्रही, यमनियम सांभाळणारा असा आहे. ज्यांचे खाणेपिने, स्नान, कपडे घालणे, बोलणे, बसणे या प्रत्येक बाबतीत वेगळेपण

आहे. कुणाची जर चुकी झाली तर ते क्षमा करत नाही. असे काकाजींच्या अगदी वेगळे विचारसरणीचे पात्र पुलंनी 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकात आपल्या समोर उभे केलेले आहे.

'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाच्या माध्यमातून पुलंनी आपल्याला काकाजी व आचार्य या पात्रांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविलेले आहे. की आपल्या समाजात अशी वेगवेगळ्या चालीरीतींची माणसे असतात पण ती आपली विचारसरणी आपल्याजवळ न ठेवता इतरांवर तो विचार लादण्याचा नेहमी प्रयत्न करतात. परंतु काकाजी व आचार्य या दोन पात्रांच्या माध्यमातून जरी पुलंनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवून दिले परंतु काकाजी हे पात्र सक्तीचे नाही तर आचार्य यांच्या विचारसक्ती विषयी पुलंनी सांगीतले आहे. परंतु कुणी जरी आपल्या विचारसरणीची इतरावर सक्ती करित असेल पण दुसऱ्या व्यक्तिने त्याच्या विचारांवर बळी पडू नये हेच पुलंना सांगायचे होते. त्यासाठी या नाटकामध्ये त्यांनी उषा, श्याम, गीता या अन्य पात्रांची सुद्धा योजना केली आणि या पात्रामधून त्यांनी दाखवून दिले की समाजात लोकं कसे इतरांच्या तत्वज्ञानाच्या विचारांवर बळी पडतात.

उषा ही काकाजींच्या भावाची मुलगी तिने स्वतःला देशकार्यांसाठी अर्पण केले आहे. तिही आचार्यांच्या तत्वज्ञानावर भाळली आणि स्वतःला त्यांच्यासारखे जीवन जगण्यास ती तयार करते आणि सतीशसारख्या डॉ. सुंदर मुलाला ती नकार देते कारण देशासाठी तिला काहीतरी करायचे आहे. श्याम हा उषाचा भाऊ श्यामवर मात्र काकांजीच्या विचारसरणीचा प्रभाव पडू लागतो तो इंजिनिअरींगचा विद्यार्थी कुशाग्र बुद्धीमत्तेचा मात्र कॉलेजचे शिक्षण सोडून देऊन तो स्वतः गीतापठन करतो. आचार्यांप्रमाणे मनोनिग्रह, आत्मसंशोधन आणि सूतकताई करीत सारे आयुष्य व्यतीत करावे असा विचार त्याच्या मनात डोकावू लागतो. काकाजींच्या घरी असलेले नौकर जगन्नाथ ड्रायव्हर, भिकू माळी आणि वासू अण्णा यांनाही तो गीतापठण करण्याचा उपदेश करतो. परंतु त्यांचे हे वैराग्य फार वेळ टिकत नाही आपले कुठे तरी चुकते आहे हे त्याला कळते. काकाजीही त्यांच्या विचारसरणीतले वैयर्थ्य त्याच्या लक्षात आणून देतात. 'सूत जमायच्या वयात सूत कातणे तरूणांना शोभा देत नाही' या काकाजींच्या मिस्कीलपणामागे फार मोठा अर्थ दडला आहे. अशी त्यांची खात्री होती. त्याच क्षणी आचार्यांच्या सहवासात नित्य राहायचा अन् कॉलेज सोडायचा विचार तो बदलतो आणि सर्वसामान्यांप्रमाणे जीवन जगण्याचा निर्धार करतो.

गीता ही द्विधा मनःस्थितीत सापडते आचार्यांच्या उपदेशाप्रमाणे वागावे तर ते निसर्गक्रमाच्या विरूद्ध वागल्यासारखे होते. अन् त्यांच्याविरूद्ध जावे तर कृतघ्नतेचा दोष पदरी पडतो अशी अवस्था उषाची होते. गीतेला आचार्यांनी जेव्हापासून तीचे आई–वडील वारतात तेव्हापासून सांभाळले असते म्हणून आचार्य जसे म्हणतील तशी ती वागण्याचा प्रयत्न करते त्यांच्या इच्छेविरूद्ध ती काही वागत नाही जणू स्वतःचे तिचे काही अस्तित्वच नाही. परंतु तिलासुद्धा इतरांसारखे वागावे, राहावे असे वाटते. परंतु कोणतेही पाऊल पुढे उचलण्यापूर्वी तिला आचार्यांचा विचार येतो व ती द्विधा मनःस्थितीत सापडते. गीतेचा मनाला मोकळेपणा वाटावा म्हणून उषा एके दिवशी तिला सिनेमाला घेऊन जाते. सतीशही त्यांच्याबरोबर असतो. गावातल्या वर्तमानपत्रात 'शिबिरात स्वयंसेविका आणि थेटरात संचालिका' अशा मथळ्याखाली ही बातमी छापून येते. आचार्यांच्या वाचनात हे वृत्त येताच ते तावातावाने काकाजींच्या घरी या वृत्ताच्या खरेखोटेपणाबद्दल खात्री करून घेण्यासाठी येतात. तिथे त्यांना कळते की, सिनेमाला उषाच नव्हे तर सतीश आणि गीता हे ही तिच्याबरोबर गेले होते. नाटकाच्या मध्यंतरी पुलंनी गीता, उषा व श्याम यांना आपल्या वागण्याची चुकी कळते व त्यांचे कशाप्रमाणे विचारात मतपरिवर्तन होते ते स्पष्ट केले आहे.

गीता, उषा सगळे सिनेमाला गेल्याचे कळताच आचार्यांचा संतापाचा पारा यामुळे अधिकच वर चढतो. गीता तरी आपल्या मनाविरूद्ध असे काही करील असे त्यांना वाटले नव्हते. ते झाल्याप्रकाराने हतबद्ध होतात. पण उषा आणि काकाजी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. आचार्यांनाही हळूहळू शेवटी आपल्या विचारसरणीतली अन् वागणुकीतली चूक उमगू लागते ते पश्चातापदग्ध मनाने गतेतिहासाचा पाढा सर्वांपुढे वाचून दाखवितात, त्यांना त्यांची चूक कबूल होते. पु. ल. देशपांडे यांना यामधून हेच सूचित करायचे आहे की, निसर्गाच्या हाकेला हो न देता आपल्याच लहरीप्रमाणे वागण्यात मनुष्य स्वतःचा घात करून घेत असतो. तात्पर्य हेच की व्यक्तिने निसर्गनियमानुसार वागायला पाहिजे. आपल्याच विचारसरणीप्रमाणे जर

आपण वागण्याचा प्रयत्न केला निसर्गनियमाच्या विरूद्ध वागलो. तर नक्कीच आपण स्वतःचा नाश करून घेत असतो. वासनांचे यथायोग्य प्रमाणात उपशमन करण्यात कोणतेच पाप नाही, उलट त्यामुळेच वृत्तींना संतुलितपणा प्राप्त होतो. अन प्रसन्न शांत मनाने त्याला जीवन जगता येते हे काकाजींच्या चित्रणातून पुलंनी स्पष्ट केलेले आहे. नैष्ठिक ब्रम्हचर्य, सत्य, अहिंसा, इंद्रियनिग्रह वगैरे शब्दांच्या पोपटपंचीने आपण महात्मा बनलो नाहीच, उलट सर्वसामान्य प्रापंचिकाला लाभणारे श्रेयही आपणाला मिळू शकले नाही. हे कटू सत्य आचार्यांना कसे समजून येते हे पुलंनी दाखवून दिले आहे. आणि आचार्य कसे कर्मठपणाने आयुष्याचे क्षण वेचताना आपण जगापेक्षा कुणीतरी निराळे असल्याचा अहंकार जेवढा जोपाशीत आलो होतो, तसले जीवन जगायला लागणारे बळ आपल्या ठिकाणी नसल्यामुळे आपण जगाच्या उपहासाचा अन् तिरस्काराचा विषय मात्र बनलो. हे निःसंकोचपणे ते कबूल करतात.

काकाजींनी आपल्या छंदाना विशिष्ट मर्यादेबाहेर कधीच जाऊ दिले नाही. त्यांचा अतिरेक कधी होऊ दिला नाही, यातच त्यांच्या माणुसकीचे दर्शन पुलंनी घडवून दिले आहे. पुलंनी नागड्या भोगवादाचा पुरस्कार करण्यासाठी काकाजींचे पात्र नाटकात घातले नाही तसे उदात्त जीवनमुल्यांचा पराभव सुचित करण्यासाठी आचार्यांचेही पात्र रंगविले नाही. तर जीवनात प्रत्येकाने आपआपली कुवत ओळखून घेण्याचा मार्ग अनुसरावा, आपआपली पट्टी ओळखून सूर लावावा., ही शिकवण देण्यासाठी आचार्यांचे पात्र पुलंनी निर्माण केले आहे. न पेलणारे ध्येय समोर ठेवले की न पेलणाऱ्या सुरात गायल्याप्रमाणे जीवन बदसूर होते हेच तत्व या नाटकाच्या रूपाने लेखकाला प्रेक्षकांच्या मनावर बिंबवायचे आहे.

एखादे तत्त्व अगर सिद्धांत कितीही मोलाचा असला तरी विशिष्ट कालमानाच्या संदर्भात त्याला खरे महत्त्व प्राप्त होत असते. या दृष्टीने प्रस्तुत नाटकाचा विचार केला म्हणजे योग्य त्या वेळीच त्याची निर्मिती करण्यात पुलंनी किती कालौचित्त्य पाळले आहे हे समजते. सत्य, अहिंसा, मनोनिग्रह, उपवास, हृदयपरिवर्तन यांची जपमाळ कुणीही ओळीत बसावे अन् स्वतःला कुणी तरी अहंविशेष समजून जगावेगळा आयुष्यक्रम जगण्याची इर्ष्या बाळगावी असा महाराष्ट्रात तरी सध्या सर्रास प्रकार सुरू झाल्यासारखा दिसत आहे. उठतो तो आपणाला स्वतःला आचार्य म्हणवतो, बोटबोट दाढी वाढवतो, उठसूठ उपदेशाचे डोज जनतेला पाजतो, भोवताली शिष्यगण जमवून त्यांच्याकडून स्वतःवरून दिवे ओवाळून घेण्यात धन्यता मानतो... हे ढोंग, हा मिळयाचार 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाइतका दुसऱ्या कोणत्याही मराठी नाटकात प्रकाशात आला नसेल. शेतात बेसुमारपणे वाढत चाललेल्या तणाप्रमाणे सामाजिक क्षेत्रात फोफावत चाललेल्या आचार्यांच्या अन गुरूजींच्या या पिकाचे कुणीतरी वेळीच कर्तव्य बुद्धीने 'निंदणखुरपणे' करणे आवश्यक होते. अन् हे कर्तव्य पुलंनी प्रस्तुत नाटक लिहून उत्तम प्रकारे आपले काम पार पाडले.

पुलंनी प्रस्तुत नाटकाद्वारे समाजात असलेली परंपरा, मानवी प्रवृत्ती प्रेक्षकांसमोर दर्शविलेली आहे. 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातून सामाजिक इच्छा प्रकट करण्यात पुल यशस्वी झालेले आहे. की कितीही व्यक्तिने ढोंग करण्याचा प्रयत्न जरी केली तरी असत्य हे एकदिवस उघडकीस येत असते. आचार्यांचे सुद्धा असेच झाले. नाटकाच्या शेवटी आचार्यांना आपली चूक झाल्याचे दिसून येते. ते म्हणतात की, गीतेला आपली दया यावी, कीव यावी ह्या कल्पनेने आचार्य आत्मनिरिक्षण करण्यास प्रवृत्त होतात. परंतु असे सुद्धा वाटते की, ज्या आचार्यांनी आयुष्यभर ढोंग अंगीकारले होते. अकस्मात ते आत्मनिरीक्षण करतात हे बरोबर वाटत नाही. आचार्यांनी ''माझ्या देहाच्या दुबळ्या जहाजाला आपण दीपस्तंभ झाल्याचा अहंकार झाला'' ही गोष्ट मान्य करतात. एवढेच नव्हे तर ''काकाजी ! तुम्ही कसलीही साधना केली नाही, पण तुम्ही शांत आहात आयुष्यभर काय वाटेल ते खाल्लं तुम्ही, पण तमोगुणाचा स्पर्श नाही झाला तुम्हाला 'आम्ही काय साधलं?' जिथं जाऊ तिथं आमचा उपद्रव'' हेही आचार्य मान्य करतात, आपली चुक झाल्याचे ते कबुल करतात परंतु आपली ती एक भूमिका होती हेही आचार्य मान्य करतात.

'तुझे आहे तुजपाशी' या नाटकात मानवी जीवनातल्या भावनांची स्पंदने उमटली आहेत या नाटकातला विषय हळूवार आहे. कथानकाच्या ओघात अनेक विनोदी प्रसंग आलेले आहेत. तसेच नाटकाच्या शेवटी थोडासा कारूण्याचा भागही आलेला आहे. पुलंचे हे नाटक मुळातच विनोदाच्या अंगाने जाणारे आणि वर वर हलकेफुलके वाटणारे नाटक आहे. उपहासगर्भ सुखात्मिका असे त्याचे स्वरूप आहे.

सुखात्मिका म्हणजे काय व शोकात्मिका कशाला म्हणायचे असा ही प्रश्न पडतो. मग या संपूर्ण नाटकात विनोदी वाक्य आलेली आहेत म्हणजेच हे नाटक सुखात्मिका स्वरूपाचे आहे.

**संदर्भ :–**


१. पु.ल. देशपांडे, 'तुझे आहे तुजपाशी' नाटक, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, 15 वी आवृत्ती, 1993.

२. मदन कुलकर्णी, आचार्य अत्रे, 'पुलंचे नाट्यवाङ्मय', 'निवडक पु.लं. : एक आकलन', विजय प्रकाशन, नागपूर, 2000.

३. बालशंकर देशपांडे, 'असे हे पु.ल.', स्नेहवर्धन प्रकाशन पुणे.


# 'आंध' आदिवासींचा इतिहास

**प्रा. जयमाला लाडे**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, मिलींद महाविद्यालय मुळावा ता.उमरखेड जि.यवतमाळ

प्रस्तावना :– आंध ही प्रमुख आदिवासी जमातीपैकी एक जमात आहे. महाराष्ट्रातील आदिवासी सतरा जिल्हयांत कमी अधिक प्रमाणात विखुरली आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीची सांस्कृतिक, सामाजिक आणि धर्माचाराची जडणघडण एकसारखी नाही. प्रत्येक जमात आदिवासीच असली तरी ती आर्थिक, समाजिक आणि शैक्षणिक विकासाच्या वेगवेगळया थरावर उभी आहे. जसे काही आदिवासी जमाती आज 60–65 वर्षात चांगली प्रगती करीत आहेत. पूर्वीचा भित्रा, बुजरा, नवख्या माणसाशी बोलणारा, आपल्या श्रध्दा, दैवते यांना उराशी बाळगुन राहणारा आदिवासी आज लुप्त होत चालला आहे. म्हणूनच हया जमातीची सांस्कृतिक आणि सामाजिक ओळख करूण घेणे खूप गरजेचे आहे.

आदिवासी कोणाला म्हणावे?:– आदिवासी समाज म्हणजे 'अतिप्राचीन समाज' किंवा अतिशय अप्रगत व गौण समाज असे म्हणणे चुकीचे ठरेल. मानवशास्त्रज्ञांनी वैज्ञानिक पध्दतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करून आदिम समाजाविषयीचे पूर्वग्रह दूर केले जसे 'गिलिन आणि गिलिन' यांच्या मते एका विशीष्ठ भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.

इ.स. 1962 मध्ये शिलॉग येथे झालेल्या आदिवासी समितीच्या परिषदेत आदिवासींचा पुढिल प्रमाणे अर्थ स्पष्ट केला. 'एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशीष्ठ भू प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्र शास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात'.

वरिलप्रमाणे मानवशास्त्रज्ञांनी आदिवासींचा अर्थ स्पष्ट केला आहे. पण आज अनेक बदल झालेले आहेत. राहण्याचे ठिकाण बदललेले आहेत, शिक्षणाचे प्रमाण बाढत आहे. राहणीमान, भाषा बदलत आहेत. म्हणूनच सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकांनी आदिवासींवर अध्ययन करीत राहणे गरजेचे आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधाव्दारे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

'आंध' – ऐतिहासिक आढावा :– आंध ही महाराष्ट्रातील एक प्रमुख आदिवासी जमात आहे. त्यांची वस्ती प्रामुख्याने परभणी, नांदेड, यवतमाळ, अकोला, या जिल्हयात आढळून येते. आंध प्रदेशालगतच्या क्षेत्रातून येणाऱ्या तेलगू भाषिक लोकांचा आंध जमातीच्या लोकांवर मोठया प्रमाणावर प्रभाव पडला आहे. आंध ही आंध्रपदेशातील आर्येतर जमातीची असल्याचे दिसते व त्यावरूनच त्यांना हे नांव पडले असावे. काही अभ्यासक आंध ही गोंड जमात शाखा असल्याचे ते मानतात मात्र आंध जमात स्वतःला गोंड जमातीहून वेगळी व स्वतंत्र मानते. आंध जमात रंगाने काळी, ओठ जाड व गालाची हाडे वर आलेल्या वैशिष्ठयांवरून उठून दिसतात. आंध हे शेती व शिकार करणारे आदिवासी असून ते डोंगराळ प्रदेशात राहत होते.

आंध लोकांचे मुख्य अन्न ज्वारी, तूर वाल, मूग व उडीद व शेतात पिकलेला भाजीपाला असते. ते मांसाहार सुध्दा करतात. त्यांना डुकराचे मांस

खाण्याची व मदयपान करण्याची आवड आहे. गाईचे मांस मात्र वर्ज्य करतात. कुणब्यांशी त्यांचा रोटी व्यवहार चालतो पणे गोंड समाजाशी चालत नाही.

आंध लोक स्वतःला हिंदु म्हणवतात. मारूती, मरीआई, माता, भीमसेन, वाघमाई, खंडोबा, कान्होबा, आणि भवानी यासारख्या हिंदू देवताची ते पूजा करतात.

आंध लोकांत पारंपारीक पंचायत पध्दत होती मुखिया हा तिचा पुढारी असतो. मुखियाचे पद वंशपरंपरागत नसते. हयाच्या प्रमुखास म्हेतऱ्या म्हणतात. त्यांचे मदतनिस फोपाटिया आणि डुक्रिया म्हणून ओळखले जाणारे दोन सहकारी असतात. जेव्हा गुन्हा घडतो तेव्हा डुक्रिया हा गुन्हेगाराला बोलावण्यासाठी जातो. जात जेवणाच्या वेळी वापरलेली मातीची भांडी त्याला देण्यात येतात, तर फोपटियाला नवीन कापडचोपड देण्यात येते. मोहतारिया किंवा मुखिया हा प्रकरणाचा फैसला करण्यासाठी ठिकठिकाणच्या गावांमध्ये जातो. जमा झालेल्या दंडापैकी काही हिस्सा त्याला रोखीत स्वरूपात मिळतो.

डॉ. गोविंद गारे यांनी 'पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी' या ग्रंथात या जमातीचे विस्तृतपणे अध्ययन केलेले आहे.

प्राचीन वाङ्‌मयात आंध जमातीचा उल्लेख वेगवेगळया नावाने केला जातो. आंध्र, अंध्र, आंध्रभृत्य, अंधक, अंध्रक, आंध्र सातवाहन, आंध्रवृष्णी, आंध्रभोज, आंध्रजातीय अशा विविध नावाने उल्लेख केला जातो. आंध जमात पुराणांनी सांगितलेल्या आंध्र सातवाहन जमातीची वंशज असावी. आंध जमात अतिप्राचीन जमात असून तिचा पहिला संदर्भ 'ऐतरेय ब्राम्हण' या ग्रंथात सापडतो.

ऋग्वेदावरील जे टिकाग्रंथ आहेत त्यातला पहिला ग्रंथ 'ऐतरेय ब्राम्हण' होय. या ग्रंथात आंध जमातीचा उल्लेख खालीलप्रमाणे.

तननु व्याजहारान्तान्वः प्रजा भक्षीष्टोति त
तैध्राः पुण्ड्राः शबराः पुलिन्दाः
मुतिबा इन्त्युदन्त्या बहवो
भवन्ति वैश्वमित्रा दस्यूना भूयिष्ठा

'तुम्ही माझी आज्ञा पाळत नसाल, तुम्ही नीच दस्यु व्हाल' असा विश्वमित्राने आंध, पुण्ड्र, शबर, पुलिन्द, मुतिष इत्यादी जमातींना शाप दिला आहे. विश्वमित्राच्या शापाने भ्रष्ट झालेल्या या जमाती नंतर बहित्कृत जीवन जगू लागल्या समाजातून बहिष्कृत करावे असा हया जमातींचा कोणता अपराध होता? त्यांचा एकच अपराध होता की त्यांनी आर्युपुत्र शुनःशेपाचा विरोध केला होता.

त्याची थोडक्यात कथा अशी आहे की, "विश्वामित्राला शंभर मांडलिक पुत्र होते. त्याने या पुत्राच्या सहाय्याने साम्राज्य उभे केले होते. वशिष्ठाशी प्रतिस्पर्धा करून ब्रम्हर्षिपद प्राप्त करून घेतले होते. सर्व ब्राम्हण वर्गाने त्याची योग्यता देखील मान्य केली होती. यज्ञयागाच्या ठिकाणी विश्वमित्राचा सन्मान होत असे. त्याला हे ब्रम्हर्षिपद फार कष्टाने मिळाले होते. एकदा विश्वमित्राला एका यज्ञाच्या ठिकाणी शुनःशेप नावाचा ब्राम्हणपुत्र प्राप्त झाला. त्यो त्यास घेऊन आपल्या प्रदेशात आला. हे आर्थब्राम्हण मूळ निवासीयांच्या वस्तीस्थानांवर यज्ञाच्या निमीत्ताने आक्रमण करित असत. हे आर्थब्राम्हण सदैव आदिमांच्या संस्कृतीचा उच्छेद करत म्हणून हा ब्राम्हणपुत्र शुनःशेप आदिमांचा मित्र वा हितचिंतक होऊच शकत नव्हता. आदिम लोक या ब्राम्हणाला त्यांच्या वस्तीत प्रवेश देत नव्हते. त्यांचे हे पद पूर्णतः ब्राम्हणांच्या मर्जीवर अवलंबून होते. म्हणून विश्वमित्राने आपले पन्नास मांडलिक पुत्र त्यागून एक ब्राम्हण पुत्र शुनः शेपाचा स्विकार केला. त्याने या पन्नास पुत्रांना केवळ त्यागलेच नाही तर त्यांना शाप देऊन दस्यू बनविले".

विशेष म्हणजे परकीय शुनःशेप ब्राम्हणाच्या विरोधात ज्या पन्नास जमातींनी बंड केले त्यांचे नेतृत्व आंध जमातीने केले आहे. इतिहासात आंध जमातीने ब्राम्हण जातीला विरोध केला, म्हणून आंध जमातीचा इतिहासच नष्ट केला असावा असा एक विचार प्रवाह आहे.

त्याचप्रमाणे 'कथा सरित्सागर' या ग्रंथात सातवाहनाची कथा आली आहे.

एकदा राजा दीपकर्णी एका सरोवराच्या किनाऱ्यावर मृगयेसाठी भटकंती करत असतांना त्याला सिंहाच्या पाठीवर एक बालक आरूढ असलेला दिसला. त्याने आपल्या दिव्य बाणाने त्या सिंहाला मोक्षधामास पाठविले. परंतू आश्चर्य असे की त्या सिंहाच्या शरीरातून एक दिव्य पुरूष प्रकटला. राजाने नाव विचारले असता त्याने 'सात' नामक यक्ष असल्याचे सांगितले म्हणून या 'सात' नावाच्या यक्षावर

जो आरूढ आहे तो सातवाहन या ठिकाणी सिंह त्या यक्ष जमातीचे कुलचिन्ह आहे.

सत नामक यक्षाच्या कुलचिन्हावर (सिंहावर) आरूढ असलेला बालक, सातवाहन, पुढे हा आंध जमातीचा मूळ पुरूष सातवाहन हयाच नावाने ओळखला जाऊ लागला. आंध जमातीच्या हया संस्थापकाने पुढे महान राज्य परंपरा उभी केली.

आंध जमात प्राचीन काळी कृष्णा गोदावरीच्या खोऱ्यात वास्तव्य करत होती. दोन नदयांच्या या प्रदेशात हया जमातीने राज्य केले. अकोला व पवनी येथील उत्खननात सापडलेल्या माहितीवरून आंध सातवाहन हे अनार्य होते.

आंध हे आंध्र या शब्दाच्या अपभ्रंश असून या समाजाचे जमात वाचक नाव सर्वप्रथम 'ऐतरेय ब्राम्हण' ग्रंथात सापडते. अशोकाच्या शिलालेखात भोजांचे शेजारी आंधाचा उल्लेख आहे. आंध हे सातवाहन होत असे अनेक इतिहासकारांनी ठामपणे मत मांडलेली आहेत. सातवाहनाचे आता पर्यंत सुमारे अठ्ठाविस शिलालेख (नाशिक, नाणेघाट खारवेल) व शेकडो नाणी सापडली आहेत. त्यापैकी प्रत्येकांवर सात, सातवाहन अथवा सातकर्णि हेच नाव आढळते मात्र पुराणात त्यांचा उल्लेख सातवाहन म्हणून कुठेच आला नाही. असा उल्लेख न येण्याचे एक कारण असे सांगितले जाते की, 'आंध्रभृत्य' ही एक जमात होती. तर 'सातवाहन' हे त्या जमातीचे राज्य होते. 'सातवाहन' म्हणजे 'सप्तवाहन' असा अर्थ असून त्यावरून ही जमात सूर्यवंशी होती. राजा दशरथ हा क्षत्रिय राजा देखील सुर्यवंशीय होता. म्हणुन आंध ही एक क्षत्रिय व शूर जमात होती. पुराणांचा आधार घेउन 'सातवाहन' हे मूळचे आंध जमातीचे होते असे प्रतिपादन डॉ. एम. रामाराव गोपालाचारी आणि प्रा. गुंर्ती व्यंकटराव या लेखकांनी केले आहे. प्लिनीच्या ग्रंथात आंधाच्या प्रचंड लष्करी सामर्थ्याचा उल्लेख येतो. त्यांचे साम्राज्य महाराष्ट्रात निर्माण झाले व ते पुर्वेकडे पसरले होते. मनुस्मृतीत हया आंधाना हीन जातीय म्हटले आहे. 'सिंहासन बत्तीशी' या ग्रंथात ते संकरजातीय आहेत असा उल्लेख आहे.

संपूर्ण भारत खंडातील राजवंशाचा अभ्यास केला असता आंध जाती संबंधी दाक्षिणात्य राजवंशात माहिती मिळते. इ.स. च्या पहिल्या शतकामध्ये सात–वाहनवंष भरभराटीला आला होता. सातवाहन हे कुलाचे नाव असून आंध हे जातीवाचक नांव आहे. आंध जातीच्या सातवाहन कुलाने पश्चिम तथा दक्षिण भारतात पूर्वेला आपल्या स्वतंत्र राज्याची निर्मितीत केली होती. श्रीमद् भागवतामध्ये आंध जमातीविषयी पुढिल ओवी आलेली आहे.

किरात हुणान्ध्र पुलिन्द पुल्कसा :
आमीर कड्डा भवन : भवसाद्य
येड न्येच यापा यदुपाश्चयाश्रया :
शुध्यन्ति तस्मै प्रभाविष्णवे नमः

अर्थात किरात, हून, आंध्र, पुलिन्द, पुल्कसा, आमीर आणि कंकु इत्यादी नीच जातीचे लोक आहेत. त्यांचा उध्दार ईश्वर स्मरणाने होतो.

वरील स्पष्टीकरणावरून 'आंध्रवंश' हा राजवंश जरी असला तरी हा समाज बहुजन समाजातील होता, त्यामुळे तत्कालीन ब्राम्हणी संस्कृती आणि धर्म ग्रंथाने यांचे श्रेष्ठत्व झिडकारले होते.

आंध जमातीच्या सातवाहन कुळात अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांचा मोठा रोमांचकारी आहे. इतिहास आंध्र जातीच्या राजांनी पृथ्वीवरील भरतखंडात राज्य केले. आंध जातीच्या सातवाहन घराण्यात सिमुख नावाचा महापुरूष होऊन गेला. त्यांनी कण्व राजाची अत्याचारी राज्यसंस्था स्वपराक्रमाने नष्ट करून आंध जातीच्या राजाची स्थापना केली. त्यांनी शुंग राजाचा सुध्दा पराभव केला. आंध वंशातील शातकर्णी हा एक महान पराक्रमी राजा होऊन गेला त्यांच्यावर त्याची आई गौतमी हिचे सुसंस्कार झालेले होते. त्यामुळेच तो 'गौतमीपुत्र सातकर्णी' हया नावाने इतिहासात ओळखला जातो. इ.स. 106 ते 130 म्हणजे 25 वर्षे राज्य केले. ते आंध वंशाचे सर्वश्रेष्ठ शासक होते. सातवाहन राजांना युनानी, शक, पार्थियन्स इत्यादी राजांबरोबर युध्द करावे लागले. 'गौतमीपुत्र सातकर्णी' याने नाशिक येथील सातवाहन कालीन लेणे बांधले.

आंध्रजातीय सेवक सिमुक सातवाहन याने भोज व रठिक यांच्या मदतीने प. भारतात स्वतंत्र राज्य स्थापन केले. या राजघराण्याचे अनेक अवशेष व नाणी चांदा (चंद्रपूर) अकोला, गोदावरी व कृष्णा या ठिकाणी सापडली आहेत.

पुराणात या सातवाहन वंशाला 'आंध्र' म्हटले आहे. पण हे मूळचे महाराष्ट्रीय यात संशय नाही. कारण त्यांचे आरंभीचे लेख व नाणी पश्चिम महाराष्ट्रात नाणेघाट, नाशिक इत्यादी ठिकाणी सापडली आहेत. आंध्र ही जात मूळची महाराष्ट्रीय असली पाहिजे आणि पूर्व विदर्भ आणि आंध्रप्रदेश हा एकमेकांहून फारसा

भिन्न नसावा. आज ही 'आंध' जमात पैनगंगा नदीच्या खोऱ्यात तीन – चार जिल्हयांत विशेषकरून दिसून येते.

ऐतिहासिक पार्श्वभूमी काहीही असो, परंतु उपलब्ध माहितीवरून आजची आंध जमात ही आंध्रभृत्य सातवाहन राज घराण्याची वंशज असावी. असे मानायला हरकत नाही.

मध्ययुगीन लेखक भक्त पोतदा यांनी 'आंध्र महाभारत' हा ग्रंथ लिहीला आहे. त्यांत आंध्र उर्फ आंध जातीचा पूर्व इतिहास मिळू शकतो. आंध्रभृतांचा इ.स. पूर्व 550 पर्यंतचा इतिहास अवगत होता. तो आता इ. स. पूर्व 1500 पर्यंत उपलब्ध झाला आहे. पवनीच्या किल्ला चंद्रगुप्त मोर्याच्या काळांत बांधला त्याचे उत्खनन केले तेव्हा त्यात मौर्य आणि सातवाहन काळातील अवशेष ही तांब्याची भांडी सापडली. उत्खननात मौर्य सातवाहन आणि वाकाटक काळातील बरेच अवशेष सापडलेले आहेत. नांदेड, परभणी, बुलढाणा, अकोला, यवतमाळ भागात राहणाऱ्या आंध जमातीकडे इंग्रजांच्या काळात भरपूर जमिनी होत्या. पेशवेकाळापासून देशमुखी आणि पाटीलकीची पदेही या जातीत होती.

अशाप्रकारे 'आंध' जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी असली तरीही खऱ्या अर्थाने भारतीय संविधानामुळे 'आंध' जमातीला अनुसूचित जमातीचा दर्जा प्राप्त झाला. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा 1976 नुसार निरनिराळया अनुसूचित जमातीसाठी घालण्यात आलेले क्षेत्रिय बंधन काढण्यात आले त्यानुसार 'आंध' जमातीला महाराष्ट्र राज्यभर अनुसूचित जमातीचा दर्जा प्राप्त झाला आहे.

आज वर्तमान काळात आदिवासींचा विचार केला तर त्यांच्यातील मूळ पारंपारीक मूल्यांमध्ये परिवर्तन होत आहे. विकासाच्या दृष्टीने शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने घटनात्मक तरतूदी व शासकीय पातळीवर केलेले प्रयत्न खूप उपयुक्त ठरत आहेत. ज्यामुळे त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक राजकीय, विकास होत आहे. वास्तविक कोणतीही आदिवासी ही टोकाच्या परिस्थितीत जगत होती. परंतू मानववंशशास्त्राच्या अभ्यासामुळे आदिवासींचा इतिहास जगापूढे येत आहे. खरी गरज आहे ती वस्तुनिष्ठ संशोधनाची आज अनेक संशोधक आदिवासींचा अभ्यास करीत आहेत. त्यामुळे आदिवासींचा विकासाच्या प्रयत्नाला दिशा मिळू शकते.

संदर्भग्रंथ

१. डॉ. गारे, गोविंद, 'पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी', श्रीविदया प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे – 2001
२. डॉ. गारे, गोविंद, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे – 2002.
३. प्रा. डॉ. धनजकर, राजेश, 'मराठवाडयातील आंध जमातीचे लोकसाहित्य' अनुराधा पब्लिकेशन, नांदेड – 2013.
४. घाटे, निरंजन, 'आदिवासींचे अनोखे विश्व', मनोविकास प्रकाशन–पुणे– 2013.

Volume – 04, Issue – 02, July -December, 2015 / ISSN – 2278-3199

# 'चंद्रपुर थर्मल पावर स्टेशनमुळे समाजावर होणारे परिणाम'

**सुजाता मुरलीधर धनजोडे**, संशोधक विद्यार्थी, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
मो. 8975613036, Email - sujata.spa@gmail.com

**प्रस्तावना** :– अन्न, वस्त्र, निवारा, इत्यादी आपल्या जीवनावश्यक प्राथमिक गरजा भागविण्यासाठी मनुष्य प्राचीन काळापासून उत्पादन करीत आला आहे. उत्पादनाची साधने मात्र कालक्रमानुसार उत्क्रांत होत गेलेली दिसून येतात. पाषाणयुगात दगडी आयुधांचा शिकारीकरीता वापर करून मनुष्य आपले अन्न प्राप्त करीत होता. पुढे शेतीचा शोध लागल्यावर लागडी नांगर तयार झाले. हया अवजारांच्या साहाय्याने कुटुंबाच्या व फारतर गावाच्या गरजा भागविण्यापुरते उत्पादन केले जाई. ही उत्पादनप्रक्रिया नैसर्गिक साधनस्त्रोतांवर अवलंबून असे. नदीचे किंवा विहिरीचे पाणी शेतीला देण्यासाठी मोट तयार करणे अशा प्रकारच्या उत्पादन साधनांचा विकास माणसाने केला होता. वस्त्रे विणण्यासाठी चरख्यावर सूत काढणे व हातमागावर कापड विणण्यापर्यंत प्रगती झालेली होती. मध्ययुगापर्यंत अशा नैसर्गिक साधनस्त्रोतांवर आधारलेल्या उत्पादन साधनांवर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था अंमलात आलेली होती. परस्परांमध्ये वस्तुविनिमयाच्या स्वरूपात देवघेव होत होती. बाजारपेठांचे हे प्राथमिक स्वरूप त्या काळात अस्तित्वात होते. औद्योगिक क्रांतीनंतर मात्र हया स्वरूपात आमूलाग्र बदल झाला.

औद्योगिकीकरण हे उत्पादन व्यवस्थेचे एक नवे स्वरूप अथवा प्रकार मानता येईल. जेव्हा एखाद्या समाजात जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन यांत्रिक साधनांच्या व वीज, वाफ यांसारख्या बिगर मानवी शक्तींच्या आधारे मोठया प्रमाणात होऊ लागते तेव्हा त्या समाजाचे औद्योगिकीकरण झाले असे आपण म्हणतो. औद्योगिकीकरणाची सुरूवात प्रथमतः युरोपीय देशांमध्ये 18 व्या व 19 व्या शतकांमध्ये झाली. वाफेच्या इंजिनाचा शोधलागून युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. तेथपासून वस्तूंच्या उत्पादनामध्ये यंत्राचा व तंत्रविषयक विद्येचा वापर अधिकाधिक प्रमाणात होऊ लागला. कारखाना हा वस्तूंच्या उत्पादनाचे केंद्र झाले.

**पर्यावरण** : निसर्गात घडणारे हवामानातील बदल पाऊस, थंडी, बदलणारे ऋतू कधी कधी होणारे भुकंप नद्यांना येणारे पूर खवळणारा समुद्र, सोसाट्याचे वारे, वादळ किंवा अतिवृष्टी तसेच जंगलात लागणाऱ्या भिषण आगी वैगेरेमुळे मानवाच्या मनात भितीची भावना निर्माण झाली. याच निसर्ग निर्माण करणाऱ्या पृथ्वीला मानवने धरणीमाता म्हणून संबोधिले यालाच म्हणजेच निसर्गाला पर्यावरण असेही म्हणतात.

'जमीन, जल आणि हवा या मिळून जे नैसर्गिक आवरण तयार होते त्यालाच 'पर्यावरण' असे म्हणतात परंतु या तीनही घटकांचा प्रत्यक्ष संबंध सजीवाशी येतो त्यामुळे सजीवांचा सुद्धा पर्यावरणात समावेश केलेला आहे.'

**प्रदुषण** : हवा, पाणी, जमीन इत्यादी पर्यावरणातील घटकांमध्ये इतर पदार्थ मिसळत असतात, त्यामुळे त्या घटकांच्या भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मांमध्ये बदल घडून येतो. या बदलांमुळे त्या घटकांचा किंवा त्या पदार्थांचा काहीच उपयोग होत नाही. शिवाय त्याचा प्राणिमात्राच्या आरोग्यालाही धोका पोहोचतो. अशावेळी ही झालेली प्रक्रिया आणि झालेला परिणाम या दोघांनाही प्रदूषण म्हटले जाते. प्रदुषणाचे हवा प्रदूषण, जल प्रदूषण, भूमी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण असे मुख्य प्रकार दिसून येतात.

पूर्वी औद्योगिकीकरण किंवा यांत्रीक युग नव्हते. त्यावेळी कोणतेही काम मनुष्य स्वतःहाच करीत होता जसे जात्यावर धान्य बारीक करणे. लोक जुन्या पध्दतीने शेती करत होते. नवनविन साधनाचा वापर केला जात नव्हता. जुन्या पध्दतीच्या खताचा वापर करत होते.

औद्योगिकीकरणामुळे बेकारी, रोजगारांना रोजगार, कुटीर व लघू उद्योगाची जरी निर्मिती झाली असली तरी याचा परिणाम समाजावर होवू लागला. कारण औद्योगिकरणामुळे किंवा कारखान्याच्या निर्मितीमुळे परिसरातील राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाला. सोबतच पर्यावरण व प्रदुषण यांचा समतोल बिघडला. रोगराई मोठया प्रमाणावर निर्माण झाली. लहान मुलांवर यांचा परिणाम झाला तसेच यंत्रयुगामूळे रासायनिक, खतांची निर्मिती झाली ज्यामुळे उत्पादन हे जलद गतित निर्मित व्हावे म्हणून वेगवेगळया प्रकारची रासायनिक प्रक्रिया करून बाजारपेठमध्ये उपलब्ध होवू लागले त्यामुळे बालकांचे

आरोग्य धोक्यात येवू लागले. इतकेच नव्हे तर गरोदर महिलांवर सुध्दा याचा परिणाम होवू लागले.

यावरून असे निर्देशनात येते की, जस–जसे औद्योगिकीकरण होत गेले तस–तसा अनेक सामाजिक समस्या निर्मित होवू लागल्या. त्यामुळे संशोधन कर्तीला असे वाटले की, चंद्रपूर मधील थर्मल पावर स्टेशनमूळे दुर्गापूर औद्योगिक परिसरातील राहणाऱ्या लोकांवर याचा विविध प्रकारे व मोठया प्रमाणावर परिणाम होवू लागला म्हणून संषोधकाने या विषयाची निवड केली आहे.

**साहित्य परिक्षण** : डॉ. पद्माकर दुभाषी, ऑगष्ट 2006, पान नं. 28 यांनी 'जागतिकीकरण, उदारिकरण आणि अर्थकारण' या पुस्तकात ऊर्जेच्या अवास्तव वापरामुळे पृथ्वी तलावरील वातावरण तापत आहे. 1990 या वर्षाचे तापमान गेल्या 100 वर्षातील सर्वात अधिक होते. कार्बन डायऑक्साईट, क्लोरोपलुरोकार्बन, नायट्रिक ॲसिड व मेथेने वायू वातावरणात पसरल्याचा हा परिणाम आहे. आपल्या औद्योगिक उत्पादनातून होणाऱ्या कचऱ्याचे ढिंगारे आज आपल्या देशात फेकायला जागा नाही. म्हणून विकसित देश हजारो मैल दूर असलेल्या विकसित देशामध्ये हलवित आहेत. ब्रुडलॅण्ड आयोगाने म्हटल्याप्रमाणे शाश्वत प्रगतीच्या दृष्टीने केवळ असिमित भोगवादाला बळी न पडता नैसर्गिक संपत्ती व पर्यावरणाचे संरक्षण यांच्यावर लक्ष केंद्रीत करण्याची वेळ आली आहे. डॉ. के. म. भांडारकर, सप्टेंबर 2006, पान नं. 238 यांनी पर्यावरणशास्त्र या पुस्तकात भारतात स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरणाचा वेग फार झपाटयाने वाढला. सातत्याने वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या गरजांच्या पुर्तिकरीता उद्योगांना केंद्र व राज्य शासनातर्फेपण प्रोत्साहन देण्यात आले. आधुनिकीकरण आणि मानवी अपेक्षांचा विस्फोट यामुळे सुध्दा उद्योगांना चालना देण्यात आली. या सर्वांचे फलित म्हणजे जल, वायू, भूमी व ध्वनी–प्रदूषण फार मोठया प्रमाणावर झाले. भारतामध्ये मात्र इ.स. 1972 पर्यंत पर्यावरणासंबंधी फारसे प्रकल्प/कार्यक्रम राबविण्यात आल्याचे आढळत नाही.

**अध्ययनाचे उद्देश** : 1. थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे. 2. थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे. 3. थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यात्मक स्थितीचे अध्ययन करणे. 4. थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांवर पर्यावरणात्मक होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे. 5. थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांना मार्गदर्शकाची भूमिका जाणून घेणे.

**गृहीतकृत्ये** : प्रस्तुत अध्ययनाची गृहीतकृत्ये पूढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली होती. 1) थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांची आर्थिक स्थिती बिकट आहे. 2) थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांचा सामाजिक दर्जा निम्न स्वरूपाचा आहे. 3) थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांची आरोग्य स्थिती खलावलेली आहे. 4) थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांवर पर्यावरणाचा काही प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. 5) थर्मल पावर स्टेशन परीसरातील राहणाऱ्या लोकांना समाजकार्याच्या माध्यमातून काही प्रमाणात मार्गदर्शन मिळत आहे.

**अध्ययनाचे क्षेत्र व नमुना निवड** : प्रस्तुत अध्ययनासाठी अध्ययन क्षेत्र म्हणून चंद्रपूर जवळील दुर्गापूर औद्योगिक वसाहत हे क्षेत्र निवडले. तसेच प्रस्तुत शोधप्रबंधात अध्ययन पध्दतीत गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर केला. थर्मल पावर स्टेशन औद्योगिक वसाहतीतील एकुण लोकसंख्या 3256 असून त्यापैकी 250 उत्तरदाते अध्ययनासाठी निवडले जातील.

**संशोधन आराखडा** : या अभ्यासाचा संशोधन आराखडा अंशतः वर्णनात्मक व अंशतः निदानात्मक आहे. कारण या संशोधनाअंतर्गत समाजाच्या परिणामाचे सुक्ष्म वर्णन केले. तसेच त्यांना येणाऱ्या विविध समस्येचे निदान काढण्यात आले म्हणून हे संशोधन वर्णनात्मक व निदानात्मक आहे.

**तथ्य संकलन पध्दती व तंत्रे** : प्रस्तुत अध्ययनासाठी तथ्य संकलनाचे प्रकार म्हणून प्राथमिक व व्दितीयक स्त्रोत्रांचा उपयोग करण्यात आला. तथ्य संकलनासाठी मुलाखत पध्दतीचा अवलंब करण्यात आला. व्दितीय स्त्रोत म्हणून या समस्येसंदर्भातील प्रकाशित किंवा अप्रकाशित कागदपत्रे, अहवाल, अभिलेख यांचाही उपयोग करण्यात आला.

**तथ्य प्रक्रियन** : तथ्य प्रक्रियनासाठी हस्तसारणी व संगणकाचा आधारे संस्करण, वर्गीकरण, संकलन व मास्टर चार्ट इत्यादी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

**निष्कर्ष** : दुर्गापूर मधील जास्तीत– जास्त कुटुंबाचे मासिक उत्पन्न हे 5000 रू.च्या आत आहे. त्यांची वारंवारीता उत्पन्नाचे साधन सुध्दा मजुरी आहे. त्यामुळे त्यांना रोज काम लागेलच असे नाहीच. शिवाय मजुरीही कमी मिळते. उत्पन्न कमी, गरजा जास्त मात्र आवश्यक गरजा सुध्दा पूर्ण होत नाही मर्यादित उत्पन्नात बचत करणे, त्यांना कठीण जाते. त्यामुळे बचत न करणारे जास्तीत जास्त दिसून आले.तसेच दुर्गापूर मधील कुटुंबाजवळ काही अस्थिर मालमत्ता जसे शेती, जमीन, दुकान, मोटार सायकल, स्कुटर, कार, रेडियो, संगणक, फ्रीज, शिलाई मशीन, धुलाई मशीन अशा वस्तू त्यांना घेणे किंवा त्या वापरणे त्यांना कठीण जाते. तेवढे उत्पन्न त्याच्या जवळ नाही. येथील लोकांच्या मते थर्मल पावर स्टेशनच्या प्रदूषणामुळे त्यांचे उत्पन्न अतिशय कमी होते. याचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर म्हणजेच आर्थिक स्थितीवर होतो. औद्योगिकीकरण झाले असून सुध्दा लोकांना रोजगार पाहिजे त्या प्रमाणात मिळालेला दिसून येत नाही. त्यामुळे रोजगारासाठी आलेले तरूण येथे मिळेल ते काम करून समाधान मानतात. औद्योगिकरण झालेले असून सुध्दा दुर्गापूर मधील लोकांच्या उत्पन्नावर काहीही भर पडलेली नाही. मजुरी करून समाधान मानल्याने व दुसरे कोणतेही काम न केल्याने त्याच्या उत्पन्नात भर पडत नाही. त्यामुळे येथील लोकांची आर्थिक स्थिती बिकट आहे.

दुर्गापूर मधील जास्तीत जास्त कुटुंबाचे थर्मर पावर स्टेशनमुळे सामाजिक दर्जा उंचावलेले नाही. औद्योगिकीकरण असून सुध्दा केवळ फारच कमी लोकांना नौकरी मिळालेली दिसून येते. उत्पादन, राहणीमान यातही फार कमी लोकांना फायदा झालेला दिसून येतो. शिक्षण आणि आरोग्यावर सुध्दा वाईट परिणाम झालेला दिसून येतो. त्यामुळे दर्जा, उत्पन्न, सांस्कृतिक हया बाबीवर सुध्दा चांगला परिणाम झालेला दिसून येत नाही. सोई सुविधा मिळून स्तर उंचावणे तर शक्यच नाही. थर्मर पावर स्टेशनमुळे सामाजिक दर्जा उंचावेल अश्या कोणत्याही गोष्टी दुर्गापूर मधील लोकांना मिळत नाही, मिळाले तरीही त्यांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळेच उत्तरदात्यांच्या मते सामाजिक दर्जा पुर्णतः खालावलेला आहे. आर्थिक दर्जा खालावलेला असल्याने सामाजिक दर्जावर सुध्दा त्यांचा परिणाम झालेला दिसून येत आहे.

दुर्गापूर मधील जास्तीत जास्त कुटुंबाच्या मते ते आरोग्याच्या दृष्टिने वाईट परिसरात राहतात. त्याचप्रमाणे 100% व्यक्तीला, कुटुंबाला व समुदायाला कोणते ना कोणते आरोग्याच्या समस्या आहेत व त्यात जास्तीत जास्त समस्या हया थर्मल पावर स्टेशन मुळे होत आहे. म्हणजेच धुळ/धुर/आवाज, उष्णता, पाणी व इतर असे अनेक कारणे दिसून येत आहे. त्यामुळे या रोगावर उपचारांचा व औषधांचा खर्च सुध्दा फार जास्त दिसून येत आहे. उत्तरदात्यांच्या मते गरोदर पणात आरोग्यावर वाईट परिणाम होतो. गरोदर स्त्रीला श्वास घ्यायला त्रास होतो. त्यात धुर, धुळ व राखेची हवा घेणे कठीण जाते. त्यामुळे मुल व आई दगावण्याची ही शक्यता असते. धुर धुळीच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. पर्यावरण प्रदूषित झाले की मानवावर तसेच पशूपक्षांवर त्याचा फार मोठया प्रमाणात परिणाम होत असतो.

पर्यावरणाचा विचार केला असता असे दिसून आले की, धुर धुळीने वातावरण प्रदूषित होण्यासोबतच ध्वनी प्रदूषण सुध्दा मोठया प्रमाणात होतांना दिसून आले. वायु बाहेर सोडतांना येणाऱ्या पोंग्याचा आवाज अतिशय मोठा असतो. त्या आवाजाने घाबरायला होते. कोळसासाठी वापरण्यात येणाऱ्या झुल्याचा वापर सतत होत असतो. त्यांचा आवाजाने सुध्दा मोठया प्रमाणात प्रदूषण होत असते. ध्वनी प्रदूषणावर जरी उपाय योजना आखण्यात आली असली तरीही ते समाधान कारक नाही. मुलांच्या शिक्षणावर सुध्दा नेहमी परिणाम होतो .

थर्मल पावर स्टेशनमुळे उष्णता अतिशय वाढते. त्यांचा परिणाम आरोग्यावर मोठया प्रमाणात झालेला दिसून येत आहे. कारण उष्णतेमुळे मोठया प्रमाणात त्वचा रोग दिसून येत आहे. पर्यावरणामध्ये बदल होतो त्यामुळे स्वच्छ हवा व पाणी न मिळाल्याने उष्णतेचा, पशुपक्षांवर सुध्दा वाईट परिणाम नेहमीच होत आहे. थर्मल पावर स्टेशनमध्ये कोळसा जाळल्या जात असल्याने व वीज निर्मिती होत असतांना निघणाऱ्या उष्णतेमुळे अनेक रोग होतांना दिसून येत आहे.

थर्मल पावर स्टेशनमुळे पर्यावरण अतिशय प्रदूषित झालेले आहे. त्याचा फार मोठया प्रमाणावर परिणाम आरोग्यावर सुध्दा दिसून येत आहे. म्हणजेच त्याचे आरोग्य खालावलेले आहे.

दुर्गापूर मध्ये स्वयंसेवी संस्था कार्यरत नाही. दुर्गापूर मध्ये सर्वच प्रकारच्या समस्या मोठया प्रमाणात

दिसून येते. त्यामुळे त्यांना समुपदेशनाची गरज भासते. त्यांना समुपदेशन मिळत नाही. त्यांच्यापर्यत समाजकार्य पोहचत नाही. त्याप्रमाणे त्यांना आरोग्याविषयी मदत मिळत नाही. त्यामुळेच आरोग्याच्या ही समस्या मोठया प्रमाणात दिसून येते. थर्मल पावर स्टेशनमुळे मोठया प्रमाणात प्रदूषणाची समस्या दिसून येते. मात्र त्याकरीता कोणतीही मदत शासनाकडून मिळत नाही. या सर्व माहितीवरून असे लक्षात आले की, समाजकार्याच्या माध्यमातून स्तर कनिष्ठ स्वरूपाचा आहे. म्हणजे इतर समस्याप्रमाणेच त्या समस्या सोडविण्याकरीता किंवा त्याच्या मार्गदर्शनाकरीता दुर्गापूर मधील लोकांना समाजकार्याच्या माध्यमातून सुध्दा कोणतीही मदत मिळत नाही.

**सूचना** :– 1) दुर्गापुर भागात जास्तीत जास्त व्यक्ती मजुरी करतात त्यातही त्यांना काम रोज लागेलच असे नाही त्यामुळे हातावर आणणे आणि खाणे अशी त्यांची अवस्था आहे. त्यांना रोज काम मिळेल अशी व्यवस्था शासनाने करावी. सोबतच जमत असल्यास स्त्रियांना सुध्दा आर्थिक मदत करण्याबाबत मार्गदर्शन करून रोजगार मिळवून दयावा. या भागातील लोक बचत करीत नाही. तर त्यांना बचतीचे महत्व पटवून देवून त्यांना बचत करण्याकरीता भाग पाडावे जेणेकरून त्यांना त्यांचा फायदा अडचणीच्यावेळी तर होईलच परंतू शासनालाही त्यांची मदत होईल. 2) औषधांवर उत्पन्नाचा खर्च होतो तर आरोग्य विषयक सोई तसेच आरोग्याविषयी, स्वच्छतेविषयी आणि थोडक्यात औषध घेवून लवकर आरोग्य चांगले ठेवण्याकरीता त्यांना शासनाने मार्गदर्शन करावे तसेच कमीत कमी खर्चात औषधांची सोय करून दयावी. दुर्गापुर परीसरात अस्वच्छता मोठया प्रमाणात आहे. कचरा साफ करण्याकरीता शासनाने काही प्रयत्न करावे तसेच शासन व स्वयंसेवी संस्थांनी त्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याकरीता मार्गदर्शन करावे. या भागात व्यसनी लोक फार मोठया प्रमाणात आहेत त्यामुळे वेगवेगळया प्रकारच्या व्यसनामुळे इथे आजारीपणा तसेच दारिद्रय दिसून येते. म्हणून व्यसनावर आळा घालण्याकरीता शासन व स्वयंसेवी संस्थानांनी पाऊल उचलावे. 3) थर्मल पावर स्टेशन जवळच असल्याने त्यातुन निघणाऱ्या धुर, धुळ, रसायनयुक्त पाणी यांचा मोठया प्रमाणावर आरोग्यावर परीणाम होत आहे. त्यामुळे वेगवेगळे रोग दिसून येतात. यावर बंधन घालण्याकरीता थर्मल पावर स्टेशन, शासन व स्वयंसेवी संस्था या सर्वांनी मिळून उपाय सुचविणे महत्वाचे आहे. जसे झाडे लावणे, धुळ, धुरी वर काही प्रमाणात कां होईना परंतू बंधने आणणे तसेच पाण्यात रसायन मिसळल्या जाणार नाही याची काळजी घेणे. जवळच शेती असणाऱ्या लोकांच्या शेतपीकावर सुध्दा थर्मर पावर स्टेशन च्या धुर, धुळी व उष्णतेचा तसेच रसायनयुक्त पाण्याचा वाईट परिणाम होत आहे. यावर आळा घालण्याकरीता धुर, धुळीचा वापर कमी होईल व रसायन युक्त पाणी शेतात जाणार नाही याकरीता थर्मर पावर स्टेशनने उपाय आखावेत. 4) दुर्गापुर भागात पर्यावरणाची फार मोठी समस्या असूनही तिथे शासन व स्वयंसेवी संस्था कार्यरत नाही. शासन व स्वयंसेवी संस्थेने झाडे लावून रस्त्यावर पाणी मारून, तसेच स्वच्छता ठेवून पर्यावरण चांगले ठेवण्यात मदत करता येईल. 5) चंद्रपुर महाऔष्णीक विद्युत केंद्राने आपल्या कार्यप्रणालीमध्ये मानवसंसाधन, यंत्रसामुग्री व मालमत्ता यांच्या संपूर्ण सुरक्षिततेला जाणीवपुर्वक प्राधान्य दयावे.आरोग्य विघातक बाबी व औद्योगिक सुरक्षितता यांच्याशी संबंधित प्रत्येक कायदेशीर बाबीचे महाऔष्णीक विद्युत केंद्राने पालन करावे.

---

**संदर्भ ग्रंथ सूची** :–


१. आगलावे डॉ. प्रदिप, 'आधुनिक भारताच्या सामाजिक समस्या', श्री. प्रमोद मुंजे, रूईकर मार्ग, नागपूर.

२. भांडारकर डॉ. के. म. ,'पर्यावरणशास्त्र', मिलींद जोगळेकर, पुणे, 2006.

३. डॉ. दुभाशी पद्माकर,'जागतिकीकरण, उदारिकरण आणि अर्थकारण', ऑगष्ट, 2006

४. गोंडे गुरूनाथ, 'सामाजिक संशोधन पध्दती', सौ. भाग्यश्री मोरेश्वर फडके, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 1986.

५. घाटोळे रा.ना., 'सामाजिक संशोधन पध्दती', नागपूर नियंत्रण प्रकाशक समिती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, 1992.

६. प्रा. मेश्राम एस. एस., 'प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन', कृष्णचंद्र एजन्सीज, लक्ष्मीनगर, नागपूर, 22, सप्टेंबर 2000

७. डॉ. प्रा. सुर्यवंशी ज्ञानेश्वर शिवाजी, 'पर्यावरणशास्त्र', उपेंद्र दामोदर कुलकर्णी, पुणे, 2007.

८. 'सामाजिक परिवर्तनः प्रक्रिया व घटक', य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक पुस्तक क्र 1, 2002

# 'नागपूर मिहान सर्वांगीण विकासाबरोबर एज्युकेशन हब'

**प्रा. रमेश काशिराम शेंडे**, मातोश्री मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय, नरखेड, जि. नागपूर
मो. नं. 9423604723, rkshende70@gmail.com

प्रस्तावना :– महाराष्ट्र राज्याची उपराजधानी आणि मध्य भारतातील सर्वात मोठे शहर असलेले नागपूर ''एज्युकेशन हब'' होत असल्याची माहिती विभागीय आयुक्त अनुप कुमारनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला एक वर्ष पूर्ण होत असतांना विदर्भाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असे निर्णय त्यांनी घेतले. माझी मेट्रो रेल्वे म्हणून ओळखली जाणारी मेट्रो रेल्वे, उच्च शिक्षणात नामांकित असणारी आयआयएम सुरू झाले. आरोग्याच्या दृष्टीने देशपातळीवर ज्याचे नांव आहे, ते एम्स संस्था देखील नागपूरात कार्यान्वित होत आहे. महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मिहान प्रकल्पालाही गती मिळाली आहे. नामांकित कंपनी रिलायन्सने मिहानमध्ये गुंतवणूक करून योग्य दिशेने वाटचाल सुरू केली आहे. नागपूर–मुंबई कम्युनिकेशन एक्सप्रेस वे सुरू करण्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी केला आहे. नागपूर राज्याची उपराजधानीच नव्हे तर देशाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. नागपूर सुंदर आणि स्वच्छ शहर म्हणून नावारूपाला येताना स्मार्ट सिटीत नागपूरचा समावेश झाला आहे. टायगर कॅपिटलचे प्रवेशद्वार म्हणून नागपूरकडे पाहिले जात आहे. पर्यटनाच्या दृष्टीनेदेखील महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. जलयुक्त शिवार हे अभियान लोकाभिमुख झाले आहे. वीज निर्मितीकडे विशेष लक्ष देऊन विजेचे दर कमी करून उद्योजकांना दिलासा दिला आहे. नागपूर विभागात झालेल्या विकासकामांचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे.

उच्चशिक्षणाच्या सुवर्णसंधी :– कित्येक वर्षापासून शिक्षणाच्या क्षेत्रात मागासलेपणाच्या झळ शोषत असलेल्या नागपूरला सध्या अच्छे दिन आले आहेत. केवळ काही महिन्यांच्या अंतरातच 'आयआयएम' (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट), ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स (एम्स) आणि ट्रीपल आयटी (इंडियन इन्स्टिटयूट इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) या राष्ट्रीय दर्जाच्या संस्थांना मान्यता मिळाल्यामुळे नागपूर शहराने शैक्षणिक प्रगतीकडे पुढचे पाऊल टाकले आहे. केवळ मध्य भारतातीलच नव्हे तर देशातील 'एज्युकेशन हब' म्हणून नागपूरची ओळख प्रस्थापित होणार असून जागतिक नकाशावरदेखील शहराचे नाव आले आहे.

'आयआयआयटी' चा विकास :– नागपूरला 'व्हीएनआयटी' च्या रूपात एकमेव शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय होते. परंतु हे महाविद्यालय 'एनआयटी' मध्ये (नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी) गेल्यानंतर नागपूरला एकही शासकीय अभियांत्रिकी संस्था नव्हती. गेल्या कित्येक वर्षापासून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयदेखील कागदवरच अडकलेले आहे. अशा स्थितीत बाहेरील शहरात अभियांत्रिकी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढीस लागली. आता ट्रीपल आयटीला केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीचे शिक्षण घेण्यासाठी दर्जेदार संस्थेचा पर्याय उपलब्ध झाला आहे. यासाठी मौजा वारंगा येथे 100 एकर शासकीय जमीन शासनाने मंजूर केलेली आहे.

रोबोटिक्स सेंटर :– मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने दोन महिन्यांपूर्वीच जागतिक स्तरावर रोबोटिक्सचे उत्पादन करणाऱ्या एबीबी या नामवंत कंपनीकडून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात रोबोटिक्सचे सेंटर सुरू करण्यात आले आहे. 'एम्स' या संस्थेकरिता मौजा दहेगावमधील मिहान प्रकल्पातील 200 एकर जागा शासनाने मंजूर केलेली आहे.

महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी :– नॅशनल लॉ धर्तीवर 'महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी' स्थापन करण्याचा निर्णय 17 एप्रिल 2013 रोजी राज्य मंत्रिमंडळाने घेतला. यातील मुंबई व औरंगाबाद येथील लॉ युनिव्हर्सिटी सुरूदेखील झाल्या. परंतु नागपूर येथील लॉ युनिव्हर्सिटीकडे सुरूवातीपासूनच दुर्लक्ष करण्यात आले. मात्र. नव्या सरकारने याकडे जातीने लक्ष देता शासनाने 70 कोटी रूपयांची तात्पुरती तरतूद केली.

'आयआयएम' नागपूरसाठी अभिमानाची बाब :– अवध्या राज्याचे लक्ष लागून असलेल्या आणि नागपूरसाठी अभिमानाची बाब असलेल्या बहुचर्चित इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेटमेंट (आयआयएम) मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांनी अखेर नागपूरला सुरू झाले. अवध्या देशभरातील विद्यार्थ्यांनी व्हीएनआयटी परिसरात हजेरी लावली आहे. विश्वेश्वरय्या राष्ट्रीय

अभियांत्रिकी संस्थेमध्ये (व्हीएनआयटी) प्रायोगिक तत्वार वर्ग सुरू करण्यात आलेले. यासाठी राज्य शासनाच्या वतीने मिहानमध्ये जमिन देण्यात आली आहे.

रोजगार निर्मिती :– महात्मा गांधी नरेगा योजनेच्या अंतर्गत राज्यात झालेल्या एकुण रोजगार निर्मितीत नागपूर महसूल विभागाच्या 6 जिल्ह्यांचा 36 टक्के वाटा आहे. वर्ष 2014–15 मध्ये एकुण रोजगार निर्मितीत नागपूर विभागाचा वाटा 34.72 टक्के.

वर्ष 2014–15 मध्ये एकुण खर्च 469.16 कोटी रूपये आहे. यावर्षी 469.16 कोटी रूपये आहे. यावर्षी 2015–16 मध्ये आतापर्यंत 140.34 लक्ष मनुष्य दिनाची निर्मिती व 370.71 कोटी खर्च झालेला आहे. रोजगार निर्मितीसोबतच रेशीम उद्योगामध्ये टसर लागवडीसाठी सध्या चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या चार जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान :– स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत 29 नगरपरिषदांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. सर्वेक्षणानुसार शौचास उघडयावर जाणाऱ्या कुटुंबांची संख्या 34 हजार 689 असून शौचालयाकरीता 31 हजार 8 अर्ज प्राप्त झाले आहेत. तर तपासणी केलेल्या अर्जाची संख्या 7 हजार 445 असून शासनाकडून 29 नगर परिषदांना निधी प्राप्त करून देण्यात आलेला आहे.

चावडी वाचन :– गावस्तरावर चावडी वाचन या कल्पक योजनेच्या माध्यमातून गावखेडयांमधील तक्रारींचे निवारण त्याचस्तरावर करण्यास अद्यावत करण्यास मदत झाली आहे. नागपूर विभागात चावडी वाचनाचा कार्यक्रम 5 हजार 995 गावात यशस्वीरित्या राबविण्यात आलेला आहे. या कार्यक्रमात सर्वप्रथम तालुक्यातील गावामध्ये चावडी वाचनात गावामधील सर्व खातेदारांच्या सात–बाराचे वाचन सर्वासमक्ष करण्यात आले आहे. मय्यत खातेदारांची शोध मोहिम घेऊन तशा दुरूस्त्या करण्यात आल्या. शेतजनिमीचे अधिकार अभिलेखातील इतर नोंदी घेण्याचे कामही यावेळी पार पाडले गेले.

महसूल :– प्रशासकीयदृष्टया महसूल हा अत्यंत महत्वाचा असा भाग. यामध्ये नागपूर विभागाने सन 2014–15 मध्ये शासनाने ठरवून दिलेल्या 43908.00 लक्ष उद्दिष्टांच्या तुलनेत 45729.77 लक्ष पूर्ण केले आहे. एकुण 106.11 टक्के एवढी वसुली करून उद्दिष्टपूर्तीचा नवीन उच्चांक गाठलेला आहे. सन 2015–16 या वर्षाकरिता शासनाने रू. 53289.24 लक्ष इतके उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. या उद्दिष्टपूर्तीची कार्यवाही प्रशासकीय स्तरावर नियोजनबद्धरित्या सुरू आहे.

गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांना लाभ :– नागपूर जिल्ह्यातील गोसेखुर्द राष्ट्रीय पाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांकरिता गावठाणतील व्याजाची रक्कम रू. 13.67 कोटी मंजूर करण्यात आली. नागरी सुविधांची विशेष दुरूस्तीमध्ये रू. 752.41 लक्षाच्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे. वादग्रस्त प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाणात वीज जोडणीसाठी सवलत देण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तसेच वाढीव कुटुंबांना पॅकेजचा लाभ देण्यासाठी 2 हजार 983 वाढीव कुटुंबांना नोकरीऐवजी एकमुस्त रू. 2.90 लक्ष रूपये देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे.

राष्ट्रीय जीवनोन्नती अभियान :– ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 1 हजार 673 नवीन बचतगटांची स्थापना करण्यात आलेली आहे. बंद पडलेले व अनियमित 1 हजार 329 बचतगटांचे पुनरूज्जीवन करण्यात आलेले आहे. 1 हजार 974 महिला बचतगटांना फिरता निधी म्हणून 276 लक्ष रूपयांची आर्थिक मदत करण्यात आलेली आहे. दतर 7 हजार 35 महिला बचतगटांना बँकांशी जोडणी करून रू. 5 हजार 752 लाख रूपयांचे कर्ज कमी व्याजदराने प्रदान करण्यात आलेले आहे.

जलयुक्त शिवार अभियान :– जलयुक्त शिवार अभियानांतर्गत एकुण 1077 गावांची निवड करण्यात आलेली आहे. दरवर्षी 1 हजारांहून अधिक गावांची निवड करून शाश्वत पाण्याची उपलब्धी त्या गांवाना होईल याचे नियोजन मागील वर्षीप्रमाणेच यंदाही करण्यात आलेला आहे. एकुण 13 हजार 897 कामांपैकी 12 हजार 72 कामे पूर्ण झाली आहेत. 1 हजार 825 कामे प्रगतीपथावर आहेत. लोकसहभागातून 280 गावांमध्ये कामे करण्या आलेली आहेत. शासनाच्या अभिनव व महत्वकांक्षी अशा या योजनेबरोबरच केशरी शिधाप्रत्रिकाधारक शेतकऱ्यांनाही सवलतीच्या दराने वर्धा येथे अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अन्नधान्याचा लाभ बळीराजाला देण्यात येतो आहे.

अवैध रेती वाहतुकीवर आळा :– नागपूर विभागात सहाही जिल्ह्यात रेतीघाट लिलावाची प्रक्रिया ई–ऑक्शनद्वारे करण्यात येत आहे. त्यामुळे महसुलात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे शासकीय

महसूल वसुली सन 2014–15 मध्ये शासनाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टांच्या तुलनेत 106.11 टक्के झाली आहे. तसेच गौण खनिज अंतर्गत 240 कोटीपेक्षा जास्त महसूल गोळा झालेला आहे. गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा.

ग्रास प्रणाली :– राज्य शासनाने वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली व्हर्च्युअल ट्रेझरीची स्थापना केली. बँकांच्या पेमेंट गेटवेचा वापर करून इलेक्ट्रॉनिक माध्यमातून शासकीय जमा लेखांकन प्रणाली ग्रास गर्व्हमेंट रिसीप्ट अकाऊन्टींग सिस्टीम या द्वारे शासनाच्या विविध विभागाशी संबधित जमा होणाऱ्या रकमेचे लेखांकन व ताळमेळ डल्लल्ली करण्यात आलेले आहे. या पद्धतीत महसूल, करमणूक शुल्क व गौण खनिज अंतर्गत प्राप्त महसूल फ्लोअर पद्धतीन्वये जमा करण्यात येत आहे. या प्रणालीची सुरवात नागपूर विभागात दिनांक 1 ऑगस्ट, 2015 पासून करण्यात आलेली आहे. आजपर्यंत 6 हजार 467 चालनाद्वारे एकुण रू. 24.80 कोटी रूपयांचा महसूल जमा करण्यात आलेला आहे.

राजस्व अभियान :– महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख होण्यासाठी ग्रामीण, शहरी भागात शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायतीस्तरावर शिबिरे आयोजित करून विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आलेले आहे. नागपूर विभागात 1 हजार 229 शिबिरांद्वारे 1 लक्ष 57 हजार 694 दाखल्यांचे वितरण करण्यात आलेले आहे. यामुळे सामान्य नागरिकांना दाखल्यांसाठी तालुक्याचे मुख्यालयी येण्यासाठी होणारा त्रास कमी झाला व वेळेची तसेच पैशाची मोठया प्रमाणावर बचत झाली आहे.

ग्रामीण भागातील अतिक्रमण करण्यात आलेले पांदण रस्ते लोकांच्या सहभागातून मोकळे करण्यासाठी विभागामध्ये विशेष मोहीम राबवण्यात आली. या कालावधीत नागपूर विभागात 1 हजार 349 कि.मी. अतिक्रमित पांदण रस्त्यापैकी 581.72 कि.मी. लांबीचे रस्ते मोकळे करण्यात आले. त्यामुळे ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक असलेले पांदण रस्ते पुनर्जीवित झाले. या मोहिमेत सर्वप्रथम पांदण रस्ते दर्शविलेले गाव नकाशे तयार करून ते दर्शनी भागात लावले. नंतर लोकांनी सहभाग घेतला, असे अतिक्रमण झोलेले रस्ते प्रथम मोकळे करण्याची कार्यवाही केली. विवादित कायदेशीर तरतुदींचा आधार घेऊन अतिक्रमणमुक्त पांदण रस्ते करण्यात आले.

प्रलंबित फेरफार नोंदी निकाली काढण्यासाठी मंडळास्तरावर फेरफार अदालतीचे आयोजन करून नागपूर विभागात एकूण 64 हजार 285 फेरफार नोंदी निकाली काढण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमामुळे गावातील सर्व शेतकरी खातेदारांना दुरूस्तीनंतरचे जमिनीचे अभिलेख पुरविण्यात आले आहेत.

अर्धन्यायिक प्रकरणांचा निपटारा :– महसूल अधिकाऱ्यांकडील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे निकाली काढण्यासाठी विभागात एकुण 383 महसूल अदालतींचे आयोजन करून मोठया प्रमाणात अर्धन्यायिक प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यामुळे वर्षानवर्षे प्रलंबित असलेली प्रकरणे निपटारा करून नागरिकांच्या वेळेची, पैशाची बचत झाली.

आधार नोंदणीमध्ये राज्यात प्रथम :– आधार नोंदणीत नागपूर विभाग राज्यात सर्वप्रथम आहे. वर्धा, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांची टक्केवारी 95 टक्क्यांवर आहे. नागपूर विभागाने नोंदणींच्या एकुण 93 टक्क्यांचा टप्पा पार केला. तसेच चंद्रपूर आणि गडचिरोली दुर्गम जिल्हे असूनही जिल्ह्यात आधार नोंदणी 90 टक्क्यांच्यावर झालेली आहे. विशेषतः 6 वर्षापर्यंतच्या वयोगटातील मुला–मुलींच्या आधार नोंदणीमध्येही नागपूर विभाग प्रगतीपथावर आहे.

तलाठी सज्जा पुनर्रचना :– राज्यात गेल्या 30–40 वर्षात झालेल्या विविध बदलांच्या अनुषंगाने तलाठी नागपूर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीने अतिशय बहुमुल्य अशा शिफारशी अहवालाच्या स्वरूपात शासनास सादर केल्या आहेत. प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याचे दृष्टीने याचे निश्चित सहाय्य होणार आहे.

संशोधन पद्धती :– कोणत्याही विषयाचे संशोधन वस्तूनिष्ठ व्हावे म्हणून संशोधन पद्धतीचा अवलंब करून संशोधन केले जाते. प्रस्तुत शोधनिबंधासाठी 'नागपूर मिहान सर्वांगीण विकासात एज्युकेशन हब' या विषयाची संशोधनासाठी निवड केलेली आहे.

संशोधनाचे उद्देश :– 1. नागपूरच्या उच्चशिक्षणाच्या उपलब्ध संधीबाबत अभ्यास करणे. 2. उच्चशिक्षणातून नागपूरच्या सर्वांगिणविकासचा अभ्यास करणे. 3. उच्चशिक्षणाबाबत शासनाच्या सोयीसुविधांचा अभ्यास करणे. 4.उच्चशिक्षणासोबत शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करणे. 5. नागपूरात राष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक संस्थाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :— 1.नागपूर शहराने राष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक प्रगतीचे पाऊल गाठले. 2. एज्युकेशन हब म्हणून नागपूरची प्रस्थापित ओळख झाली. 3. नागपूर उच्चशिक्षणासोबत शासनाच्या विविध योजनांचा विकास झाला. 4.नागपूर शहराला मेट्रो रेल्वेमुळे मिहान प्रकल्पाला चालना मिळाली. 5. उच्चशिक्षणातून नागपूर शहरात सर्व सोयी सुविधा उपलब्ध झाल्या.

नमुना निवड पद्धती :— प्रस्तुत शोधप्रबंधात संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील साधा यादृच्छिक लॉटरी तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

संशोधन आराखडा :— प्रस्तुत संशोधनात संशोधन आराखडयामधील वर्णणात्मक व अंशतः निदानात्मक संशोधन आरखडयाचा वापर करण्यात आलेला आहे.

तथ्य संकलन :— प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनामध्ये प्राथमिक स्त्रोमाधील मुलाखत अनुसूची व निरीक्षण या तंत्राचा वापर करून दुय्यम स्त्रोतामध्ये वर्तमानपत्रे, योजना, मासिके, शासकीय जी.आर. इत्यादी तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

निष्कर्ष :— जगभरातील मोठे गुंतवणूकदार महाराष्ट्रातील नागपूर येथे गुंतवणूक करण्यास उत्सूक असून येत्या काळात 1 लाख कोटीची गुंतवणूक करणार त्यामुळे 1 लाख लोकांना प्रत्यक्ष, तर 2 ते 3 लाख लोकांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होईल.

नागपूर मिहान प्रकल्पात स्थापन करण्यात येणाऱ्या 'एम्स' आणि 'आयआयआयएम' स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने (एमएडीसी) दोन्ही संस्थाना मिहानमध्ये जागा वाटपाचे पत्र देण्यात आले. मिहानमध्ये एम्स 150 एकर आणि आयआयएम 140 एकरमध्ये स्थापन करणार आहे. पंतप्रधान आरोग्य सुरक्षा योजना अंतर्गत भारत सरकारतर्फे केंद्रिय आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून एम्सची स्थापना करण्यात आली आहे. याच प्रकारे राष्ट्रीय स्तरावर स्वातिप्राप्त व्यवस्थापन संस्था आयआयएमला नागपूरात स्थापन करण्यात येत आहे. एम्स आणि आयआयएमनी प्लॉटची आखणी आणि संयुक्त मोजणीचे काम लवकरच पूर्ण करून एमएडीसी अन्य संबंधीत प्राधिकरणाकडून मंजूरी प्राप्त करून इमारत तयार करण्यासंदर्भात आवश्यक प्लॅन तयार करण्याचे आव्हान एमएडीसीने जागेच्या वाटप पत्रात केले आहे.

नागपूर येथे एम्स स्थापन करण्याच्या प्रस्तावाला केंद्रिय मंत्रीमंडळाने परवानगी देऊन अंदाजे 1577 कोटी रूपयांचा खर्च करणार. आणि रूग्णालयाचे राज्यात मालक आणि विश्वसनीय आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे व लाभ घेता येईल.

संदर्भ सुची :—


१. आगलावे प्रदिप, 'सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे', साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2000
२. बोधनकर /अलोणी, 'सामाजिक संशोधन पद्धती', साईनाथ प्रकाशन, नागपूर चतुर्थ आवृत्ती, 2007
३. लोकशाही वार्ता दि. 31/10/2015, पृ. 01, 06
४. लोकशाही वार्ता दि. 31/10/2015, पृ. 12
५. पुण्यनगरी दि. 31/10/2015, पृ. 11
६. लोकमत दि. 30/10/2015 पृ. 02
७. लोकमत दि. 29/10/2015 पृ. 01
८. सकाळ दि. 29/10/2015 पृ. 01

# 'स्थायी व अस्थायी कामगार'

**विनोदकुमार चोपकर**, संशोधक विद्यार्थी, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

पहिल्या महायुध्दामुळे आपल्या भारतात औद्योगिकीकरणाला वेग आला. या नविन–नविन उद्योग प्रणालीच्या सुरवातीमुळे रोजगारीच्या विविध नविन संधी उपलब्ध होऊ लागल्यात. खेडी, वसाहत सोडून तरूणांची शहराकडे धाव वाढली. प्रत्येक मानसात शहरात जीवन जगण्याची इच्छा वाढू लागली आणि जगातील औद्योगिकतेचे वारे भारतात वाहू लागलीत.

आज प्रत्येक गरज ही अत्यावश्यक झालेली आहे. अन्न, वस्त्र, निवारा ह्या मुख्य गरजा आहेच पण त्या मागोमाग दैनंदिन जीवनातील अगदी झोपेतून उठल्यानंतर तर रात्री झोपी जायीपर्यंत लागणाऱ्या प्रत्येक वस्तु कश्या आपणास अत्यावश्यकच वाटत असतात आणि त्याची पुर्तता पैशानीच होते. त्याकरीता मानव पैसा कमविण्याच्या दृष्टीकोनातून भटकत असतो व त्याच्या या द्विधा अवस्थेचा लाभ पुंजीवादी लोक घेत असतात. जसे मजुराकडून ठरवून देण्यात आलेले काम झालेच पाहिजे. यावर मालक वर्गाचा कटाक्ष असतो आणि मालकांनी दिलेले कार्य झाले नाही तर मग त्याचा मोबदलाही त्यास त्याच प्रमाणात दिल्या जातो किंवा उद्याला पुन्हा काम मिळू शकत नाही ही द्विधा परिस्थिती श्रमिक वर्गाची होत असते. श्रमिक हा एक असा शब्द आहे की या शब्दातुनच पूर्ण अर्थबोध होतो. हा शब्द उच्चारता बरोबरच लक्षात येते कि शारीरिकरित्या श्रम करणारा तो श्रमिक.

पुर्वीच्या काळी जमिनदारी पद्धती अस्तित्वात होती. ती पद्धती फारच हृदयदायक असायची. यात जो जमिनदार वर्ग होता ज्यांच्याकडे फार विस्तीर्ण प्रमाणात शेती असायची. यांचे मालकी हक्क गांवचे गांव शेत राहायचे त्यामुळे यांना असंख्य श्रमिकांचीही आवश्यकता भासत असे. हे जमिनदार त्यांच्याकडे असणारा श्रमिक हा एक वर्ष, पाच वर्ष, दहा वर्ष अश्या प्रकारे यांच्याकडे काम करायचा यालाच बंधूवा मजदूर असे म्हणतात.

या श्रमिकांचे या जमिनदार श्रीमंत वर्गाकडून शोषण व्हायचे. जरूरी पेक्षा जास्त काम कमी मोबदल्यात हा वर्ग यांचे कडून करवून घेत असे. कोणाला मजुरी तर कोणाला श्रमाच्या मोबदल्यात अन्न–धान्य देणे हा यांचा गरीब श्रमिक वर्गाचा श्रमाचा मोबदला राहत असे व त्या मोबदल्यात मग त्या श्रमिकाला त्यांच्या घरचे, शेतीचे म्हणेल त्याप्रकारे त्यांना श्रम करावे लागत असे. त्याला त्याच्या घरी त्यांच्या परिवारात केव्हा जाता येईल? याचा ठावठिकाणाच राहत नसे. अशा गंभीर परिस्थितीत त्यावेळच्या श्रमिकांनी आपले दिवस काढले आहेत. कारखानदारी वर्गात सुध्दा भांडवलदाराव्दारे तयार झालेली नवी नियमावली आणि ज्यात शासकीय नियमाला बगल मिळावी हाच मुख्य हेतू होता.

कामगार :– 'उत्पादन कार्यात सक्रीय सहभाग बजावणारी व आर्थिक मोबदल्यात आपले श्रम विकणारी व्यक्ती म्हणजे कामगार होय.' 'श्रमाच्या मोबदल्याच्या स्वरूपात, शारीरिक, मानसिक श्रम वेचणारा व्यक्ती म्हणजे कामगार होय.'

उद्योग जगतात श्रमिकांची विभागीण दोन भागात झाली. 1) स्थायी श्रमिक, ज्याला संघटीत श्रमिक वर्ग असे म्हणतात. आणि 2) अस्थायी श्रमिक, ज्यास असंघटीत श्रमिक वर्ग असे संबोधण्यात येते.

**स्थायी श्रमिक वर्ग**:– इ.स. 1981 मध्ये आपल्या भारत देशात श्रमिक वर्गात काम करणाऱ्या अनन्य व्यक्तिंची एकूण संख्या ही 24.46 कोटी होती. एकंदर लोकसंख्येच्या तुलनेत सर्वात मोठी संख्या ही कारखानदारीत राबणाऱ्या श्रमिकांचीच होती. कारण प्रत्येक युवा वर्गाचा कल हा शहरातील वास्तव्य व कारखानदारीत काम याकडे जास्त होता व आजही वरिल प्रणालीतच तरूणांचा जास्त ध्यास आहे.

संघटीत होऊन क्षेत्रात काम करणाऱ्या अश्या भव्य श्रमिक समुदाला संघटीत श्रमिक म्हणतात. कारण पैशाच्या मोबदल्यात शारीरिक श्रम करणाऱ्या व्यक्तिस श्रमिक असे म्हणतात. हा श्रमिक जेव्हा समुदाय प्रणालीने आपले हक्काचे रक्षणास्तव न्याय मागण्याकरीता एकतेचे प्रतिक दर्शवितो अश्या श्रमिक समुहाला 'संघटना' शब्द उद्बोधीता येतो. हे श्रमिक कोणत्याही कारखान्यात असो किंवा कोणत्याही क्षेत्रात कार्य करीत असो त्यांची एक संघटना तयार करतात. ज्या संघटनेचे कार्य त्यांना किंवा त्यांच्या समुहाला येणाऱ्या असंख्य समस्यावर तोडगा काढणे, गरज भासल्यास शासनाची, न्यायप्रणालीची मदत घेणे

असतो. ह्यांची सुरवात सर्वप्रथम इंग्लंड मध्ये करण्यात आली, कारण त्यावेळी सर्वात जास्त कारखानदारी उद्योग हे इंग्लंड मध्येच होते. त्याकाळी तिथेही श्रमिकांची कारखानदारी जगताकडून पिळवणूक व्हायची. श्रमिकांच्या पिळवणूकीस विपन्न अवस्थेत ठेवणारी निर्दयी अशी समाज व्यवस्था तिथे होती. प्रारंभी अवस्थेत श्रमिकांनी फार वाईट हाल–अपेष्टात जीवन व्यतीत केले. कारण त्यांचे जवळ पर्याय नव्हता. पारिवारीक उपजिविका कशी करायची? हा ज्वलंत प्रश्न डोळयासमोर उभा होता. अश्या स्थितीत कष्ट मालक वर्गांना पाहिजे तितके करून उपजिविका मार्ग साधने हेच त्यांचे कार्य होते. यात त्या श्रमिकाचे अज्ञानपणाचा फायदा पुंजीवादी घेत असायचे. यातूनच तिथे संघटीत प्रणालीचा जन्म झाला. श्रमिकांचे युनियन तयार झालेत व श्रमिकांच्या अडचणी सरकार, कारखानदार यांच्या कडून सोडवू लागलेत. यात समाजकार्य करणाऱ्या विभिन्न संघटना यांचीही पुरेपूर साथ मिळाली. श्रमिकांना वाढत्या महागाईचा महागाई भत्ता मिळू लागला. निवासासाठी क्वार्टर सुविधा अगर घरभाडे भत्ता सोय उपलब्ध झाली. मुलांच्या शैक्षणिक सुविधास्तव लांबच्या शाळेकरीता कारखानदारा मार्फत श्रमिकांच्या पाल्यांना बसेस सुविधा मिळू लागली. श्रमिक परिवातील अवलंबीत सदस्यांना वैद्यकिय सोय उपलब्ध झाली. श्रमिकांच्या भविष्यासाठी त्यांचा भविष्य निर्वाह निधी चालू वेतनातून टक्केवारीत कपात होऊ लागली व तेवढीच राशी कारखानदारांना त्यांच्या खात्यात शासकीय दप्तरी जमा करावी लागली. अपघाती विमा कपात सुरू झाली, ज्यामुळे त्यांच्या जीवनप्रणालीला, पारिवारीक परिस्थितीला स्थिरता लाभली. कामावर कार्य करीत असतांना दगावल्यास अनुकंपा अंतर्गत त्यांच्या परिवारातील एका व्यक्तिला पुढील उदर्रनिवाहास्तव नोकरी पण मीळू लागली. यामुळे श्रमिकांची कार्य–इच्छा बळावली व तो प्रसन्न मुद्रेने आपल्या कार्यात तत्पर राहू लागला. कोणतेही कार्य करतांना सर्वप्रथम मानसिक–सुदृढता असणे गरजेचे असते. ते जर त्या व्यक्तिला प्राप्त झाले तर त्यांच्या मागील चिंता, समस्या सुटू लागतात आणि माणुस प्रसन्नतेने कार्यतत्पर असतो. हे सर्व त्यांच्या एकतेचे फळ आहे. अशा या श्रमिक वर्गाला स्थायी श्रमिक म्हटल्या गेले.

**अस्थायी श्रमिक वर्ग** :– जे श्रमिक कार्य करित असतांना त्यांच्या कामाचे स्वरूप हे स्थायी नसते. म्हणजेच अंशकालीन असते. ज्यांना काम वयाच्या एका निश्चित वयोमर्यादेपर्यंत एकाच ठिकाणी मिळत राहील. याची शाश्वती नसते. जे असंघटित असतात. ज्यांची कुठे संघटना नसते. हातात काम मिळेल तर करणे अन्यथा कामासाठी दारोदारी भटकने या प्रकारच्या कार्यप्रणालीस अस्थायी श्रमिक कार्यप्रणाली म्हणतात.

वरिल प्रमाणे अस्थायी स्वरूपात काम करून आपली उपजिविका भागविणाऱ्या श्रमिकांची परिस्थिती फारच नाजूक असते. याला मुख्य कारण म्हणजे रोजगार मिळून आर्थिक लाभ होणार ह्याची त्याला पूर्ण शाश्वती मुळीच राहत नाही. त्यामुळे अश्या श्रमिकांना उपासमारीची झळ सुध्दा सोसावी लागते. कारण त्यांच्या जवळ पर्याय नसतो. शिक्षणाने असा श्रमिक वर्ग हा अशिक्षीत असतो. कामासाठी भटकणे हाच त्याच्या जीवनातील क्रम राहतो. त्यामुळे तो आपल्या मुळाबाळांनाही पूर्णतः स्थायी शिक्षण देवू शकत नाही. कारण आज इथे तर उद्या आणखी कुठे अशी त्याची जिवन जगण्याची अवस्था राहाते. म्हणून अश्या श्रमिक वर्गात अशिक्षिताचे प्रमाण अधिक पाहावयास मिळते. अश्या श्रमिक वर्गाला श्रम सेवा अंर्तगत येणाऱ्या म्हणजेच 'स्थायी श्रमिकांना मिळणाऱ्या सुख–सोयी सेवारत असल्यामुळे मिळतात. त्या मात्र यांना लागु होत नाही. आज कामाच्या शोधात या कारखान्यात काम तर उद्या आणखी कुठे त्यांनतर आणखी कुठे ही त्याची अवस्था राहते. आणि अश्याच स्थितीत तो श्रमिक आपले संपूर्ण जीवन व्यतीत करून कसा–तरी परिवाराचा उदरनिर्वाह करित असतो.

कारखानदारी जगात सर्वे मध्ये असे आढळून येते कि बरेच श्रमिक अनेक वर्षापासून एकाच कारखाण्यात काम करित आहे. सरळरित्या बघीतले तर ते स्थायी स्वरूपात गणल्या जाणारच पण तसे होत नाही. त्या श्रमिकाला कारखानदार वर्ग क्वचीतच काम करावयास बांधील करतो. व श्रमिक हा पोटासाठी मिळेल त्या अवस्थेत कार्य करून पारिवारिक उपजिविका चालवितो. याचमुळे तो अशिक्षित राहतो व याच कारणामुळे त्याची पुढील पिढीसुध्दा अशिक्षीततेच्या मार्गावर आढळते.

कारखानदार जर त्याला पक्की म्हणजेच स्थायी स्वरूपात रोजगार देते तर त्याला सर्व सुख–सोयी जे नियमान्वये श्रमिक कायद्यानुसार द्याव्या लागतात.

त्याला मिळण्यास तो पात्र गणल्या जातो. ज्यांचा भूर्दंड कारखानदाराला सोसावा लागतो. म्हणून अश्या असंख्य श्रमिकांना कारखानदार स्थायी होऊ देत नाही. त्यांच्या कडून श्रम हे अस्थायी स्वरूपी श्रमिकाव्दारेच करवून घेतात. अश्या स्थितीत श्रमिक ही कार्य नाईलाजाने करतो. कारण तो अपंग आहे. काम मिळणे हिच त्याची मुख्य गरज असते. त्याच्या या दिनवाणी परिस्थितीचा फायदाच कारखानदार घेत असतात. अश्या अस्थायी स्वरूपी कार्य करणाऱ्या श्रमिकांच्या परिवाराला शैक्षणिक स्थिरता लाभत नाही. वैद्यकीय सोयी सवलत प्राप्त मिळत नाही. भविष्य निर्वाह निधी मिळत नाही. कष्टातून मिळवलेल्या आर्थिक आवक मधूनच आपली परिवाराची उपजिविका भागविणे व येणाऱ्या समस्या ही सोडविणे हेच त्याचे नित्याचे कार्य असते. अश्या प्रकारे या श्रमिकावर जी वेळ दिसते याला आपण नैसर्गीक किंवा दैव निर्मित म्हणून शकणार काय? हा गहण प्रश्न येतो. कारण हि स्थिती तर मानवांनी म्हणजेच भांडवलदारांनी तयार केलेली परिस्थिती आहे असे वाटते. त्यांच्या ही वाट्याला स्थायी कर्मचाऱ्याप्रमाणे थोडा आर्थिक आधार दिला तर त्याचे जिवनमान निश्चितच सुधारण्यास मदत मिळू शकेलच. दुसऱ्या महायुध्दानंतर औद्योगिक जगात असंघटित म्हणजे अस्थायी स्वरूपी श्रमिकांत भरघोस वाढ झाली. 1980 मध्ये आपल्या भारतात त्यांची अनुमानीत संख्या ही 70.04 लक्ष ऐवढी प्रचंड होती. असंघटीत श्रमाचे तात्पर्य ऐवढेच असते कि ते संघटीत होऊन काम करण्यास असमर्थ असतात. कारण त्यांच्या कामाचे स्वरूपास स्थिरताच मुळात लाभत नसते. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचा ते टाहो ही करू शकत नाहीत. कारण जर उद्याला काम दिले नाही तर पारिवारीक खर्च, व्यवहार चालवायचा कसा? हाच त्याचे समोरील मोठा प्रश्न असतो. यामुळे असा मजुर, श्रमिक वर्ग फक्त परिवाराचा उरदनिर्वाह करू शकतो. त्यांच्या विभिन्न गरजा पुर्ततेत हा वर्ग कमीच पडतो. त्यामुळे अश्याच वर्गातून अपराधी–प्रवृत्ती जन्माला येते. मुलांना शिक्षण राहत नाही. मग ही उनाड बनतात व नको ते समाजबाह्य कार्य करून आपली आर्थिक अडचण भागवित असतात. अशा श्रमिक वर्गात पती–पत्नी दोघेही मिळेल त्या कामावर जातात. आज कारखानदारी वर्गात जो ठेकेदारी पध्दती आहे यात असा भरपूर कर्मचारी वर्ग पाहावयास मिळतो. त्यामुळे मुलांवर पाहिजे त्या प्रमाणात लक्ष यांना देता येत नाही. उदा. विटा भट्टीवर कार्य करणारा मजदूर श्रमिक वर्ग, मकान बांधणी क्षेत्रात काम करणारा श्रमिक वर्ग, शेती क्षेत्रात रोजंदारीने काम करणारा श्रमिक वर्ग, शासनाच्या विभिन्न कार्य क्षेत्रात काम करणारा अस्थायी श्रमिक वर्ग, ठेकेदारी पध्दतीत काम करणारा श्रमिक वर्ग ही सर्व उदाहरणे अस्थायी–श्रमिक कार्य प्रणालीत येतात.

अस्थायी श्रमिक प्रणालीत महिलांची टक्केवारी मजदूरीने कार्य करण्यात अधिक आढळते. या अनुसंगानेच 24 जानेवारी 1950 ला महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. ज्यास आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून संबोधण्यात आले. या मंडळाचा मुख्य उद्देश आर्थिक स्थितीत महिलांना सुदृढ करणे, त्यांना विविध रोजगार प्रणालीचे ज्ञान देणे हा असतो. व त्यात येणारी आर्थिक अडचण त्या समुहाने सोडवित असतात. व छोट्या–छोट्या उद्योगात स्वतः व इतरत्र गरजु महिलांना सम्मिलित करून आर्थिक मिळकत मिळवण्याच्या प्रयत्नात यशस्वी वाटचाल करतात. जसे पापड उद्योग, कांडप मीरची, हळद इ.

इ.स. 1992–93 या वर्षी या आर्थिक विकास महामंडळाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. व ग्रामिण भागातील महिलांना देखील आर्थिक–स्वावलंबन प्राप्त व्हावे याकरिता शासन प्रयत्नशील झाले. ज्याकरिता आंतरराष्ट्रीय निधी द्वारे ही या कार्यास बळकटी मिळाली.

उपरोक्त प्रकारामुळे महिलांना स्वावलंबीपणाच प्राप्त होऊ लागला असे नाही तर त्यांच्या विविध मंडळाद्वारे गट, भाग तयार झालेत. गटांच्या सभा होऊ लागल्यात त्यामुळे प्रत्येकाच्या सुख–दुःखाच्या क्षणी इतरांचा हातभार सहभाग तथा मदतीची वृत्ती त्यांच्यात जोपासू लागली. मनाचा विरंगुळा नाहीसा होऊ लागला. त्यांच्या कल्पकतेप्रमाणे नविन–नविन स्थानिक घरगुती उद्योगात चालना मिळाली.

---

संदर्भ ग्रंथ सूची :–

बोधनकर सुधीर; अलोणी विवके, 'सामाजिक संशोधन पद्धती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 1993.

टाकसांडे प्रा. प्राजक्ता, 'व्यावसायिक समाजकार्य', साईनाथ प्रकाशन, नागपूर, मार्च 2000.

प्रदिपकुमार, 'संघटीत कामगारांसोबत समाजकार्य', यश पब्लिशर्स डिस्ट्रीब्युटर्स, महाल नागपूर.

देशमुख प्रभाकर, 'श्रमाचे अर्थशास्त्र', विद्या प्रकाशन, नागपूर, 1987.

# जलस्वराज्य प्रकल्प व महिलांचा विकास

**किशोर जयदास निखारे,** संशोधक विद्यार्थी, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**प्रस्तावना :—** विकासाचा अर्थ आहे वृद्धी करणे किंवा विस्तार करणे. विकास ही प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारी प्रक्रिया आहे. 'विकास' हा शब्द जेव्हा सामाजिक घटनांमध्ये लागू केल्या जातो, तेव्हा तो 'उद्‌विकास' शब्दासारखा स्पष्ट अर्थ देत नाही. सामान्य प्रचलनात विकासाचा अर्थ कोणत्याही वस्तुच्या विस्तृत पैलूंना पुर्णपणे प्रकट करणे असा आहे. विकासाचे तात्पर्य गर्भावस्थेपासून मृत्यूपर्यंत कोणत्या निश्चित वेळेकडे त्या सतत होणाऱ्या परिवर्तनाशी आहे, जे व्यवस्थित आणि सुसंगत असते. विकास चिंतनाचे मुळ आहे. ही एक बहुमूखी क्रिया आहे. ज्यात केवळ शारीरिक अंगाचे विकासच नाही तर सामाजिक, सांवेगिक अवस्थांमध्ये होणारे परिवर्तनही समाविष्ट केल्या जाते. थोडक्यात सामान्य दृष्टीकोनातून विकासाचा तात्पर्य, गरीबीचा अंत, उत्पादकतेमध्ये वृद्धी आणि परिणामस्वरूप सामाजिक व व्यक्तीगत जिवनाच्या गुणवत्तेत सुधारणा होय.

**सामाजिक विकास :—** सामाजिक विकासाची धारणा सर्वप्रथम सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ हॉबहाऊस यांनी 1924 मध्ये लंडनहून प्रकाशित झालेल्या आपल्या 'सोशल डेव्हलपमेंट' या पुस्तकात मांडली. हॉबहाऊसच्या सामाजिक विकासाच्या संज्ञेवर जीवनशास्त्राचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

सोरेनसेन यांच्या मते, ''सामाजिक वृद्धी आणि विकास याचा तात्पर्य आपण दुसऱ्यांसोबत योग्यप्रकारे समोर जाण्याच्या प्रक्रियेशी आहे.''

विल्यम ऑगबर्नने लिहिले आहे की, ''प्रगतीचा अर्थ चांगल्याकरिता होणारे परिवर्तन असा आहे. म्हणून त्यात एक मुल्यात्मक निर्णय असणे आवश्यक आहे.''

**आर्थिक विकास :—** आर्थिक विकासाचा सामुहिक अर्थ आहे की, देशांच्या सर्व प्रकारच्या संसाधनाचा विस्तार करणे. ज्याच्या परिणामस्वरूप देशाची एकूण उत्पादकता आणि राष्ट्रीय उत्पन्नात वृद्धी केली जावू शकते. आर्थिक विकास एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. मायर आणि बाल्डविन यांच्या मते, ''आर्थिक विकास ही एक प्रक्रिया आहे की, जिच्यामुळे देशाचे वास्तविक दरडोई उत्पन्न दिर्घकाळात वाढते.''

आर्थर लेविस यांच्या मते,''आर्थिक विकास दरडोई उत्पन्नातील वाढ होय.''

आधुनिक काळात आर्थिक विकासाचा अर्थ व्यापक दृष्टीकोनातून केला जातो. आर्थिक विकास म्हणजे केवळ आर्थिक विकास नव्हे, तर त्यात मानवाचा सर्वांगिण विकास अभिप्रेत आहे. मानवाच्या केवळ भौतिक गरजा पूर्ण होणे महत्वाच्या नाहीत तर सामाजिक व सांस्कृतिक विकास होणे आवश्यक आहे.

**महिलांची स्थिती :—** भारतातील महिलांच्या सामाजिक स्थितीचे सविस्तर अध्ययन करण्याच्या दृष्टीने प्राचिन काळ, मध्ययुगीन काळ आणि आधुनिक काळ असे तीन काळ लक्षात घेणे अनिवार्य ठरते. कोणत्याही समाजाच्या सभ्यतेला समजण्याकरिता आणि त्याच्या उत्कर्षाचे मुल्यमापन करण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे त्या समाजातील स्त्रियांना दिले गेलेले स्थान आणि सन्मान यांचा अभ्यास करून यथास्थिती लक्षात घेणे आवश्यक असते.

**प्राचीन काळात महिलांचे स्थान :—** प्रारंभी काळात म्हणजे भ्रमण अवस्थेत स्त्रिची स्थिती पुरूषांप्रमाणेच समान होती. ज्या भौतिक व अभौतिक वस्तू होत्या त्यावर सामुहिक मालकी होती. कोणत्याच दृष्टीने स्त्री पुरूषांपेक्षा कनिष्ठ आहे असे मानल्या जात नव्हते. ऋग्वेद काळापूर्वी भारतात मातृप्रधान कुटूंबव्यवस्था होती भारतातील मुल निवासी नाग लोकांमध्ये मातृप्रधानता होती. वेदकालीन स्त्रिया विविध क्षेत्रात आपल्या व्यक्तिमत्व व कलाकौशल्य दाखविण्याचे अनेक दाखले आहेत. धार्मिक कर्मकांडात स्त्रिची भूमिका महत्वाची मानली जात होती. मनुस्मृती ही तर ''स्त्री निंदेची गाथा आहे.'' 'न स्त्री स्वतंत्र मर्हति' (स्त्रिला स्वातंत्र्य नाही) असे मनुने जाहीरच केले होते. स्त्रि कधीही स्वतंत्र होऊच नये म्हणून मनुने कायदाच केला होता.

बौद्धकाळात महिलांच्या स्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली. धार्मिक क्षेत्रात महिलांना उत्कृष्ट स्थान प्राप्त होऊ लागले. गौतम बुद्धाने शेकडो महिलांना बौद्ध धर्मात दिक्षा देण्याकरीता संघात प्रवेश दिला.

स्त्रिकडे पाहण्याचा दृष्टिकोनात सर्व धर्मात साधर्म्य आहे. आपल्याला जगायला मिळत आहे, दोन वेळेचा भाकरतुकडा मिळतो, हे स्त्रियांनी आपलं भाग्य मानले

पाहिजे आणि हे देणाऱ्या पुरूषाच्या उपकारात जगले पाहिजे, हाच स्त्रिचा जगण्याचा इतिहास आहे.

**मध्ययुगीन काळात महिलांचे स्थान** :– वेदाधिकाराला नकार आणि धर्मकर्माचा संचार यांमुळे शुद्राच्या बरोबरीने स्त्रिदेखिल मध्ययुगात शुद्रच ठरविली गेली. वेदकाळात विवाह व प्रजोत्पत्ती पुरूषाचे ध्येय आणि स्त्री म्हणजे ध्येय प्राप्तीचे साधन होते. मध्ययुगीन काळात बालविवाहाची प्रथा होती. या काळात 'कन्यादान' या प्रथेचा विपरीत अर्थ प्रचलित झाला. समाजातील उच्च हिंदू वर्गाने पडदा पद्धत खानदानीपनाचे चिन्ह म्हणून स्विकारले. सम्राट अकबरचा काळ वगळता मोगल काळात स्त्रिवरील बंधने वाढु लागली. बालविवाह, बहुपत्नी विवाह, सती जाणे, पूर्नविवाह न करणे यांसारख्या बाबींवर प्रतिबंध टाकण्याचे सम्राट अशोकचे ध्येय होते.

15 व्या शतकात स्त्रिच्या स्थितीत काही परिवर्तन झाले. रामानुजनच्या भक्ती आंदोलनामुळे महिलांच्या धार्मिक आणि सामाजिक जीवनात नवीन मूल्ये उदयास आली. चैतन्य, गुरूनानक, मीरा, कबीर, तुलसी, तुकाराम सारख्या संतानी महिलांकरिता धार्मिक पूजा अर्चाद्वारे धार्मिक स्वतंत्रतेचा मार्ग प्रशस्त केला. पडदा पद्धतीतही बरीच सुधारणा झाली. असे असले तरी महिलांच्या सामाजिक संरचनेत कोणतेच परिवर्तन झाले नव्हते.

**आधुनिक काळात महिलांची स्थिती** :– भारतात इंग्रजी राजवट येईपर्यंत महिलांचे स्थान हे मध्ययुगीन काळाप्रमाणेच होते. देशात स्त्री सुधारणेच्या दृष्टिने कोणतेच प्रयत्न करण्यात आले नाही असे नाही. आधूनिक काळात स्त्रियांच्या दयनिय परिस्थितीमध्ये सूधारणा करण्याचे प्रयत्न इंग्रज या देशामध्ये आले नसते तर कदाचित आजही स्त्रियांची परिस्थिती ही मध्ययुगीन काळासारखी असती असे विधान केल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

आर्थिक क्षेत्रात महिलांची निर्योग्यता सर्वाधिक होती. त्यांना कौंटूबिक संपत्तीत वाटा प्राप्त करण्याचा अधिकार नव्हता. महिलांद्वारा आर्थिक कार्य करणे एक अनैतिक कार्य समजल्या जात होते.

आधूनिक काळातील स्त्रिमध्ये शिक्षण, आधूनिकीकरण, नागरीकीकरण, सुचना प्रसार कार्यक्रम इत्यादींद्वारे व्यापक परिवर्तन दिसुन येत आहे. आज स्त्रिचा प्रत्येक क्षेत्रात संचार आहे.आजची स्त्री अंतराळात पोहचली आहे. तर देशाच्या सर्वोच्च पदावर पण रूढ झाली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या 69 वर्षानंतर सुद्धा आपल्या देशातील स्त्रियांपर्यंत विकासाची फळे पाहिजे त्या प्रमाणात पोहचू शकली नाहीत. ही दुर्देवाने सत्य स्थिती आहे. या 50 टक्के जनतेच्या व्यक्तीगत, सामाजिक, बौद्धिक विकास करण्यात अनेक सामाजिक, आर्थिक व राजकीय अडथळे आहेत.

**जलस्वराज्य प्रकल्प** : जलस्वराज्य प्रकल्पाची पार्श्वभूमी :– नियमित पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक सुविधा लोकांकरिता उपलब्ध करून देणे हे कोणत्याही राष्ट्राच्या शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. पाणी हे जीवन आहे तर स्वच्छता आरोग्यदायी व प्रतिष्ठेचे जीवन आहे. परंतु या पाण्यासाठीच आजपर्यंत देशाला स्वातंत्र्य मिळून 66 वर्षे होऊन देखिल या प्रश्नांची तिव्रता संपली नाही. त्यासाठी करोडो रूपये खर्च केले गेले. परंतु अपेक्षित फलश्रृती प्राप्त झाली नाही. पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अनुभवाअंती असे लक्षात येते की, शासकीय यंत्रणेची योजना गावांत कार्यान्वित होत असतांना आपुलकिच्या भावनेचा कायम अभाव असतो. या सर्व अनुभवातून समुदायाच्या लोकसहभागून पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राबविण्याचा एक अभिनव प्रयोग करण्याचे शासनाने निश्चित केले. या प्रयोगांतर्गत 1992–93 ला सरकारने बहुपक्षिय संस्था व गैरसरकारी संघटने (छळैं) च्या मदतीने लोकसहभागातून पाणी पुरवठा योजना राबविली. समुदायाची क्षमता बांधणीवर अधिक भर देऊन 990 योजनांपैकी 845 योजना पूर्ण झाल्यात आणि त्यापैकी 575 योजना लोकसहभागातून राबविण्यात आल्या आहेत, ज्या यशस्विरीत्या पार पडल्या.''

**जलस्वराज्य प्रकल्पाविषयी माहिती** :–

1) **जलस्वराज्य प्रकल्प** – जलस्वराज्य प्रकल्प हे महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे स्थानिक नांव आहे. हया प्रकल्पाचे उद्देश ग्रामीण लोकांना त्यांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने नियमित पाणी पुरवठा व्हावे हे आहे.

2) **जलस्वराज्य म्हणजे काय ?** जलस्वराज्य शब्दाची फोड खालीलप्रमाणे आहे. जल + स्व(च्छता) + राज्य. म्हणजेच गावांत पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेचे स्वराज्य निर्माण करणे. 'आमच गांव आमचं पाणी' आणि 'स्वच्छतेतून समृद्धीकडे' यातून ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार करणे. जल आणि

स्वच्छतेच्या लोकाभिमुख प्रकल्प अंमलबजावणीतून इतर ग्रामस्थांचे मुलभूत सुविधा स्वप्रयत्नातून प्राप्त करून घेण्याची गावाला सवय लावणे.

जागतिक बँकेच्या अर्थसाहयाने महाराष्ट्रात जलस्वराज्य प्रकल्प सुरू करण्यात आले, ज्याचे उद्देश शुद्ध पाणी, स्वच्छ गांव व महिलांचा विकास हे आहेत. सप्टे. 2003 मध्ये महाराष्ट्र शासनाने भारत सरकारसोबत जलस्वराज्य प्रकल्पाचा करारनामा होण्यापूर्वीच 3 जिल्हयात कार्यक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली होती. महाराष्ट्रातील जनतेवर जागतिक बँकेने टाकलेल्या विश्वासाचे हे प्रतिक आहे.

महाराष्ट्र राज्यात एकूण 26 जिल्हयांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला. यात भंडारा जिल्हयाचाही समावेश आहे. 18 ऑगष्ट 2004 ला राज्य शासन व भंडारा जिल्हा परिषदेने सर्वसमावेशक आर्थिक करार करून जिल्हयात हा प्रकल्प राबविण्यासाठी पहिले पाऊल टाकले. टप्पा 1 मध्ये 26 तर टप्पा 2 मध्ये 105 ग्रामपंचायतिची निवड करण्यात आली. यात 12 आदिवासी ग्रामपंचायतींचाही समावेश आहे.

**जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणारे उपप्रकल्प** :— जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत ग्रामीण विभागाचा विकास करण्याकरिता 1) क्षमता बांधणी आराखडा, 2) गावकृती आराखडा, 3) महिला सक्षमीकरण या उपप्रकल्पांचा प्रामुख्याने विचार केला जातो.

**संशोधन समस्येची निवड** — 'विकास' हा कोणत्याही समाजात फार महत्वपूर्व समजला जातो. भारत हा खेडयांचा देश आहे. भारतामध्ये 2/3 लोकसंख्या खेडयात वास्तव करते. गावाचा विकास हा पर्यायाने राष्ट्राचा विकास आहे. जवळपास निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. ग्रामीण भागातील महिला अशिक्षीत किंवा अल्पशिक्षित, रूढीवादी असतात. पुरूषांच्या अधिपत्याखाली असतात. त्यांच्यावर सामाजिक बंधने असतात. विकासाचा लाभ महिलापर्यंत पोहचत नाही. म्हणून शासनाचे हे प्रमुख कर्तव्य आहे की, महिलांकरिता विकास कार्यक्रम आयोजित करावे व त्याची अंमलबजावणी करावी. अशी परिस्थिती, योजना व कार्य करण्याचे वातावरण निर्माण करावे जेणेकरून महिला विकासाप्रती जागरूक होतील व आपला विकास करण्यास सामर्थ्यशाली होतील.

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने महाराष्ट्रात जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छतेची कामे लोकसहभागातून राबविल्या गेली. महिलांचा या योजनेमध्ये सहभाग व त्यातुन त्यांचा सामाजिक आणि आर्थिक विकास घडुन यावा याकरिता प्रस्तुत अध्ययनाचा संशोधनात अंतर्भाव केला.

**अध्ययनाचे उद्देश** :— 1) महिलांच्या कौटुंबिक व व्यावसायिक माहितीचा आढावा घेणे. 2) जलस्वराज्य प्रकल्पाचे उद्देश शुद्ध पाणी, स्वच्छ गांव व महिलांचा विकास या संदर्भातील महिलांच्या ज्ञानाबाबतच्या माहितीचे अध्ययन करणे. 3)क्षमता बांधणी प्रशिक्षणातून दिल्या गेलेल्या माहितीचा अभ्यास करणे. 4)जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत पाणी पुरवठा योजना व स्वच्छता योजनेमध्ये महिलांचा सहभाग व त्यातुन झालेल्या सामाजिक विकासाचे अध्ययन करणे. 5)ग्रामसभा, समितीसभा, साहित्य खरेदी जुळवाजुळव, देखभाल व दुरूस्ती व पाणी पट्टी वसुली यामध्ये महिलांचा सहभाग व त्यातुन त्यांच्या सामाजिक विकासाचे अध्ययन करणे. 6) प्रकल्पांतर्गत प्राप्त झालेला दर्जा व भूमिकेमूळे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राजकीय विकासाचा अभ्यास करणे.

प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र भंडारा जिल्हयातील ग्रामीण भाग असून संशोधनाचे विश्व 18 वर्षावरील सर्वच स्तरातील महिला आहेत. प्रस्तुत अध्ययनाकरिता गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतूक नमूना निवड हा उपप्रकार निवडला. प्रस्तुत अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्यसंकलन पद्धतीचा उपयोग केला गेला. प्रस्तुत अध्ययनात तथ्यसंकलन करण्याकरिता मुलाखत अनुसूची या तंत्राचा उपयोग करण्यात आला. अध्ययनाच्या दृष्टीने अन्य महत्वपूर्ण माहिती प्राप्त करण्याकरिता पुस्तके, अहवाल, शासकीय दस्ताऐवज इत्यादी दुय्यम तत्रांचा उपयोग करण्यात आला.

**निष्कर्ष**:— 1) जलस्वराज्य प्रकल्पात ग्रामीण महिलांनी सक्रिय सहभाग घेतल्यामुळे व उपप्रकल्प — 1 अंतर्गत क्षमता बांधणी विकास प्रशिक्षणामुळे स्वतःच्या व कुटूंबाच्या स्वास्थाविषयी महिला अधिक दक्ष झालेल्या आहेत. प्रशिक्षणात वारंवार दिल्या गेलेल्या शुद्ध पाणी व स्वच्छतेच्या माहितीमुळे बऱ्याच महिला क्लोरीन वडी, ब्लिचींग पावडर इत्यादीद्वारे नियमितपणे पाणी शुद्ध करून पित असल्याचे प्रमाण वाढलेले आहे. 2)जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत समितीसभा, ग्रामसभा, महिला ग्रामसभा, बचत गटाच्या सभा इत्यादीद्वारे ग्रामीण भागातील महिला सदैव एकमेकांच्या संपर्कात

येऊन विचारविमर्श करू लागल्यामुळे आपले विचार स्वतंत्र्यपणे व स्पष्टपणे मांडण्यासाठी त्यांना एक मंच वा विचारपीठ मिळालेला आहे व त्यातूनच सामाजिक संबंधामध्ये परिपक्वता निर्माण झालेली आहे. 3)जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत आयोजित केलेल्या अभ्यास सहलीत ग्रामीण महिलांनी सहभाग घेतल्यामुळे लोकसहभागाद्वारे ग्रामीण विकास साध्य होऊ शकते, असा आत्मविश्वास महिलांमध्ये निर्माण झाला आहे. 4)जलस्वराज्य प्रकल्पामध्ये उपप्रकल्प–1 अंतर्गत क्षमता बांधणी प्रशिक्षणामुळे नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात केले. महिला वैचारिकदृष्ट्या अधिक प्रगल्भ होत आहेत. 5) जलस्वराज्य प्रकल्पात सहभागी झाल्यामुळे महिलांना नवीन सुचना, कार्यक्रम, शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क व चर्चा, सहाय्यकारी संस्था व तांत्रिक सेवा पुरवठादाराचे मार्गदर्शन इत्यादीमुळे नवनवीन आशा–आकांक्षा निर्माण झाल्यात. आपण आपल्या स्वबळावर आपल्या आशा–आकांक्षा पुर्णत्वास नेऊ शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला. 6)प्रस्तुत अध्ययनात महिलांच्या स्वच्छतेबाबतच्या सवयीचे अध्ययन केले असता असा निष्कर्ष आहे कि, महिलांत पूर्वीपेक्षा स्वच्छेतेविषयी जागरूक झालेल्या आहेत. नियमित नखे कापणे, घरातील मुलांना जेवणापूर्वी हात धुण्याची सवय लावणे, शौचालयाचा वापर व उघडयावर शौचालयास जाणे बंद करणे, घरातील कचरा व्यवस्थापण, वैयक्तिक स्वच्छतेसोबत परिसर स्वच्छतेची दक्षता घेणे यासारख्या सवयी ग्रामीण महिलांत रूजलेल्या आहेत. 7) महिलांच्या आर्थिक विकासांतर्गत अध्ययन केले असता असा निष्कर्ष आहे की, बऱ्याच महिला बचत गटात समाविष्ट आहेत. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत महिला सक्षमिकरण समितीमार्फत कर्ज घेण्याचे प्रमाण महिलांत वाढलेले आहे व ज्यातून महिला व्यवसायात पैसा गुंतवणूक करीत असल्याचे दिसतात. 8) शिक्षण, प्रशिक्षण, नवीन सुचना कार्यक्रम, आधुनिकतेची ओढ यामुळे व्यवसाय करणाऱ्या महिलांना व्यवसायात फक्त भांडवलच महत्वाचे आहे असे वाटत नाही तर त्यासोबतच वैयक्तिक आणि सामाजिक मूल्यांचे जतन, कुटूंबियांचे सहकार्य, बचत, सामाजिक आंतरसंबंध, कल्पकता, बाजारपेठ, इत्यादी गोष्टीही महत्वाच्या वाटतात. व्यवसायाबाबत ग्रामीण भागातील महिलांच्या विचारसारणीमध्ये परिवर्तन झाले असल्याचे दिसते. धनसंग्रहीत करण्याची प्रवृत्ती महिलांमध्ये वाढलेली आहे. 9)ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याबाबत अध्ययन केले असता असा निष्कर्ष आहे की, आर्थिक देवाणघेवाण संबंधी, व्यवसायात लागणाऱ्या भांडवलासाठी कर्ज घेण्यासंबंधी, व्यवसायातील लहानसहान बदल करण्यास, एखादी वस्तु विकत घेण्यास महिला पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात स्वतंत्र आहेत. 10) स्वयंपाक करणे, जेवण वाढणे, कपडे, भांडी धुण्याची कामे इत्यादी परांपरागत असणाऱ्या महिलांच्या कार्यात यापूर्वी पतीचा कोणत्याही प्रकारचा सहभाग नव्हता. परंतु जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत ग्रामीण विकास कार्यक्रमात सक्रिय सहभाग, बचत गटात सहभाग, स्वयंरोजगार, सामाजिक–सांस्कृतिक व राजकिय सहभागामुळे ही प्रवृत्ती बदलत आहे. ज्या महिला सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय कार्यात सहभागी झाल्या आहेत, त्यांना पारंपारिक कार्यात सहकार्य करण्यात पतीचा सहभाग वाढलेला आहे. किंबहूना त्यापेक्षाही अधिक प्रमाणात सहकार्य अर्थोत्पादन करणाऱ्या महिलांना लाभते. 11) पाणी पुरवठा करतांना लोकसहभागातून योजना राबविण्याचे शासनाचे सुधारित धोरण आहे, ज्यात लोकवर्गणी फार महत्वाचा घटक आहे. परंतू पूर्वी गावागावातून प्रत्यक्ष लोकवर्गणी देण्याची मानसिकताच तयार झालेली नव्हती. जलस्वराज्य प्रकल्प राबविण्याकरिता महिलांना या प्रकल्पात विशेष स्थान दिल्यानंतर त्यांच्या सक्रिय सहभागामुळे तेथे लोकवर्गणी देण्याची अनुकूलता निर्माण होत असल्याचे आढळते.

---

**संदर्भग्रंथः–**


1. अलोनी, विवेक (2007). सामाजिक संशोधन पद्धती. नागपूर : साईनाथ प्रकाशन
2. अत्रे, श्री.ना. (1995). गावगाडा. पूणे : आर्यभूषण प्रिटींग प्रेस
3. आगलावे, प्रदिप (1997). आधूनिक भारतातील सामाजिक समस्या. नागपूर : विद्या प्रकाशन
4. आगलावे, प्रदिप (2000). संशोधन पद्धती व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन
5. इंगोले, प्रतिमा (1990). स्त्रीचे भावविश्व आणि आधूनिकता. दर्यापूर : सोनल प्रकाशन
6. कविमंडन, विजय (1976). विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन
7. कुलकर्णी, दिलीप (2003). विकास आणि जलावरण, सम्यक विकास. पुणे : राजहंस प्रकाशन
8. गौतम, एस.जी. (2002). प्रश्न पाण्याचा आपल्या सर्वांचा. नागपूर : साहित्य प्रसार केंद्र

9. मालसे, मिलिंद (1993). 'स्त्रीवादी समिक्षा' सैद्धांतिक चौकट. पूणे : श्री वाणी प्रकाशन
10. लांजेवार, ज्योती (2005). भारतीय समाज आणि स्त्री. पूणे : सुगावा प्रकाशन
11. Altekar, A.S. (1973). The position of women in Hindu civilization -from pre-historic times to the present day. Delhi: Motilal Banarasi Das.
12. Appadorai, A. (1959). Status of Women in south Asia Vol.-5. Calcutta: Orient Langman.
13. Beteille, A. (1975). The position of Women in Indian society. New Delhi: Publication division.
14. Das, M.B. (1976). The position of Women in Hindu civilization. New Delhi: Vikas publishing house.
15. Das, Frieda M.(1932). Purdah, The status of Indian Women. New York: Vanguand press

# भारतीय समाजव्यवस्था व कर्मचारी महिला

प्रा. राखी तुरस्कर, समाजशास्त्र विभाग प्रमूख, विदर्भ महाविद्यालय, लाखनी rakhimotghare74@rediffmail.com

समाजाची एक स्थायी संरचना असते. तशीच त्या समाजाची एक व्यवस्था असते. व्यवस्थेचा संबंध भूमिकांशी असतो. भारतीय समाजाची ही एक व्यवस्था आहे. या व्यवस्थेचा एकक व्यक्ती नसून कुटुंब आणि समूह आहे. व्यवस्था व सरंचनेचा एक घटक म्हणून कुटुंब महत्वाची भुमिका पार पाडीत आहे. भारतीय समाजाची संरचना, तिचे स्थायीत्व व तिचा शक्ती ही भारतीय कुटुंबाशी निगडीत आहे. पारंपरिक भारतीय कुटुंबात ज्या भूमिका आहेत त्या भूमिका पितृसत्ताक व पुरूषप्रधान संस्कृतीच्या संदर्भात निर्माण झाल्यात. कुटुंबाच्या संरचनेत पुरूषाची शक्ती व अधिकार हे निश्चित अधिक आहेत. यामुळे भारतीय समाजात कुटुंबातील एक घटक या नात्याने स्त्रीची भूमिका अतिशय मर्यादित झाली होती. 'चुल आणि मुल' एवढेच तिचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. तिची मुल्ये पुरूषाला श्रेष्ठत्व प्रदान करणारी व स्वतःला गौण समजणारी होती. भारतीय समाजावर धर्मग्रंथाचे प्राबल्य आहे. धर्मग्रंथानी स्त्रीला दुय्यम दर्जाची नागरिक म्हणूनच प्रत्यक्षामध्ये मान्यता प्रदान केली आहे.

कोणतेही समाज आणि काणतेही व्यवस्था स्थिर राहत नाही. ''निसर्गाप्रमाणेच मानव समाजात देखील परिवर्तन होत. असते. मानव समाज पूर्णपणे स्थिर नाही तर काळानुसार मानव समाजात परिवर्तन घडून येते. मानवी समाजाचे परिवर्तनशिलता महत्वाचे एक वैशिष्टय आहे. मानवी समाजाच्या परिवर्तनाची प्रक्रिया सतत सुरू असते. मानव समाजाच्या आचार, विचार संस्था, संघटन, जीवनपध्दती मध्ये सतत पतिवर्तन होत असतात. स्त्री आणि पुरूष ही समाज रथाची दोन चाके आहेत व दोन्ही चाके सबल असली तर हा समाजरथ व्यवस्थित चालतो याकरिता समाज प्रबोधनकारांनी समाजाचा रोष पत्करून समाजप्रबोधन केले. भारतीय समाजात राजाराममोहन रायॅ, महात्मा फुले, पाश्चिमात्य मुल्य, ब्रिटीशांनी राबविलेल्या सुधारणा व निर्माण केलेले कायदे आणि आंबेडकरांच्या नंतर इंदिरा गांधींनी भारतीय संविधानात घातलेली हिंदु कोड बिलाची भर यांनी या परिवर्तनाला खतपाणी दिले.

भारतीय समाजात प्रवेश केलेल्या पाश्चिमात्यांनी व आधुनिक मूल्यांनी भारतीय समाज व्यवस्थेत व संरचनेत बदल घडवून आणले. या परिवर्तनांनी स्त्रीयांच्या पारंपरिका भूमिका आणि कुटुंबसंस्थांशी संबंधित मुल्यामध्ये बदल घडवून आणला. कोणत्याही संस्थात्मक परिवर्तनामुळे संघटना, भुमिका आणि आशयामध्ये देखील परिवर्तन होत असते. कुटुंब संस्थेमध्ये, आर्थिक संस्थेमध्ये, राजकिय संस्थेत आलेल्या परिवर्तनांनी स्त्रीसाठी सर्व क्षेत्राची दारे उघडी केली. पारंपरिक समाजाने नाकारलेली तिचे हक्क व अधिकार तिच्या हातात पुन्हा स्थिर झालेत. घराच्या उंबरठयाच्या आत असलेली स्त्री आपल्या सृजनशिलतेसह आपली क्षमता व बुध्दिमत्ता सिध्द करण्यासाठी बाहेर पडली. या परिवर्तनामुळे नोकरी करणाऱ्या महिलांचा नवीन वर्ग उदयास आला. व्यक्ती जेव्हा आपल्या भूमिका बदलवितो तेव्हा त्या भूमिकेशी संबंधीत दर्जाही बदलवित असतो. यामुळे नोकरी करणाऱ्या स्त्रीयांची भूमिकेत परिवर्तन झाले तसेच दर्जामध्ये परिवर्तन झाले. व्यक्ती आपल्या आवश्यक गरजांची पूर्ती करण्यासाठी अनेक समुहामध्ये सहभागी होतात. समुहाच्या सदस्यत्वामुळे व्यक्तीला अनेक दर्जा प्राप्त होतात. आणि या दर्जाला अनुसरून भूमिका कराव्या लागतात. अनेकदा भूमिका व संबंधितांच्या अपेक्षा परस्परविरोधी असतात. त्यामुळे भूमिका संघर्ष निर्माण होते. नोकरी करणाऱ्या महिलांच्या समोरही बदलेला दर्जा व भूमिका संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. घराबाहेरील स्त्रीची भूमिका व घरातील

स्त्रीची भूमिका यांच्यातील विरोधाभास निदर्शनास आला. त्याचप्रमाणे पारंपरिक कुटुंबव्यवस्थेतील त्या कुटुंबाची मुल्ये आणि त्या मूल्यांच्या अनुषंगाने असणारा तिचा दर्जा यांचाही विरोधाभास लक्षात आला आहे. सामाजिक परिवर्तनाच्या संक्रमणात मुल्यसंघर्षाची परिस्थिती उद्भवते. यातून समस्या निर्माण होतात.

नोकरी करणाऱ्या स्त्रीया म्हणजे कर्मचारी महिला (working women) यांची व्याख्या खालीलप्रमाणे आहे. 'कर्मचारी महिला म्हणजे ज्या खासगी किंवा शासकिय क्षेत्रात काम करतात, ज्यांना कायद्याप्रमाणे पुर्ण पगार मिळतो आणि ज्या कायद्याप्रमाणे कर्मचाऱ्यांसाठी असणाऱ्या संपूर्ण सवलतींचा उपयोग घेऊ शकतात.' नोकरी करणाऱ्या महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन व समस्या ह्या त्यांच्या भूमिका, मुल्ये व दर्जाशी जुळलेल्या आहेत. आधुनिक समाजात माहिती तंत्रज्ञानाच्या युगात महिलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलला आहे. भारतीय समाजावर भारतीय संस्कृतीचा प्रभाव असल्याने भारतीय समाजात तळागाळात रूजलेली संस्कृतिक मूल्यामुळे स्त्रीयांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन काही अंशी पारंपारिक व उपभोग्यवादी आहे. ग्रामीण समाजात पारंपारिक दृष्टीकोन अद्यापही कायम आहे. महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले परंतु कुटुंब संस्था व विवाह संस्थेत भारतीय स्त्रीयांच्या दर्जा व भूमिका पारंपारिक आहे. त्यात अपेक्षित परिवर्तन घडून आलेले नाही. ''स्त्रियां आजही वेठिच्या मजुर किंवा गुलाम असून त्या कुटुंबाच्या बंदिवान आहेत.''

''स्वांतंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आपल्या घटनेनुसार लोकशाही राज्यव्यवस्था व समाजवादी समाजराचना मान्य केली असून वंश, लिंग, धर्म निरपेक्ष, सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य व शोषणरहितता हे त्यांचे मुलभूत हक्क म्हणून मान्य केले आहेत. 15 व्या कलमानुसार स्त्री व पुरूष असा कोणताही भेद भारत राज्य करणार नाही असे स्पष्ट करण्यात आले. यामुळे आर्थिक, सामाजीक व राजकिय क्षेत्रात भारतीय स्त्रीया बरोबरीचा दर्जा उपभोगित आहेत.'' स्त्रीया आर्थिक उत्पादन व सेवा विभागात सहभागी झाल्याने त्यांच्या कुटुंबाचा आकार बदलेला आहे. सयुक्त कुटुंबाची जागा विभक्त कुटुंबाने घेतली आहे. तिचा कौटुंबिक दर्जा वाढलेला आहे. त्याचप्रमाणे कुटुंबाचा आर्थिक दर्जा सुध्दा वाढलेला आहे. आर्थिक निर्णय प्रक्रियेत तिच्या मतांना महत्व प्राप्त झाले आहे. तिच्या विचारात व राहणीमानात बदल झालेला असून तिचा आर्थिक दर्जा उंचावलेला आहे. समाजाच्या पारंपारिक दृष्टीकोनात परिवर्तन झालेले असून आज समाज नोकरदार महिलांकडे आदराने व सन्मानाने पाहत आहे. समाजात नोकरदार स्त्रीयांचा दर्जा वाढलेला आहे. यातून काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. आधूनिक काळातील स्त्रीयांचा संघर्ष हा एकाच वेळेस पारंपरिक संस्कृतीशी आणि बदलणाऱ्या परिस्थितीशी समायोजनाचा संघर्ष आहे. स्त्रीयांना ज्या वेगाने नवीन मुल्यांशी समायोजन करून घ्यावे लागणार आहे. तितक्याच वेगाने पारंपारिक मुल्यांशी लढावे लागणार आहे.

नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना कुटुंबात, समाजात व ज्या आस्थापनेत काम करित आहेत त्याठिकाणी अनेक समस्यांना सामोरी जावे लागते. नोकरदार महिलांना सन्मान मिळतो, प्रतिष्ठा मिळते. कधीकधी पुरूषी मानसिकता व अहंकाराला बळी पडावे लागते. मुंबईतील केईएम रूग्णालयातील परिचारिका अरूणा शानबाग हि पुरूषी अंहकारिकतेला बळी पडली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कॉलसेंटरमध्ये महिला कर्मचारी वर्ग मोठया प्रमाणात आहे. तेथे रात्रकालीन डयुटी करावी लागते अशावेळी अनेक अन्याय व अत्याचाराच्या घटना महिला नोकरदाराविषयी घडले आहेत. यामुळे नोकरदार महिला आर्थिक दृष्टया स्वावलंबी आहेत. त्यांच्यातील गुणवैशिष्टयांची सामाजिक प्रगतीकरिता हातभार लागला आहे. तसेच भारताच्या आर्थिक विकासात महिला नोकरदार वर्गाचे योगदान महत्वाचे आहे. तरीही महिला सामाजिक दृष्टया पुर्णपणे स्वतंत्र नाही एक स्त्री म्हणून सामाजिक दडपण आहे. संस्थात्मक दडपण आहे. स्त्रीया डॉक्टर, इंजिनियर, वैमानिक, प्रशासकीय अधिकारी, शास्त्रज्ञ, प्राध्यापिका, शिक्षक इतर क्षेत्रात गेल्या असल्या, आपली भूमिका उत्तम पार पाडत असल्या तरी यात काही उणेपणा आहे, ज्यामुळे नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रश्न सातत्याने तोंड वर काढत असतात.

नोकरी करणाऱ्या महिलांसमोर अनेक समस्या निर्माण होतात. कौटुंबिक समस्या महिलांपुढे निर्माण होते. प्रत्येक कर्मचारी महिलांसमोर मुलांच्या सामाजिकरणाची समस्या दिसुन येते. लैंगिक गरज ही स्त्रीपुरूषांची मुलभूत प्रवृत्ती आहे. कार्यालयातून आल्यानंतर महिलांची स्थिती थकल्यासारखी असते.

शारीरिक थकव्यातून लैंगिकतेची समस्या निर्माण होते. पतीच्या मर्जिविरूध्द पैसा खर्च करण्यात आजही भारतीय स्त्री घाबरते यामुळे आर्थिकदृष्टया स्वावलंबी असुनही पारंपारिक दडपण आहे.

भारतीय घटनेने स्त्री पूरूष समानतेला मान्यता दिली आहे तरी भारतीय समाज मात्र महिलांच्या भुमिकांमध्ये व कार्यक्षेत्रामध्ये काटेकोरपणे फरक करतो. यामुळे सामाजिक दृष्टीकोनातील परिवर्तन अपेक्षित पातळीपर्यंतचे दिसुन येत नाही. नोकरी करणाऱ्या महिलांच्या कार्यलयात व कारखान्यात अधिकारी पुरूष वर्ग स्त्रीयांच्या दुबळेपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. यातून सावध राहून काम करावे लागते. यासर्व समस्यांचे, समायोजन करून नोकरी करणाऱ्या महिला आपले कार्य पूर्ण करित आहेत. समाजाचे व कुटुंबाचे पाठबळ नोकरी करणाऱ्या महिलांना मिळत आहे.

**संदर्भ :–**

1. Sharma Belarani, Women marriage family, Violence, Mangaldeep pub.1997
2. डॉ. आगलावे प्रदिप, समाजशास्त्रीय संकल्पना आणि श्री साईनाथ प्रकाशनए नागपूर
3. मायी सुनिल, भारतीय सामाजिक समस्या, अंशुल पब्लिकेशन, नागपूर 1998
4. Gadgil D. R., Women in the working force in India, 1965
5. साने गीता, स्त्री आणि कुटुंबसंस्था–स्त्री मुक्तीच्या दिशेने, संपुर्ण प्रंकाशन, पुणे
6. हाटे चंद्रकला, स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री, म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1985.

## 'यवतमाळ जिल्हयातील आदिवासी समाजातील कुमारीमातांच्या समस्या'

**प्रा. श्रीराम किसन खाडे**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य महाविद्यालय, मारेगांव जि. यवतमाळ

प्रस्तावना :– भारतीय समाजात वैदिक काळापासून हिदूं संस्कृतीने स्त्रीला शक्तिचे प्रतिक मानले आहे. आपल्या समाजात स्त्री ची दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती या रुपात आराधना केली जाते. स्त्री अभावी पूरुष अपुर्ण मानला असून तिला अर्धांगींनी म्हणून बरोबरीचा दर्जा दिलेला दिसतो. वैदिक व उत्तर वैदिक काळात स्त्रिचा सामाजिक दर्जा बराच वरचा होता.[1] त्याकाळी मुलींना शिक्षणासाठी गुरुगृही पाठवीत असत. स्वतःच्या पतीची निवड स्वतः करणारी सावित्री त्या काळात होती. सती प्रथा, पडदा पध्दती नव्हती. स्त्री मोकळेपणाने वावरत असे. कालांतराने तिचे अनेक अधिकार हिराऊन घेतले गेले व मध्ययुगात तिची स्थिती अत्यंत दयनीय झाली. 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्याचे अनेक प्रयत्न झालेत. स्त्रियांवर लादलेल्या अनेक अव्यावहारीक बंधनांची जाणीव समाज सुधारकांना याच काळात झाली. याच काळात प्रगतीशिल लोकांच्या विचारात अनेक कारणांनी बदल झाला. पाश्चात्य समाजातील स्वातंत्र्य व समानतेच्या तत्वाने प्रभावित होऊन सामाजिक परिस्थितीचा विचार होऊ लागला. राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राम्हो समाजाच्या प्रयत्नांनी सती प्रथा कायद्याने बंद केली व पुनःर्विवाहाचे प्रयत्न केले. याच शतकात भारतात महात्मा फुंले व सावित्रीबाई फुले यांच्या विशेष प्रयत्नामुळे स्त्री शिक्षणाचा प्रसार झाला. शाळा, महाविद्यालये स्थापन झाली व त्यामधून स्त्रियां शिक्षण घेऊ लागल्या. तथापी स्त्रियांच्या बाबतीतला हा बदल फक्त शहरी क्षेत्रातच दिसून येऊ लागला. ग्रामीण क्षेत्रातील स्त्रियांच्या बाबतीत मात्र या काळात कोणताही बदल झाला नाही. स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी पंडीता रमाबाईचा काळ उल्लेखनीय आहे. तर 20 व्या शतकात सिस्टर निवेदीता, ॲनी बेझंट, मार्गारेट या पाश्चात्य महिलांनी भारतातील स्त्री मुक्ती आंदोलनास गती दिली व स्त्रियांचा सामाजिक दर्जा उन्नत करण्यास पूरुषांच्या बरोबरीने प्रयत्न केलेत.[2] स्वातंत्र्य प्राप्ती नंतर मात्र स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न झालेत. स्त्रियांच्या मुक्तीसाठी अखिल भारतीय महिला परिषद स्त्रियांवरील अन्याय दूर करण्यासाठी निर्माण झाली. मात्र स्वातंत्र्य चळवळीने स्त्रियांची सामाजिक व धार्मिक बंधनातून सुटका केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी सुध्दा पूरुषांच्या बरोबरीने सहभाग घेतला.भारतातील स्त्रियांची ही चळवळ स्त्री जाणिवेच्या

दृष्टीकोणातून महत्वाचा टप्पा होता. परंतू असे असले तरी, स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या 65 वर्षाच्या काळात भारतीय स्त्रियांच्या दर्जात बराच बदल झाला असला तरी हा बदल मुख्यतः शहरी क्षेत्रातील स्त्रियांच्या संदर्भातच झालेला दिसून येतो. ग्रामीण क्षेत्रात स्त्रियांची स्थिती आज ही जशी होती तशीच आहे. त्यात ही आदिवासी समाजातील स्त्रियांची स्थिती अत्यंत शोचनिय आहे.

**यवतमाळ जिल्हयातील आदिवासी समाजातील स्त्रियांची स्थिती** :– आदिवासी समाजातील स्त्रियांच्या सामाजिक स्थानांचा व दर्जाचा विचार करतांना सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक अशा चार दृष्टीकोणातून करण्यात येतो. अर्थात या चार घटकांवरच आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा अवलंबून आहे असे नाही. वरील चार घटकांपैकी एखादाच घटक एखाद्या समाजात आढळून येतो. किंवा चार पैकी चारही घटक एखाद्या समाजात आढळून येतील. परंतु या घटकांवर नाही तर या घटकांच्या संदर्भात स्त्रियांना सहभाग घेण्याची व कार्य करण्याची संधी कितपत मिळते यावर आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा अवलंबून असतो. उदा. वरील चारही क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग जेव्हढा कमी असेल तेवढा स्त्रियांचा दर्जा ही कनिष्ठ प्रतीचा असतो. थोडक्यात, आदिवासी समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील स्त्रियांच्या सहभागावरून त्यांचा दर्जा किंवा स्थान ठरविले जाते.

**आदिवासी समाज आणि कुमारीमातांची समस्या** :– भारतीय समाज संरचनेत आदिवासी समाज एक महत्वाचा घटक आहे. स्वातंत्र्याच्या 65 वर्षानंतरही आदिवासी समाज इतर शहरी समाजापेक्षा आज ही वेगळा आहे. आधुनिककाळात औद्योगीकरण, शहरीकरण व आधुनिकिकरणाच्या प्रक्रियेमूळे आदिवासी भागात ही दळणवळणाची साधने वाढलीत. अगदी ग्रामपंचायतपर्यंत शासकीय व्यवस्थापन ही आदिवासीपर्यंत काही प्रमाणात पोहचले. प्राथमिक शाळा, आश्रमशाळा, आरोग्यकेंद्रे, समाजकल्याणाच्या शासकीय योजनाही आदिवासीपर्यंत काही प्रमाणात पोहचल्यात. परंतू या सर्व गोष्टींचा लाभ आदिवासी समाजाला पाहिजे तसा झाला नाही. आजही आदिवासी समाजाची जीवनपध्दती फारशी बदलली नाही. त्यांचा जीवन संघर्ष आहे तसाच आहे. त्यांच्या रूढी व परंपरामध्ये त्यांचे जीवन नियंत्रित झाले आहे. आदिवासी समाज अडाणी आणि बंदिस्त मानसिकतेचा असल्यामूळे व्यापारी, सावकार, ठेकेदार यांच्याकडून त्यांची प्रचंड पिळवणूक आणि फसवणूक होत आहे. आदिवासींचा संबंध उर्वरीत जगाशी फार कमी प्रमाणात येतो. कारण त्यांच्यात भरपूर न्यूनगंड आहे. इतर समाजातील लोकही त्यांच्याशी सद्भावना, सहकार्य, मैत्री या भावनेतून देवाण–घेवाण करीत नाही. त्यांना त्यांचे मालकीहक्क देत नाहीत. त्यांना सामावून घेत नाहीत. त्यांची व्यसनाधीनता, वाईट चालीरिती, इतरांना न समजणारी भाषा, त्यांचे हे सारे दोष दूर करण्याचा ख–या अर्थाने प्रयत्नच होत नाहीत. उलट त्यांचे अधिकाधीक शोषण कसे करता येईल याचाच सर्वजण प्रयत्न करीत असतात. आदिवासीमध्ये स्त्रिया आणि मुलींचे लैंगिक शोषण मोठया प्रमाणात आहे आणि म्हणूनच आदिवासी समाजात कुमारी मातांची समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाल्याचे दिसते.

भारतीय समाजातील अंधश्रध्दा, प्रथा, परंपरा, चालीरिती इत्यादींच्या माध्यमातून स्त्रियांचे लैंगिक शोषण केले जाते. या अंधश्रध्दांना धर्माचा आधार असतो. यातूनच देवदासी, मुरळी इ. देवांना वाहिलेल्या स्त्रिया त्या त्या देवालयाच्या परिसरात वावरत असतात. त्याच भागातले श्रीमंत लोक किंवा मंदीरातील पुजारी धर्माच्या नावांवर यांचे लैंगिक शोषण करीत असतात. काही आदिवासी समाजात त्यांच समाजाचे पुढारलेले लोक आदिवासी मुली व स्त्रियांचे लैंगिक शोषण करतात. अलीकडे आदिवासी समाजात इतर लोकांची वेगवेगळया कारणाने ये जा सुरू झाली. असे लोक ही स्वतःच्या वासनापूर्तीसाठी आदिवासी मुलींना वापरू लागले आहेत. या लैंगिक संबधातून अशा मुलींना पुढे गर्भधारणा होवून मुल होते. त्या मुलांबदद्ल या समाजात फारसा विधिनिषेध नसतो. परंतू या आदिवासी मुलींचे विवाह होत नाहीत. त्या तरूण असेपर्यंत लैंगिक समाधानाच्या मोबदल्यात त्यांना काही आर्थिक मदत तिथलेच लोक करतात. पण या मुलांना नियमित बाप मिळत नाही आणि मग या कुमारीमाता स्वतःच्या आणि मुलांच्या दैनंदिन व्यवहारासाठी कुण्यातरी पुरूषाचे नाव बाप म्हणून लावतात. अशाप्रकारच्या कुमारीमातांसाठी कोणत्याच मान्यताप्राप्त प्रथा किंवा धर्माचा आधार नसतो. परंतू त्या तिथल्याच लोकांकडून शोषण झालेल्या आणि नंतर इतरांनी वापरलेल्या कुमारीमाता असतात. त्या

मुळातच गरीब आणि अशिक्षित असतात. कुमारीमाता झाल्यामुळे त्यांच्याच समाजात त्यांची सतत अवहेलना होते. आदिवासी समाजातील या कुमारीमातांकडे बघण्याचा समाजाचा अपमानीत दृष्टीकोण, त्यांच्या मुलांची होणारी हेळसांड हे प्रश्न ख–या अर्थाने सोडविले जात नाही. या कुमारीमातांची नोंद शासन दरबारी सन्माननीय होत नाही. त्या अत्यंत गरीब असूनही त्यांना दारिद्रयरेषेखालचे कार्ड दिले जात नाही. त्यांच्याजवळ रेशनकार्ड नाही. त्यांच्या मतदानाची नोंदही नाही. फक्त मुलाला बापाचे नाव हवे म्हणून त्या एखादे काल्पनिक नाव घेवून मुलांच्या बापाची नोंद करतात. या कुमारीमातांनी अशाप्रकारे जगणे या देशातील लोकशाहीला लांच्छनास्पद आहे.

**'कुमारीमाता' संकल्पनेचा अर्थ** :– भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्थेला एक विशेष महत्व आहे. तसेच भारतीय कुटुंबसंस्थेत स्त्रीबाबत विवाहाला आणि मातृत्वाला अनन्यसाधारण महत्व दिले आहे. स्त्रीच्या बाबतीत विवाह सक्तीचाच असतो. या वैवाहिक जीवनातूनच लैंगिक समाधानाची अनुभूती स्त्रीने घ्यायची असते. तिच्याबाबत विवाहबाहय संबध मूल्यव्यवस्थेत बसत नाही आणि तिचे लैंगिक समाधानसुध्दा प्रजोत्पादनासाठीच असते. म्हणूनच एक पुरूष, एक स्त्री अशाच दोन व्यक्तींचा विवाह होतो. त्यांचे लैंगिक जीवन व त्यांचे समाधान हे सर्व प्रजोत्पादनाशी जोडलेले असते ज्यातून वंश सातत्य सांभाळले जाते. स्त्रियांच्या बाबतीत मातृत्वाला विशेष महत्व आहे. भारतीय संस्कृतीत मातृत्वाचे अनेक गोडवे गायले जातात. जसे मातृत्वाशिवाय स्त्रीला पूर्णत्व नाही, मातृत्व हेच स्त्रीचे सर्वात मोठे कर्तव्य व समाधानही समजले जाते. यासाठीच विवाहित स्त्रियां मातृत्वासाठी व्रतवैकल्ये, पूजाअर्चा, उपवास, नवस या सर्व गोष्टी करीत असतात. कारण मातृत्वाशिवाय स्त्रीच्या जगण्याला अर्थ नसतो. मातृत्वामूळेच कुटुंबात स्त्रीचा मान वाढतो, मातृत्वामूळेच स्त्रीचा कुटुंबात मानसन्मान केला जातो, तिची पूजा केली जाते. परंतू या सगळया गोष्टी तेव्हाच होतात जेव्हा स्त्रीला हे मातृत्व विवाहातून मिळते. विवाहातून मिळालेले मातृत्व हे एक वरदान समजले जाते. जी स्त्री माता होवू शकत नाही तिला वांझोटी समजली जाते. याचाच अर्थ मातृत्व हे स्त्रीला विवाहाच्या अंर्तगत एका पुरूषाकडून मिळाले पाहिजे असा भारतीय समाजात दंडक आहे. याउलट विधवा आणि कुमारीकांना प्राप्त विवाहाशिवाय प्राप्त झालेले मातृत्व हे कलंकित मातृत्व समजले जाते. विवाह न करता प्राप्त झालेले मातृत्व शाप समजले जाते आणि अशा कुमारीमातांना समाज व्यभिचारीणी ठरविते. थोडक्यात, ज्या मुलींना विवाहाच्या आधी इतर पुरूषांबरोबर ठेवलेल्या लैंगिक संबधातून अपत्यप्राप्ती होते अशा मुलींना 'कुमारीमाता' असे म्हटले जाते.

भारतीय समाजात 'माता' या शब्दाभोवती एक आदर्श व्यक्तिमत्वांच वलय तयार झालेल आहे. आई आणि मूल हे जगातल सर्वात पवित्र नांत आहे, अस मानलं जात. परंतू याच शब्दाला आधी 'कुमारी' हा शब्द जोडला गेला की त्याचे सगळे संदर्भ बदलून जातात. विवाह न करता किंवा विवाहाच्या आधी प्राप्त झालेल मातृत्व अपवित्र मानल जात. विवाहाशिवाय स्थापित झालेले लैंगिक संबध हे अनैतिक मानले जातात. जाती–धर्माचे नियम मोडणारं अस हे बेकायदेशीर कृत्य समजल जातं. घराण्याला काळिमा लावणारी, कुटुंबाची प्रतिष्ठा घालवणारी अशी ही घटना ठरते. कुमारीमातेच मुल देखील समाज स्वीकारायला तयार होत नाही. अशा मुलांना 'अनौरस' ठरविल्या जाते आणि त्या मुलालाही समाजाची हेटाळणी सहन करावी लागते.

भारतीय समाजात 'कुमारीमाता' ही संकल्पना अगदीच नवीन नाही. प्राचिन काळातही कुमारीमातांचा प्रश्न होता. या संदर्भात महाभारतातील कुंती ही भारतीय समाजातील पहिली कुमारीमाता समजली जाते. कुंतीला दुर्वास ऋषीने वशीकरणाचा एक मंत्र दिला होता. 'या मंत्राने तू ज्या ज्या देवाला बोलावशील त्या त्या देवाच्या प्रभावाने तुला पुत्रप्राप्ती होईल' असा वर दिला होता. या मंत्राची प्रचिती पाहण्याच्या जिज्ञासेने, लालसेने कौमार्यावस्थेतील कुंतीने मंत्रचा जप करून सूर्यास बोलाविले. सूर्यापासून तिला कवचकुंडलयुक्त असा 'कर्ण' हा मुलगा झाला. परंतू लोकांच्या भीतीमुळे तिने त्याला अश्वनदीत सोडून दिले. महाभारतातील कुंतीचे आयुष्य जसे एका राजमातेचे आहे, तसेच ते एका सामान्य स्त्रीचेही आहे. तिच्या आयुष्यातील ती कुमारी असतांना तिला जगावे आणि भोगावे लागलेले मातृत्व भिषण आहे. अशाप्रकारच्या कुंती आजही भारतीय समाजात मोठया प्रमाणात आढळून येतात.

ग्रामीण व शहरी समाजापेक्षा कुमारीमातांचे प्रमाण आदिवासी समाजात कितीतरी जास्त आहे. कारण

आदिवासी समाजातील कुटुंबसंस्था व विवाहसंस्था इतर समाजापेक्षा थोडी वेगळी आहे. काही आदिवासी जमातीत विवाहपूर्व लैंगिक संबध ठेवण्याचे स्वातंत्र्य आहे. विवाहपूर्व लैंगिक संबधाबाबत आदिवासी लोक फारसे संवेदनशिल नाहीत. 'कोव्याक नागा' जमातीत विवाहापूर्वी झालेल्या मुलाला घेवून स्त्री आपल्या पतीच्या घरी जावू शकते. हे मूल दुस–याचे आहे हे माहित असूनही त्यांच्यात संघर्ष होत नाही. मध्य भारतातील काही आदिवासी जमातीतही विवाहपूर्व लैंगिक संबध ठेवले जातात. यासारख्या प्रथा बरोबरच आज आदिवासी समाजाचा इतर समाजाशी मोठया प्रमाणात संपर्क येत आहे. सावकार, व्यापारी, ठेकेदार, शासकीय कर्मचारी यांचा आदिवासी क्षेत्रात वावर वाढला आहे. आदिवासी मुलींच्या गरीबीचा, त्यांच्या भोळेपणाचा फायदा हे लोक घेत आहेत. त्यांचे लैंगिक शोषण करीत आहे आणि यामूळेच आदिवासी समाजात कुमारीमातांची समस्या निर्माण झाली आहे. सुनिता शर्मा आणि अमरेंद्र किशोर[3] यांनी ओरिसा राज्यात केलेल्या एका सर्वेक्षणात ओरीसा मध्ये आदिवासी समाजाच्या जवळपास 40 हजार कुमारीमाता असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले आहे. तसेच पांढरकवडा येथील फुले–आंबेडकर महिला प्रबोधीनीच्या प्रा. लिला भेले[4] आणि महिलांच्या समस्यांच्या अभ्यासक डॉ. सिमा साखरे यांनी झरी–जामणी तालुक्यात केलेल्या कुमारीमातांच्या सर्वेक्षणात त्यांना आदिवासी समाजाच्या जवळपास 200 कुमारीमाता आढळून आलेल्या आहेत.

झरी–जामणी हा यवतमाळ जिल्हयातील एक आदिवासी तालुका असून 2011 च्या जनगणनेनुसार या तालुक्याची एकूण लोकसंख्या 80,147 असून त्यात 40,364 पुरूष व 39,783 स्त्रियां आहेत. जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येत आदिवासींची लोकसंख्या 30,953 इतकी असून त्यात 15,408 पुरूष व 15545 स्त्रिया आहेत. तालुक्याच्या एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 38.62 टक्के इतके आहे. 2011 च्या जनगणनेच्या आधारावर झरी–जामणी तालुक्यात लहान–मोठी एकूण 104 गांवे आहेत. या प्रत्येक गावात आदिवासींचे वास्तव्य आहे. उपरोक्त एकूण गावांपैकी 56 आदिवासींचे 'पोड' आहेत. आदिवासींचे हे 'पोड' डोंगर द–यात वसलेली आहेत. काही 'पोड' तर अत्यंत घनदाट जंगलात आहेत. जिथे जाण्यासाठी कोणतेही साधन नाही. झरी–जामणी तालुक्यातील जंगलात मोठया प्रमाणात वनौषधी आहे. तेंदुपत्ता, मोहफुले, बिबाची झाडे, साग, सालई, कडूलिंब, चिंच, बेहडा, आंबे, बाभळी, बगेरी इत्यादी झाडे मोठया प्रमाणात आहेत. झरी–जामणी तालुक्यात गोंड, कोलाम, परधान, गवाठी, धनगर, वंजारी, वाळसंतोषी, मसानजोगी, गोंधळी, मरार, मांडवी जातीचे लोक मोठया प्रमाणात वास्तव्य करतात. दारिद्रयासोबतच शिक्षणाचा अभाव, प्रचंड अंधश्रध्दा आणि व्यसनाधिनता यामुळे येथील लोक अत्यंत मागासलेले आहेत. शिक्षणाच्या सोयी असूनही शिक्षणाविषयीची अनास्था प्रचंड आहे. त्यामूळे शेजारी सुधारलेली गांवे असुनसुध्दा येथील जीवन त्यांच्या प्रगतीपासून कोसो दूर आहे. जंगलातील मोकळया जागेवर या आदिवासींच्या काही जमीनी आहेत. तेथे काही प्रमाणात कापूस, सोयाबीन, ज्वारी, मिरची, तूर, गहू यांचे पीक निघते. परंतू सिंचनाच्या सोयी नसल्यामूळे येथील आदिवासी शेतकरी नेहमीच दारिद्रयात राहतात. यामूळेच या भागातील बहुतांश लोक मोठया प्रमाणात शेतमजूर, विटाभटटीत किंवा चुनाभटट्रीत काम करणारे मजूर आहेत. काही लोक मजूर म्हणून जवळच्या शहरात काम करण्यासाठी जातात तर थोडे बहुत शिकलेले तरूण जवळच्या शहरातील कापड दुकानात किंवा हॉटेलात काम करतात.

झरी–जामणी तालुक्यात दारिद्रय भरपूर आहे. तथापी शासनाच्या विविध योजनांमूळे धान्य मात्र कमी किंमतीत मिळते. त्यामूळे त्यांचा जगण्याचा प्रश्न सुटतो. या दारिद्रयातच जगण्यापूरते अन्न मिळवून हे आदिवासी परिस्थितीशी घटट् बांधले गेले आहेत. येथील सामाजिक, आर्थिक आणि रोजगारविषयक प्रश्न फार भयंकर आहेत. पण त्यांची श्रमशक्ती शहरातील लोक वापरतात. त्यांनी कष्टाने तोडून आणलेल्या तेंदूपत्त्यावर व्यापारी मोठे होतात. पण येथील आदिवासी अहोरात्र मेहनत करूनही दारिद्रयातच खितपत पडलेले राहतात. त्यांच्या स्त्रिंया आणि बारा वर्षापासूनच्या मुली एकएकटया जंगलात कामाला जातात. त्या एकटया असुरक्षित असतात. गावातही दारिद्रयात पुरूषांपेक्षा त्या अधिक असहाय असतात. त्यातूनच त्यांच्या लैंगिक शोषणाच्या समस्या सुरू होतात आणि यातूनच कुमारीमातांची समस्या जन्म घेते.

प्रा. लिला भेले[5] यांनी केलेल्या सर्वेक्षणात झरी–जामणी तालुक्यातील 32 पोड या कुमारीमातांच्या समस्येने ग्रस्त असलेले आढळले. तर डॉ. सिमा

साखरे[6] यांनी केलेल्या संशोधनात त्यांना झरी–जामणी तालुक्यातील 22 पोड या समस्येने ग्रस्त असलेले आढळले. अलीकडे मात्र हा आकडा वाढला आहे. आज झरी–जामणी तालुक्यातील एकूण 56 पोड कुमारीमातांच्या समस्येने ग्रस्त असलेले दिसतात. शासकीय आकडेवारीनुसार 2008–09 ला झरी–जामणी तालुक्यात कुमारीमातांची संख्या जवळपास 100 असल्याचे दर्शविले जाते. डॉ. सीमा साखरे यांनी 2011 मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार संपूर्ण यवतमाळ जिल्हयात 183 कुमारीमाता होत्या. त्यात सर्वाधिक 113 कुमारीमाता एकटया झरी–जामणी तालुक्यातील होत्या असे निदर्शनास आले.[7] आज ही संख्या 200 ते 250 पर्यंत पोहचलेली आहे. प्रा. लिला भेले यांच्या सर्वेक्षणानुसार जवळपास 95 टक्के पेक्षा जास्त आदिवासी कुटुंबातील किशोरवयीन मुली त्यांच्या दारिद्रयामुळे, निरक्षरतेमुळे आणि भावनाविवशतेमुळे लैंगिक शोषणाला बळी पडतात. त्यांच्यापैकी सर्वच कुमारीमाता होत नसल्या तरी त्यांचे लैंगिक शोषण मात्र कधी त्यांच्याच वस्तीतील आर्थिक परिस्थिती बरी असलेल्या किंवा कोणत्यातरी प्रकारे सत्ता मिळविलेल्या, कधी विवाहीत तर कधी अविवाहीत असलेल्या पुरूषांकडून होत असते. या पोडांवर बरेचसे बाहेरच्या शहरातून येणारे व्यापारी, विक्रेते ये–जा करीत असतात. गावातील तरूण मुलेसुध्दा शेजारच्या शहरात खाजगी कामावर जातात. त्यांच्याकडे येण्या–जाण्यासाठी वाहने असतात. या मुली कधी घरात, कधी शेतावर तर कधी जंगलात एकएकटया सापडतात. त्यांना एखादे आमिष दाखवून किंवा त्यांच्या मनात भिती निर्माण करून प्रेमाच्या नावावर त्यांचे लैंगिक शोषण करणे खूप सहज असते. वयात येवू लागलेल्या या मुलींना स्वतःच्या शरीराची ओळखसुध्दा झालेली नसते. त्यांना कोणत्याच प्रकारे लैंगिक शिक्षण मिळत नाही. आई–वडील, भाउ सारे दारू पितात. त्यांना कोणताच भावनिक आधार नसतो आणि सुरक्षितताही नसते. या सर्व कारणामूळे यवतमाळ जिल्हयातील झरी–जामणी या तालुक्यात आदिवासी कुमारीमातांची समस्या मोठया प्रमाणात आढळून येते.

झरी–जामणी तालुक्यातील माथार्जुन या पोडांवर कुमारी मातांची संख्या बरीच जास्त आहे. त्या खालोखाल पाचपोड, बंदी वाठोडा, सुखरी, पेंढरी, झरी, ताड उमरी, मांगुर्डा, सेनोपोड, सायलीपोड, पेंढरीपोड, सुभी पोड, कुंडी पोड, पाचपोर पोड, निमणी इत्यादी आदिवासी पोडांवर कुमारीमातांची संख्या बरीच संख्या आढळून येते. या कुमारीमातांच्या संदर्भात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, गावतलेच अनेक पुरूष एकटया आणि असुरक्षित आदिवासी मुलींचे किंवा स्त्रियांचे लैंगिक शोषण करतात. त्या पुरूषांबदद्ल समाजातील इतर पुरूष त्यांना शिक्षा करण्यासाठी कोणतीच भूमिका घेत नाहीत. एखाद्या आदिवासी मुलींला फसवून, तिच्याशी लैंगिक संबंध स्थापन करून, तिला कुमारीमाता बनवणा–या व्यक्तीला किंवा आरोपीला सहजपणे गावात राहता येते. तो दुसरे लग्नही करतो. लैंगिक शोषण करणारा पुरूष बाहेरचा असेल तर हे आदिवासी त्यांच्याविरूध्द पोलीसात तक्रार करून त्याला शिक्षा करण्यात कमी पडतात. यातील पीडीत स्त्रिया मग बदनाम होतात. त्या त्याच गावात राहत असल्या तरी त्यांचे आयुष्य बदनामीच्या भोव–यातूनच जात असते. फक्त सामाजिक प्रतिष्ठे वगैरेचा विचार करायला कुणाला वेळ नसतो. या मुलींना फसवून जाणारे पुरूष बिनधास्तपणे समाजात वावरतात. म्हणूनच झरी–जामणी तालुक्यातील कुमारीमातांच्या समस्येचे स्वरूप अधिक गंभीर आहे.

---


1. संदर्भः–
2. Behare Suman, Bhartiya Samajik Sanstha, Vidya Prakashan, Nagpur ,1997 p.no.78
3. Bobde Prakash, 'Bhartiya Samaj Rachna', Vidya Prakashan Nagpur, 1978, p. 171.
4. सुनिता शर्मा, अमरेंद्र किशोर, 'कुमारीमाता', अनुवाद – प्रतिमा डिके, मनोविकास प्रकाशन, पुणे, 2012.
5. प्रा. लिला भेले, 'झरी–जामणी येथील आदिवासी कुमारीमातांचे सर्वेक्षण', फुले आंबेडकर महिला प्रबोधिनी, पांढरकवडा, 2008–09
6. प्रा. लिला भेले, 'झरी–जामणी येथील आदिवासी कुमारीमातांचे सर्वेक्षण', फुले आंबेडकर महिला प्रबोधिनी, पांढरकवडा, 2008–09
7. डॉ. सीमा साखरे, 'कुंतीच्या लेकी', सीमा प्रकाशन, नागपूर, 2011.
8. डॉ. सीमा साखरे, 'कुंतीच्या लेकी', सीमा प्रकाशन, नागपूर, 2011.पृ. 173.

ISSN 2278-3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE & SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in

Website - www.snmorcollege.org.in

Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657